# बृहन्मुंबई महानगरपालिका



**भूषण गगराणी**

**महानगरपालिका आयुक्त**

**बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज**
**[ अर्थसंकल्प 'अ'(फंड कोड - ११,१२,६०,७०),**
**अर्थसंकल्प 'ब'(फंड कोड - २१,२२,२३)**
**आणि अर्थसंकल्प 'ग' (फंड कोड - ४०) ]**
**दिनांक - ०४.०२.२०२५**

# २०२५-२६

बृहन्मुंबई महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून मार्च २०२४ पासून मला काम करण्याची संधी मिळाली असून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे माझे पहिले अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. मुंबई हे केवळ एक शहर नाही; तर ती एक भावना आहे, एक जिवंत परिसंस्था जिथे लाखो स्वप्ने जन्माला येतात, जोपासली जातात आणि साकार होतात. मुंबई ही विविधता, लवचिकता आणि नाविन्यपूर्णतेचे प्रतिनिधित्व करते जे आपल्या देशाचे सार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक अद्यापपर्यंत पार न पडल्यामुळे महानगरपालिकेमध्ये लोकप्रतिनिधी नाहीत. त्यामुळे, गेल्या दोन वर्षांपासून अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना लोकसहभागाकरिता आम्ही नागरिकांकडून अर्थसंकल्पाबाबत सूचना मागविण्याचा अभिनव उपक्रम राबवित आहोत. मागील वर्षी आम्हाला मुंबईकरांकडून १,१८१ सूचना प्राप्त झाल्या. त्याचप्रमाणे, सदर उपक्रम आम्ही यावर्षीदेखील राबविला असून त्यास मुंबईकरांनी २,७०३ सूचनांच्या स्वरुपात भरभरुन प्रतिसाद दिला आहे.

हा अर्थसंकल्प केवळ लेख्यांचे विवरण नसून मुंबईच्या भवितव्याकरिता केलेली आखणी आहे. नागरिकांना कमीतकमी खर्चात आणि त्वरित चांगल्या नागरी सेवासुविधा पुरविताना नाविन्यपूर्णता, सर्वसमावेशकता व शाश्वततेप्रती आमची बांधिलकी या अर्थसंकल्पातून दिसून येते.

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाची महत्वाची उद्दीष्टे**

या अर्थसंकल्पात "स्वच्छ, शाश्वत आणि सक्षम मुंबईसाठी कटिबद्ध" या आमच्या मंत्राचा मार्ग दर्शविणारी पुढील परस्परपूरक उद्दिष्टे स्विकारण्यात आली आहेत.

१. **वित्तीय शिस्त आणि शाश्वतता**

- ❖ अर्थसंकल्पीय तरतुदींच्या अनुषंगाने वित्तीय शिस्त
- ❖ महसूल वाढविण्यावर भर
- ❖ खर्चाचे सुसूत्रीकरण

२. **पायाभूत सेवासुविधांचे सक्षमीकरण**

- ❖ शहरी गतिशीलता
- ❖ आरोग्य पायाभूत सुविधांचे बळकटीकरण
- ❖ पाणी पुरवठा आणि मलनि:सारणाची कार्यक्षम व्यवस्था

३. **गुणवत्तापूर्ण आरोग्य व शिक्षण व्यवस्था**

- आरोग्य सुविधा
- शिक्षणातून उन्नती

४. **स्वच्छ आणि शाश्वत पर्यावरण**

- हवामान कृती
- स्वच्छ शहर आणि स्वच्छ हवा
- घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प
- पूर नियंत्रण
- आपत्ती प्रतिरोधक शहर
- मोकळया जागा आणि हरित क्षेत्रांमध्ये वाढ

५. **सामाजिक उपक्रम**

- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी योजना
- कला, संस्कृती, क्रीडा व मनोरंजन

६. **प्रशासकीय व कार्यालयीन कार्यक्षमता**

- व्यवसाय सुलभता
- प्रशासकीय कामकाजातील कार्यक्षमतेवर भर

**आमच्या उद्दीष्टांच्या दिशेने कार्यरत**

आमची कृती नेहमीच आमच्या उद्दिष्टांशी सुसंगत असते आणि हे आमच्या पुढील नमूद प्रयत्नांमधून प्रतिबिंबित होते.

## वित्तीय शिस्त आणि शाश्वतता

- **वित्तीय शिस्त**:

आपल्या लाडक्या शहराचे भवितव्य घडविण्याच्या या प्रवासाला सुरूवात करताना आपण ते आर्थिक जबाबदारीच्या भावनेने व विवेकाने करणे आवश्यक आहे.

या अर्थसंकल्पात, वित्तीय शिस्त हे केवळ मार्गदर्शक तत्त्व नसून मुंबईकरांनी आमच्याकडे सोपविलेल्या आर्थिक संसाधनांचे वाटप आणि त्यांचा वापर ठरविणारे मुलभूत मूल्य आहे.

- **अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ ची रुपरेषा**

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १२५ आणि १२६ई अन्वये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्प 'अ' (निधी संकेतांक - ११, १२, ६०, ७०), अर्थसंकल्प 'ब' (निधी संकेतांक - २१, २२, २३) आणि अर्थसंकल्प 'ग' (निधी संकेतांक - ४०) बाबत प्राप्ती व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज पुढे विशद करण्यात आले आहेत.

- **अर्थसंकल्पाचे आकारमान**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹७४४२७.४१ कोटी इतके प्रस्ताविले असून ते सन २०२४-२५ च्या ₹६५१८०.७९ कोटी इतक्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत १४.१९% ने जास्त आहेत.

**अ, ब, ई, ग आणि वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्पाचे आकारमान**

**(₹ कोटीत)**

| तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ | | सुधारित अंदाज २०२४-२५ | | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पन्न / प्राप्ती | खर्च | उत्पन्न / प्राप्ती | खर्च | उत्पन्न / प्राप्ती | खर्च |
| महसुली उत्पन्न | ३५७४९.०३ | | ४०६९३.८५ | | ४३१५९.४० | |
| महसुली खर्च | | २८७६३.९४ | | २६८३५.२५ | | ३१२०४.५३ |
| भांडवली उत्पन्न | ८०४.८५ | | ६७७.५४ | | ९०९.८५ | |
| भांडवली खर्च | | २२७८७.१६ | | २५७५७.६५ | | २६३५५.७४ |
| भांडवली खर्च कोस्टल/जीएमएलआर/ एसटीपी/पायाभूत प्रकल्प | | १०२१०.०० | | ९४००.४३ | | १३३१०.९७ |
| भांडवली खर्च -विशेष प्रकल्प | | ३३६१.४७ | | २१७४.०० | | ३४९५.५२ |
| निधीमधून कोस्टल / जीएमएलआर/एसटीपी/ पायाभूत प्रकल्पांकरिता रकमेचा वापर | १०२१०.०० | | ९४००.४३ | | १२२४५.०० | |
| निधीमधून भांडवली/ महसुली खर्चाकरिता रकमेचा वापर / विशेष प्रकल्प | १५६३.३३ | | १३४७.६८ | | १४१३.३८ | |
| तात्पुरते अंतर्गत हस्तांतरण | १६८५३.५८ | | १२११९.४७ | | १६६९९.७८ | |
| **एकूण** | **६५१८०.७९** | **६५१२२.५७** | **६४२३८.९७** | **६४१६७.३३** | **७४४२७.४१** | **७४३६६.७६** |
| वर्ताळा | | ५८.२२ | | ७१.६४ | | ६०.६५ |
| **एकूण** | **६५१८०.७९** | **६५१८०.७९** | **६४२३८.९७** | **६४२३८.९७** | **७४४२७.४१** | **७४४२७.४१** |

➢ **महसुली उत्पन्न : महानगरपालिकेच्या वित्तीय व्यवस्थेची जीवनवाहिनी**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे महसुली उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹३५७४९.०३ कोटी इतके प्रस्ताविण्यात आले होते ते ₹४०६९३.८५ कोटी असे सुधारण्यात आले असून, अंदाजामध्ये १३.८३% म्हणजेच ₹४९४४.८२ कोटी इतकी वाढ झाली आहे. दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत ₹२८३०८.३७ कोटी इतके प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता अंदाजित महसुली उत्पन्न ₹४३१५९.४० कोटी इतके प्रस्ताविले असून ते सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत २०.७३% ने जास्त आहे.

महसुली उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत खालील तक्त्यात नमूद केले आहेत.

**(₹ कोटीत)**

| उत्पन्नाचे स्त्रोत | २०२३-२४ | २०२४-२५ | | | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष आकडे | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष आकडे डिसेंबर २०२४ पर्यंत | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
| १) जकातीपोटी नुकसान भरपाई | १२३२७.०० | १३३३१.६३ | ९९८४.८७ | १३३३१.६३ | १४३९८.१६ |
| २) विकास नियोजन शुल्क व अधिमूल्य | ६२६०.६७ | ५८००.०० | ५९८५.७५ | ८८००.०० | ९७००.०० |
| ३) मालमत्ता कर | २८६०.६० | ४९५०.०० | ५२२९.२० | ६२००.०० | ५२००.०० |
| ४) जल व मलनि:सारण आकार | १६२९.५३ | १९२३.१९ | ११४१.५६ | २१३१.९८ | २३६३.१५ |
| ५) गुंतवणूकीवरील व्याज | १९१३.८७ | २२०६.३० | १७८०.६२ | २२१९.९२ | २२८३.८९ |
| ६) पर्यवेक्षण आकार | १२७७.०२ | १६८१.५१ | ९७९.०० | १७७२.९५ | २१३०.१७ |
| ७) राज्य शासनाकडून अनुदान सहाय्य | ६९४.३३ | १२४८.९३ | १२.७४ | ९७५.६२ | १३२५.०७ |
| ८) अग्निशमन दल | ३५३.०० | ३०१.०२ | ४८०.३३ | ६८६.९६ | ७५९.१८ |
| ९) रस्ते व पूल खात्याकडून प्राप्ती | ३७८.६८ | ५०८.७४ | २३०.५९ | ४६१.३० | ५३२.४३ |
| १०) रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांकडून प्राप्ती | ३४०.७० | ३३७.५२ | २६८.८७ | ३६४.९५ | ३९६.०४ |
| ११) अनुज्ञापन खात्याकडून प्राप्ती | २१५.७२ | ३२४.४९ | १७१.१९ | २६०.०० | ३६२.०० |
| १२) इतर | ३२०२.३० | ३१३५.७० | २०४३.६५ | ३४८८.५४ | ३७०९.३१ |
| **एकूण** | **३१४५३.४२** | **३५७४९.०३** | **२८३०८.३७** | **४०६९३.८५** | **४३१५९.४०** |

**जकातीपोटी शासनाकडून मिळणारी नुकसान भरपाई**

जकातीपोटी नुकसान भरपाई म्हणून शासनाकडून आर्थिक वर्ष २०२४-२५ करीता ₹१३३३१.६३ कोटी व आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता ₹१४३९८.१६ कोटी इतके उत्पन्न अंदाजिले आहे.

**विकास नियोजन खात्याकडून प्राप्त होणारे उत्पन्न**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, विकास नियोजन खात्याकडून प्राप्त होणाऱ्या महसूलापोटी ₹५८०० कोटी इतके उत्पन्न अंदाजिले होते, ते ₹८८०० कोटी असे सुधारित करण्यात आले असून, अंदाजामध्ये ५१.७२% म्हणजेच ₹३००० कोटी इतकी वाढ झाली आहे. दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत ₹५९८५.७५ कोटी इतके प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये, विकास नियोजन खात्याकडून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹९७०० कोटी इतके प्रस्ताविले आहेत.

**मालमत्ता कर**

मालमत्ता कराबाबत मान.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतिम निर्णयाची अंमलबजावणी सुरु आहे. त्यामुळे, आर्थिक वर्ष २०२३-२४ करीता मालमत्ता कर देयके संरक्षणात्मक आधारावर दिनांक २६.०२.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आली. सदर देयकांची देय दिनांक २५.०५.२०२४ असल्याने दिनांक ३१.०३.२०२४ पूर्वी अधिदान करण्याकरिता पक्षकारांकडे तगादा लावता येत नव्हता. परिणामी, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये एकूण मागणी रकमेपैकी ₹२८६०.६० कोटी इतका मालमत्ता कर प्रत्यक्ष प्राप्त झाला आहे. तसेच, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता ₹६७४२.७४ कोटी इतक्या रकमेची देयके दिनांक १३.०९.२०२४ रोजी निर्गमित करण्यात आली आहेत. त्यामुळे, दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत मालमत्ता करापोटी ₹५२२९.२० कोटी इतके संकलन झाले असून त्यामध्ये सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या ₹१४९१.३६ कोटी इतक्या रकमेचा समावेश आहे.

सदर परिस्थिती विचारात घेता, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, मालमत्ता करापोटी ₹४९५० कोटी इतके उत्पन्न अंदाजिले होते, ते ₹६२०० कोटी असे सुधारित करण्यात आले आहे. तसेच, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये, मालमत्ता कराच्या उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹५२०० कोटी इतके प्रस्ताविले आहेत.

बहुतांश मालमत्ताधारक रिट याचिका क्र.२५९२/२०१३ च्या अंतरिम निर्णयानुसार मालमत्ता कराच्या ५०% रकमेचे अधिदान करीत आहेत. सद्यस्थितीत, दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत मालमत्ता कराची एकूण थकबाकी ₹२२५६५.३८ कोटी इतकी आहे. याचिका क्र.१७००९/२०१९ बाबत मान.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार नियमावलीमध्ये बदल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**जल आणि मलनि:सारण आकार**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, जल आणि मलनि:सारण आकारापोटी ₹१९२३.१९ कोटी इतके उत्पन्न अंदाजिले होते, ते ₹२१३१.९८ कोटी असे सुधारित करण्यात आले असून अंदाजामध्ये १०.८६% म्हणजेच ₹२०८.७९ कोटी इतकी वाढ झाली आहे. दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत जल आणि मलनि:सारण आकारापोटी ₹११४१.५६ कोटी इतके प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये, जल आणि मलनि:सारण आकाराचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹२३६३.१५ कोटी इतके प्रस्ताविले आहेत.

**गुंतवणुकीवरील व्याज**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, गुंतवणुकीवरील व्याजापोटी ₹२२०६.३० कोटी इतके उत्पन्न अंदाजिले होते, ते ₹२२१९.९२ कोटी असे सुधारित करण्यात आले असून सदर अंदाजामध्ये ०.६२% म्हणजेच ₹१३.६२ कोटी इतकी वाढ झाली आहे. दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत गुंतवणुकीवरील व्याजापोटी ₹१७८०.६२ कोटी इतके प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये, गुंतवणुकीवरील व्याजाच्या उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹२२८३.८९ कोटी इतके प्रस्ताविले आहेत.

**अग्निशमन दल खात्याकडून प्राप्त होणारे उत्पन्न**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, अग्निशमन दल खात्याकडून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापोटी ₹३०१.०२ कोटी इतके उत्पन्न अंदाजिले होते, ते ₹६८६.९६ कोटी असे सुधारित करण्यात आले असून सदर अंदाजामध्ये १२८.२१% म्हणजेच ₹३८५.९४ कोटी इतकी वाढ झाली आहे. दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत अग्निशमन दल खात्याकडून ₹४८०.३३ कोटी इतके प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये, अग्निशमन दल खात्याकडून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹७५९.१८ कोटी इतके प्रस्ताविले आहेत.

**अनुज्ञापन खात्याकडून प्राप्त होणारे उत्पन्न**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये, अनुज्ञापन खात्याकडून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नापोटी ₹३२४.४९ कोटी इतके उत्पन्न अंदाजिले होते, ते ₹२६० कोटी असे सुधारित करण्यात आले असून सदर अंदाजामध्ये १९.८७% म्हणजेच ₹६४.४९ कोटी इतकी घट झाली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये, अनुज्ञापन खात्याकडून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹३६२ कोटी इतके प्रस्ताविले आहेत.

**राज्य शासनाकडून येणे असलेली थकबाकी**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील राज्य शासनाच्या अखत्यारितील विविध कार्यालयांकडून सहाय्यक अनुदान, मालमत्ता कर, इत्यादीपोटी दि.३१ डिसेंबर २०२४ पर्यंत एकूण ₹९७५०.२३ कोटी इतके येणे आहे. यामध्ये, राज्य शासनाच्या शिक्षण खात्याकडून सहाय्यक अनुदानापोटी येणे असलेल्या ₹६५८१.१४ कोटी इतक्या रकमेचा समावेश आहे.

➢ **महसुली खर्च**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये महसुली खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹२८७६३.९४ कोटी वरुन ₹२६८३५.२५ कोटी असे सुधारित करण्यात आले असून सदर अंदाजामध्ये ₹१९२८.६९ कोटी इतकी घट झाली आहे. दिनांक ३१.१२.२०२४

पर्यंत ₹१५९१२.३७ कोटी इतका प्रत्यक्ष महसुली खर्च झाला असून तो सन २०२४-२५ च्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत ५९.३०% आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये महसुली खर्चाकरिता ₹३१२०४.५३ कोटी इतके अर्थसंकल्पीय अंदाज प्रस्ताविण्यात आले आहेत.

- **भांडवली खर्च**

आतापर्यंत, भांडवली खर्चाचे सुधारित अंदाज हे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा नेहमीच कमी राहिले आहेत. तथापि, पायाभूत प्रकल्पांवरील वाढत्या खर्चामुळे २०२४-२५ या आर्थिक वर्षात विरुद्ध परिस्थिती निर्माण झाली आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये ₹१८२८१.७८ कोटी इतका प्रत्यक्ष भांडवली खर्च झाला होता. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये भांडवली खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ₹३६३५८.६३ कोटी वरुन ₹३७३३२.०८ कोटी असे सुधारित करण्यात आले आहेत. दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत ₹१८९९१.६५ कोटी इतका प्रत्यक्ष भांडवली खर्च झाला आहे. सबब, चालू आर्थिक वर्षातील ९ महिन्यांमध्ये झालेला प्रत्यक्ष भांडवली खर्च हा सन २०२३-२४ या संपूर्ण आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष भांडवली खर्चाहून अधिक आहे. यावरुन, महसुली खर्चावर नियंत्रण ठेवताना पायाभूत सुविधांवरील खर्च वाढल्याचे दिसून येते. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये भांडवली खर्चाकरिता ₹४३१६२.२३ कोटी इतके अर्थसंकल्पीय अंदाज प्रस्ताविण्यात आले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका नेहमीच शाश्वत नागरी सुविधा आणि नियंत्रित महसुली खर्च यावर भर देणारे नागरिकाभिमुख अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याच्या आपल्या धोरणाचे पालन करीत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने अवलंबिलेल्या या धोरणानुसार, मुंबईतील नागरिकांना उत्तम पायाभूत सुविधा आणि आधुनिक सेवा देण्यासाठी पायाभूत सुविधा प्रकल्पांवरील खर्चाचा वाढता कल यावर्षीदेखील कायम असल्याचे पुढील तक्त्यावरून दिसून येते.

## महसुली खर्चाच्या तूलनेत भांडवली खर्चाचा वाढता आलेख

| महसुली खर्च आणि भाडवली खर्चाची एकूण खर्चाशी टक्केवारी (₹ कोटीत) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **वर्ष** | **एकूण खर्च** | **महसुली खर्च** | **टक्केवारी** | **भांडवली खर्च** | **टक्केवारी** |
| २०१७-१८ | २००३६.६४ | १५०५८.१६ | ७५% | ४९७८.४८ | २५% |
| २०१८-१९ | २०६४३.९१ | १५२११.६७ | ७४% | ५४३२.२४ | २६% |
| २०१९-२० | २६४०६.४६ | १८८३७.७६ | ७१% | ७५६८.७० | २९% |
| २०२०-२१ | २९३७३.४६ | २११३६.३३ | ७२% | ८२३७.१३ | २८% |
| २०२१-२२ | ३५९६२.०९ | २३४२६.६२ | ६५% | १२५३५.४७ | ३५% |
| २०२२-२३ | ३८५१५.४९ | २४५५७.८४ | ६४% | १३९५७.६५ | ३६% |
| २०२३-२४ | ४६००७.७० | २७७२५.९२ | ६०% | १८२८१.७८ | ४०% |
| २०२४-२५ (सुधारित अंदाज) | ६४१६७.३३ | २६८३५.२५ | ४२% | ३७३३२.०८ | ५८% |
| २०२५-२६ (अर्थसंकल्पीय अंदाज) | ७४३६६.७६ | ३१२०४.५३ | ४२% | ४३१६२.२३ | ५८% |

सन २०१७-१८ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण खर्चामधील महसुली खर्चाच्या हिश्यामध्ये ७५% वरून ४२% पर्यंत सातत्याने घट झाली असून भांडवली खर्चाचा हिस्सा २५% वरुन ५८% पर्यंत पोहोचला आहे. पायाभूत सुविधांचा विकास आणि आधुनिकीकरणाच्या दिशेने बृहन्मुंबई महानगरपालिकेने गाठलेला हा उल्लेखनीय टप्पा आहे.

- **बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रतिष्ठित प्रकल्प**

मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्प, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, मुंबई किनारी रस्ता (उत्तर) प्रकल्प (वर्सोवा ते दहिसर), बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील दहिसर (प) येथील लिंक रोड ते मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मीरा-भाईंदर (प) पर्यंतचा उन्नत मार्ग (किनारी रस्त्याचा अंतिम भाग) या प्रकल्पांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम १२४ब (२-१अ) अन्वये महत्त्वाकांक्षी नागरी वाहतूक प्रकल्प म्हणून घोषित करण्याची विनंती राज्य शासनाकडे करण्यात आली आहे.

बांधिल दायित्व व राखीव निधीची उपलब्धता यांची स्थिती आणि महत्वाच्या पायाभूत प्रकल्पांसाठी प्रस्तावित आर्थिक तरतूदींबाबतची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे:

(₹ कोटीत)

| अ. क्र. | तपशिल | शिल्लक प्रकल्प खर्च दिनांक ०१.०४.२०२५ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|---|
| १ | मुंबई मलनि:सारण प्रकल्प (सांडपाणी प्रक्रिया केंद्र - ७) | २९३४४.०० | ५५४५.०० |
| २ | गोरेगांव मुलुंड लिंक रोड | १३९९४.३९ | १९५८.७३ |
| ३ | मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्प | २७००.९६ | १५१६.३१ |
| | **पूल खाते** | | |
| ४ | मुंबई किनारी रस्ता (उत्तर) प्रकल्प **-** (वर्सोवा ते दहिसर) **(६ पॅकेजेस - ए, बी, सी, डी, ई आणि एफ)** | ३३५१२.५९ | ४०००.०० |
| ५ | के/पश्चिम व पी/उत्तर विभागातील मढ व वर्सोवा दरम्यान पूलाचा आराखडा व बांधकाम | ३९८४.४२ | १९.७४ |
| ६ | बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील दहिसर (प) येथील लिंक रोड ते मिरा -भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरा-भाईंदर (प) पर्यंत ४५ मी. रुंदीच्या उन्नत मार्गाचे बांधकाम **(किनारी रस्त्याचा अंतिम भाग)** | ३८२७.५९ | ३००.०० |
| ७ | बी, सी, डी, ई विभागामध्ये पूर्व मुक्त मार्ग (ऑरेंज गेट) पासून ग्रँट रोड परिसरापर्यंत उन्नत मार्गाचे (उड्डाणपूल) बांधकाम | २४८४.३४ | ९०.०० |
| ८ | **भाग अ:** पी/उत्तर विभागातील मालाड (प) येथील एम.डी.पी. रस्ता ते रायन इंटरनॅशलन स्कूल मालाड मार्वे रस्त्याला जोडणाऱ्या रामचंद्र नाल्यावरील वाहतूक पूल व उन्नत मार्ग<br>**भाग ब:** लगून रोड इन्फिनिटी मॉल, मालाड (प) येथून जोडणारा वाहतूक पूल | २१३९.५० | १०.०० |
| ९ | एम/पूर्व विभागातील महाराष्ट्र नगर जवळ सायन-पनवेल महामार्गावरील टी जंक्शन येथील उड्डाणपुलाच्या आर्म-१ व आर्म-२ चे बांधकाम | १०५१.०० | ५००.०० |
| १० | के/पश्चिम आणि पी/दक्षिण विभागांच्या सीमेवरील ३६.६ मी. रुंदीच्या डी.पी. रस्त्यालगत भगतसिंग नगरच्या मागील बाजूस गोरेगाव खाडीवरील वाहतूक पूल | ६६०.०५ | १८.९४ |
| ११ | के/पश्चिम विभागातील जुहू वर्सोवा रस्त्यावरील सी.डी. बर्फीवाला मार्ग ते जे.व्ही.पी.डी. जंक्शनपर्यंतच्या उड्डाणपुलाचे बांधकाम | ६३०.०० | ५०.०० |
| १२ | जी/दक्षिण विभागातील महालक्ष्मी रेल्वे स्थानकाजवळ डॉ.ई. मोझेस रोड आणि केशवराव खाड्ये मार्गावर रेल्वे रुळांवरील २ उड्डाणपुलांचे बांधकाम | ४९३.१३ | ८०.०० |
| १३ | आर/मध्य विभागातील कोरा केंद्र बोरीवली (प) येथील एस.व्ही. रोडवरील पूलाचे बांधकाम | ३६१.९१ | ५०.०० |
| १४ | जी/दक्षिण विभागातील नेहरू विज्ञान केंद्राजवळ पूल/भुयारीमार्गाचे बांधकाम | २६७.३९ | ६०.०० |
| | **रस्ते व वाहतूक खाते** | | |
| १५ | प्रमुख रस्ते व संगमस्थानांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण - मेगा प्रकल्प (टप्पा-१ व २) | १७७३३.८९ | ३१११.०७ |
| १६ | बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाचे नुतनीकरण (सर्विस रोड, स्लिप रोड व संगमस्थाने) | २३३१.२२ | १७०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील प्रवेश नियंत्रण प्रकल्प | १३३४.२१ | ४४२.०० |
| १८ | जी/दक्षिण विभागातील वरळी येथील साहित्य चाचणी प्रयोगशाळा व अॅस्फाल्ट प्लांट कार्यालयाचा पुनर्विकास | ७४५.१५ | ६५.०० |
| | **पाणी पुरवठा प्रकल्प** | | |
| १९ | जलवहन बोगदे - पाणी पुरवठा प्रकल्प | १७६०२.१५ | २२७०.०० |
| २० | पिंजाळ प्रकल्प (एसआर २०१२ प्रमाणे) पा.पु.प्र. | १४३९०.०० | ०.०१ |
| २१ | भांडूप संकूल येथे २००० द.ल.लि. क्षमतेचा जल शुध्दीकरण प्रकल्प | ८४२९.३९ | ४५०.०० |
| २२ | मुंबईच्या पाणीपुरवठयात वाढ करण्याकरिता प्रतिदिन २०० द.ल.लि. क्षमतेचा नि:क्षारीकरण प्रकल्प | २६४९.८२ | १००.०० |
| २३ | पांजरापूर येथे ९१० द.ल.लि. क्षमतेचा जल शुध्दीकरण प्रकल्प | ३३९३.९५ | २५०.०० |
| २४ | मोठ्या जलवाहिन्यांची कामे – पाणीपुरवठा प्रकल्प | १५०५.९२ | ४६०.०० |
| २५ | पिसे येथे ४५५ द.ल.लि. क्षमतेचा उदंचन केंद्राचे बांधकाम | १२२९.७७ | २५०.०० |
| | **नगर अभियंता खाते** | | |
| २६ | आर/उत्तर विभागातील दहिसर चेक नाका येथे वाहतूक व व्यावसायिक केंद्र | २४७२.३९ | १५०.०० |
| २७ | एम/पूर्व विभागातील ६०० टेनामेंट्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवनार गाव येथील मोकळ्या भूखंडाचा पुनर्विकास | १४०१.१६ | २००.०० |
| २८ | एन विभागातील विक्रोळी पार्कसाईट लेआऊट येथील महानगरपालिकेच्या मालमत्तेचा पुनर्विकास | १११४.०२ | ७५.०० |
| २९ | एम/पूर्व विभागातील ६०० टेनामेंट्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवनार गाव येथील भूखंडावर निवासी सदनिकांच्या बांधकामाकरिता एकरकमी (टर्न की) निविदा | ७२०.५५ | १७५.०० |
| ३० | एन विभागातील विक्रोळी (पू) येथील इंजिनीअरिंग हब इमारतीचे बांधकाम | ३८६.९९ | ०.२५ |
| | **आरोग्य खाते** | | |
| ३१ | सायन रुग्णालय परिसराचा पुनर्विकास टप्पा-२ | २८१९.९९ | २४५.०० |
| ३२ | क्रांतिवीर महात्मा जोतिबा फुले रुग्णालयाचा विस्तार | ७३१.०० | ७०.०० |
| ३३ | एल विभागातील संघर्ष नगर, चांदिवली येथील रुग्णालयाचे बांधकाम | ६६८.६५ | ५०.०० |
| ३४ | राजावाडी रुग्णालयाचा पुनर्विकास टप्पा-२ | ६५९.८७ | ५०.०० |
| ३५ | एस विभाग भांडूप येथील मल्टीस्पेशालिटी मनपा रुग्णालय | ६०८.३७ | १८०.०० |
| ३६ | सायन रुग्णालय परिसराचा पुनर्विकास टप्पा-१ | ५८९.६५ | १००.०० |
| ३७ | मौजे पोईसर, कांदिवली (प) येथे शताब्दी रुग्णालयाचे बांधकाम | ३९८.१९ | १५०.०० |
| ३८ | सिध्दार्थ रुग्णालयाचा पुनर्विकास | ३३३.७९ | ५०.०० |
| ३९ | बा.य.ल. नायर रूग्णालयातील मोडकळीस आलेली जूनी इमारत एल शेप/ लिनिअर एक्सलेटर/निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाची इमारत पाडून नवीन इमारतीचे बांधकाम | २७६.६० | ४०.०० |
| ४० | एम.टी. अगरवाल रुग्णालय येथे कर्मचारी आणि निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा निवासस्थानाचे बांधकाम | २५४.५९ | ५०.०० |
| ४१ | भगवती रुग्णालय संकुलाचा पुनर्विकास टप्पा-२ | २१६.३४ | ७५.०० |
| ४२ | वांद्रे येथे कर्करोगाकरिता स्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम | २०३.०७ | २५.०० |
| ४३ | वांद्रे येथील के.बी. भाभा रुग्णालयाचा विकास | ११५.८३ | ६०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४४ | सायन कोळीवाडा येथील वसतीगृह व निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाचे बांधकाम | ११५.३६ | ३०.०० |
| ४५ | मुलुंड येथील म.तु. अगरवाल रुग्णालयाचा विस्तार | १११.६० | २०.०० |
| ४६ | नेत्र रुग्णालयाचा पुनर्विकास | १०८.६९ | १५.०० |
| ४७ | ओशिवरा प्रसूतीगृहाची दुरुस्ती/पुनर्बांधणी | ९९.०१ | २५.०० |
| ४८ | गोवंडी येथील पं.म.मो. मालवीय शताब्दी रूग्णालयाकरिता नवीन इमारतीचे बांधकाम | ८५.९० | २५.०० |
| ४९ | एक्वर्थ कुष्ठरोग रुग्णालय | ७७.०३ | ४०.०० |
| | **घन कचरा व्यवस्थापन** | | |
| ५० | आश्रय योजने अंतर्गत घन कचरा व्यवस्थापन कर्मचारी वसाहतींचा पुनर्विकास | ३६०९.२६ | १३००.०० |
| ५१ | घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | १४२९.५५ | ३००.०० |
| | **पर्जन्य जलवाहिन्या** | | |
| ५२ | मिठी नदी प्रकल्पाची कामे - अर्थसंकल्प - अ आणि ग | ३९४१.०३ | ४५३.२५ |
| ५३ | नद्यांचे पुनरुज्जीवन | २४३७.६४ | ४९३.०० |
| | **बाजार खाते** | | |
| ५४ | शिरोडकर मंडईचा पुनर्विकास | २६८.०० | ५.०० |
| ५५ | क्रातिवीर महात्मा ज्योतिबा फुले मंडईचा पुनर्विकास (टप्पा -२) | १८५.८१ | ५०.०० |
| | **एकूण** | **१९३२३६.६७** | **२६२६८.३०** |
| ५६ | इतर दायित्व - अर्थसंकल्प अ, ब, ई व ग | ३९१७६.३१ | ९७१३.२८ |
| | **एकूण** | **२३२४१२.९८** | **३५९८१.५८** |

वरील तक्त्यानुसार, विविध प्रतिष्ठित आणि महत्वाच्या प्रकल्पांचे बांधिल दायित्व ₹१९३२३६.६७ कोटी इतके आहे. याव्यतिरिक्त रस्ते, पर्जन्य जलवाहिन्या, पूल, घन कचरा व्यवस्थापन, आरोग्य, नगर अभियंता, इमारत परिरक्षण आणि यांत्रिकी व विद्युत यासारख्या विविध खात्यांच्या इतर कामांचे बांधिल दायित्व ₹३९१७६.३१ कोटी इतके आहे. त्यामुळे, पायाभूत व नागरी सेवा सुविधांमध्ये सुधारणा करण्याकरिताचे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे दि.०१.०४.२०२५ रोजीचे एकूण बांधिल दायित्व ₹२३२४१२.९८ कोटी इतके आहे.

- **बांधिल दायित्वांकरिता राखीव निधी -** विविध प्रकल्पांवरील बांधिल भांडवली खर्च मुख्यत: बृहन्मुंबई महानगरपालिकेने या प्रकल्पांकरिता विशेषत्वाने तयार केलेल्या निधीमधून करण्यात येतो.

## पायाभूत सुविधांकरिता उपलब्ध राखीव निधी

(₹ कोटीत)

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (दि.३१.१२.२०२४ रोजी) |
|---|---|---|
| १ | इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड (फंजिबल एफएसआय) | ७९३५.७७ |
| २ | मालमत्ता पुनर्स्थापना निधी | ८.४४ |
| ३ | मालमत्ता पुनर्स्थापना आणि पुनर्वसन निधी | १०३२४.२४ |
| ४ | रस्ते आणि पूल बांधणी विकास निधी | ०.६२ |
| ५ | भूमी संपादन आणि विकास निधी | ४२४.२२ |
| ६ | प्राथमिक शालेय इमारत बांधकाम निधी | ३१९.९६ |
| ७ | प्राथमिक शालेय इमारत परिरक्षण निधी | ११.९९ |
| ८ | विकास निधी - १२४ जे एमआरटीपी अधिनियम | ७२.८७ |
| ९ | विकास निधी - डीसीआर ६(बी) | ८४०१.८५ |
| १० | विकास निधी - बृहन्मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा | ९०.३२ |
| ११ | विशेष प्रकल्प निधी | १८४५.४६ |
| १२ | संचित वर्ताळा घसारा निधीसह | १०१०७.९० |
| | **एकूण (अ)** | **३९५४३.६४** |

## बांधिल दायित्वापोटी राखीव निधी

(₹ कोटीत)

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (दि.३१.१२.२०२४ रोजी) |
|---|---|---|
| १ | भविष्य निर्वाह निधी | ५८५३.२० |
| २ | निवृत्तीवेतन निधी | ३९४९.८८ |
| ३ | उपदान निधी | ७.७५ |
| ४ | मुदत ठेवी (परिभाषित निवृत्तीवेतन योजना - १) | ५१६०.२२ |
| ५ | इतर विशेष निधी (परिशिष्ट - सहा नुसार) | २१००.१७ |
| ६ | कंत्राटदार आणि इतर पक्षकारांची ठेव रक्कम | २१८५५.१५ |
| ७ | खंदक ठेव व इतर अनुदान | ३३०४.४१ |
| | **एकूण (ब)** | **४२२३०.७८** |

| | |
|---|---|
| **एकूण (अ) + (ब)** | **८१७७४.४२** |

मागील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राखीव निधीमध्ये ठेवण्यात आलेली ₹४२२३०.७८ कोटी इतकी रक्कम बांधिल दायित्वापोटी विश्वासार्हता म्हणून आहे. तसेच, उर्वरित ₹३९५४३.६४ कोटी इतकी रक्कम विविध पायाभूत

प्रकल्पांसाठी संलग्नित करण्यात आली आहे. यामुळे, राखीव निधी हे मुंबईकरांच्या सुविधेसाठी पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी लागणाऱ्या भांडवली खर्चाकरिताच वापरण्यात येतील, याची खात्री देता येईल.

➢ **तात्पुरते अंतर्गत हस्तांतरण**

सन २०२३-२४ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹६३६४.४८ कोटी इतका निधी तात्पुरत्या अंतर्गत हस्तांतरणाद्वारे उभारण्याचे प्रस्तावित होते. तथापि, सन २०२३-२४ चा एकूण खर्च पाहता, तात्पुरत्या अंतर्गत हस्तांतरणाद्वारे निधी उभारण्याची आवश्यकता भासली नाही. परंतु, सध्याची एकंदर आर्थिक परिस्थिती विचारात घेता, प्रकल्प कामांना मार्च २०२५ पर्यंत व त्यानंतर पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याकरिता तात्पुरत्या अंतर्गत हस्तांतरणाद्वारे निधी उभारणे आवश्यक आहे. म्हणूनच, सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१२११९.४७ कोटी आणि सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१६६९९.७८ कोटी इतका निधी तात्पुरत्या अंतर्गत हस्तांतरणाद्वारे उभारण्याचे प्रस्ताविण्यात येत आहे.

❖ **<u>महसूल वाढविण्यासाठीच्या उपाययोजना</u>**:

बृहन्मुंबई महानगरपालिकेने आपल्या वित्तीय संसाधनांच्या पुर्नरचनेची प्रक्रिया प्रकर्षाने सुरु करणे आणि उत्पन्नाच्या नवीन स्त्रोतांची चाचपणी करणे आता आवश्यक आहे. शहराच्या विकासाशी तडजोड न करता आर्थिक स्थैर्य सुनिश्चित करणे हे आमचे प्रथम प्राधान्य आहे, जेणेकरुन भविष्यात विकास कामांकरिता पुरेसा निधी उपलब्ध होईल. प्रचलित तरतूदींच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्नाच्या स्त्रोतांनी उच्चतम पातळी गाठली असल्याकारणाने या विद्यमान स्त्रोतांतून वाढीव उत्पन्न मिळविण्यासाठी त्याचप्रमाणे उत्पन्नाचे नाविन्यपूर्ण स्त्रोत शोधून त्याद्वारे अधिकाधिक महसूल प्राप्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्यादृष्टीने, दीर्घकालीन धोरणाचा एक भाग म्हणून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महसुलात वाढ करून विविध निधीतील अंशदान वाढविण्याकरिता विविध खात्यांमार्फत आकारल्या जाणाऱ्या विविध आकार व शुल्कांचे पुनरावलोकन करणे व त्यामध्ये सुधारणा करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, प्रचलन कार्यक्षमतेत सुधारणा करणे आणि विविध शासकीय कार्यालयांकडे प्रलंबित असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

- **हाती घेतलेल्या उपाययोजना -**

➢ **अतिरिक्त चटईक्षेत्रापोटी अधिमूल्य -** बृहन्मुंबई महानगरपालिकेने अतिरिक्त चटई क्षेत्रापोटी प्राप्त होणाऱ्या अधिमुल्याचे वाटप राज्य शासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये २५:७५ या प्रमाणात करण्याकरिता निर्देश जारी करण्याबाबत राज्य शासनास विनंती केली होती. तथापि, सदर अधिमुल्यातील बृहन्मुंबई महानगरपालिकेस यापूर्वी अनुज्ञेय असलेल्या २५% ऐवजी ५०% हिस्सा राज्य शासनाने दि.१४.१०.२०२४ च्या अधिसुचनेद्वारे मंजूर केला आहे. यामुळे, बृहन्मुंबई महानगरपालिकेला आतापर्यंत ₹७० कोटी इतका वाढीव महसूल प्राप्त झाला असून आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये त्यापोटी ₹३०० कोटी इतके अतिरिक्त उत्पन्न अपेक्षित आहे.

अतएव, बृहन्मुंबई महानगरपालिकेने उर्वरित २५% हिस्सा मिळण्याकरिता केलेली विनंती अद्यापही राज्य शासनाकडे प्रलंबित आहे.

➢ **रिक्त भूभाग भाडेपट्टा (Vacant Land Tenancy) -** मालमत्ता विभागामार्फत रिक्त भूभाग भाडेपट्ट्याखालील विविध भूभाग/जमिनी सार्वजनिक उद्दिष्टांकरिता विकसित करणे तसेच शक्य असेल तिथे मक्त्याने देणेबाबत धोरण अंतिम करण्यात आले आहे. सदर धोरणामुळे जमिनीचा विकास शक्य होणार असल्याने महानगरपालिकेला एक वेळ अधिमूल्य व भुईभाडे स्वरुपात अंदाजे ₹२००० कोटी इतका महसूल आगामी ४ वर्षात प्राप्त होईल. अशा तऱ्हेने महानगरपालिकेस अतिरिक्त महसूलाचे नवीन स्त्रोत निर्माण होऊन महसुलामध्ये लक्षणीय वाढ होईल.

➢ **अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा शुल्काची यशस्वी अंमलबजावणी -** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०२३ च्या अनुषंगाने अंमलात आणलेल्या उपाययोजनेमुळे अग्निशमन खात्याकडून दिनांक ३१.१२.२०२४ पर्यंत एकूण ₹४८०.३३ कोटी इतके महसुली उत्पन्न प्राप्त झाले आहे, जे संपूर्ण आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ₹३५३ कोटी इतके होते. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये सदर उत्पन्न ₹६८६.९६ कोटी पर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये, अग्निशमन खात्याकडून ₹७५९.१८ कोटी इतके अंदाजित उप्तन्न प्रस्ताविले आहेत.

➢ **वाहतूक आणि व्यावसायिक केंद्र -** पश्चिम द्रुतगती महामार्गावरील दहिसर जकात नाका येथे वाहतूक आणि व्यावसायिक केंद्र उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पामध्ये, इतर राज्यांतून मुंबईकडे येणाऱ्या प्रवाशांच्या सोईसाठी निवासी व्यवस्था करण्याचे योजिले आहे. सोबतच, व्यावसायिक कार्यालये, प्रवासी वाहनांसाठी पार्किंग व इतर तत्सम सुविधा प्रस्तावित आहेत. सदर प्रकल्पामध्ये ४५६ प्रवासी बस पार्किंग, १,४२४ मोटार वाहन पार्किंगसह १३१ खोल्यांचे तारांकित हॉटेल प्रस्ताविले आहे.

सदर प्रकल्प पश्चिम द्रुतगती महामार्ग व मेट्रो स्थानकांशी जोडला असल्यामुळे वारंवार येणाऱ्या प्रवाशांचा पुढील प्रवास सुलभ करेल तसेच मुंबईतील वाहतूक कोंडीची समस्या कमी होईल. सदर प्रकल्पाकरिता लागणारी भांडवली गुंतवणूक तसेच प्रकल्पाच्या परिरक्षणासाठी लागणारी गुंतवणूकदेखील या प्रकल्पातूनच प्राप्त करण्याचे योजिले आहे. त्यामुळे, बृहन्मुंबई महानगरपालिकेवर सदर प्रकल्पाचा कोणताही अतिरिक्त भार पडणार नाही आणि उत्पन्नाचा एक नवीन स्त्रोत निर्माण होईल.

➢ **बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिशेष रकमेच्या गुंतवणुकीकरिता ऑनलाईन प्रणाली -** ऑनलाईन दरपत्रिका मागवून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिशेष रकमेची गुंतवणूक करण्यासाठी मानक प्रक्रिया (SOP) तयार केली असून तिची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यापूर्वी मानवीय कार्यपध्दतीने केली जाणारी गुंतवणूक

दि.२३.०७.२०२४ पासून ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात येत आहे. या सुधारणेमुळे भविष्यातील गुंतवणुकीवर जास्त व स्पर्धात्मक व्याजदर मिळणे अपेक्षित आहे.

➢ **झोपडपट्टी भागातील व्यावसायिक आस्थापनांचे करनिर्धारण -** मुंबईमध्ये सुमारे २.५० लाख झोपडपट्टया आहेत. त्यापैकी, अनेक झोपड्यांचा (किमान २०% म्हणजेच ५०,००० झोपड्या) लहान-मोठे उद्योगधंदे, दुकाने, गोदाम, हॉटेल्स अशा व्यावसायिक कारणांसाठी मोठ्या संख्येने वापर केला जात आहे. या आस्थापनांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पायाभूत सुविधा पुरविल्या जात असल्याने या व्यावसायिक आस्थापनांचे करनिर्धारण करुन मालमत्ता कर वसूल करणे आवश्यक आहे. तसेच, झोपडपट्टीधारकांना अधिक चांगल्या सोयीसुविधा पुरविण्याकरिता या उत्पन्नामुळे मदत होईल.

त्याअनुषंगाने, झोपडपट्टी भागातील व्यावसायिक मालमत्तांचे करनिर्धारण करण्यात येत असून त्यातून सुमारे ₹३५० कोटी इतका महसूल प्राप्त होणे अपेक्षित आहे.

- **प्रस्तावित उपाययोजना -**

➢ **घन कचरा व्यवस्थापन वापरकर्ता शुल्क -** मुंबईची वाढती लोकसंख्या आणि घन कचऱ्याचे वाढते प्रमाण यामुळे कचरा व्यवस्थापनावरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सुरळीत कामकाज आणि आर्थिक स्थैर्य सुनिश्चित करण्यासाठी, 'घन कचरा व्यवस्थापन वापरकर्ता शुल्क' लागू करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी कायदेशीर सल्ला घेण्यात येत आहे. कायदेशीर सल्ला प्राप्त झाल्यानंतर, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत केंद्र शासनाने अधिसूचित केल्यानुसार, घन कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे घन कचरा व्यवस्थापन आरोग्य आणि स्वच्छता उपविधी, २००६ मध्ये सुधारणा करण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

घन कचरा व्यवस्थापन वापरकर्ता शुल्कातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा वापर घन कचरा व्यवस्थापन प्रणालीमध्ये सुधारणा, अत्याधुनिक तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करण्याकरिता आणि एकूणच सेवांचा दर्जा उंचावण्याकरिता करता येईल, ज्याद्वारे नागरिकांकरिता स्वच्छ आणि निरोगी मुंबईची सुनिश्चिती करता येईल.

➢ **मालमत्ता खाते -**

▪ **धोरणात्मक सुधारणा आणि आधुनिकीकरण -** शाश्वत व कार्यक्षम महसूल निर्मितीचे धोरण म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तांच्या सर्व नोंदी एकत्रित करण्यासाठी केंद्रीकृत मालमत्ता माहिती प्रणाली विकसित केली जात आहे. याद्वारे, PPP मॉडेलअंतर्गत महानगरपालिकेच्या रिक्त भूखंडांच्या वापराची चाचपणी यासारख्या भूखंड विकासाच्या अभिनव उपक्रमास चालना मिळेल. माहितीचे संगणकीकरण व भौगोलिक माहिती प्रणालीमध्ये एकत्रिकरण याद्वारे करण्यात येणारे मालमत्ता व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण सदर प्रणालीशी पूरक आहे. याद्वारे, सदर माहितीची तात्काळ उपलब्धता, एकत्रित आढावा आणि सुव्यवस्थित निर्णय प्रक्रिया या बाबी शक्य होतील. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तांचे कार्यक्षम आणि पारदर्शक व्यवस्थापन सुनिश्चित करण्याकरिता या केंद्रीकृत प्रणालीमार्फत मालमत्तांची मालकी, वापर, क्षेत्रांकन व मूल्य या संबंधीची माहिती संवादात्मक नकाशे व दस्तऐवज यांसह एकत्रित केली जाईल.

भाडेपट्टा, भाडेकरार आणि विक्रीचे व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यासाठी स्वयंचलित साधने उपयोगात आणली जात असून एका संरचित व्यवस्थापन पद्धतीद्वारे विवादांचे त्वरित निराकरण सुनिश्चित होत आहे. अतिक्रमणांचा पाठपुरावा करण्याकरिता मोबाईल साधनांचा वापर करण्यात येत असून संसाधनांचा सर्वोत्तम वापर व महसूल निर्मितीकरिता क्षेत्रांकन अनुपालनांची देखरेख आणि अल्प वापरातील मालमत्तांचा पुनर्विकास करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे.

▪ **भूखंड भाडेतत्वावर देण्याकरिता लिलाव -** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडांतून उत्पन्न मिळविण्याकरिता १००% वार्षिक दर तक्त्यानुसार (Annual Statement of Rates) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडांचा लिलाव करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने, अस्फाल्ट प्लांट, वरळी येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडांचा खाजगी विकासकांमार्फत विकास करण्यासाठी सदर भूखंड लिलावाद्वारे भाडेतत्वावर देण्याचे निश्चित केले आहे.

➢ **करमणूक कर / शुल्क -** दिनांक २९ मे, २०१७ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक XLII द्वारे महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमात केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने, यापूर्वी राज्य शासनाकडून आकारला जाणारा करमणूक कर / शुल्क गोळा करण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणांवर सोपविण्यात आली आहे. सदर सुधारणा दिनांक १ जुलै २०१७ पासून अंमलात आली आहे. या सुधारित तरतुदींनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील करमणूक कर / शुल्क वसूल करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सोपविण्यात आले आहेत.

महसूल व वन विभागाने महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम (१९२३ चा १) च्या कलम ३ अन्वये करमणूक शुल्कातून यापूर्वी दिलेली सूट महाराष्ट्र शासनामार्फत उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या उपकलम (३) अन्वये दि.१६ सप्टेंबर २०१७ पासून दि.३० सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरु ठेवण्यात आली आहे. सदर सवलतीच्या कालावधीनंतर करण्यात येणाऱ्या दुरुस्तीच्या अनुषंगाने करमणूक कर / शुल्काच्या आकारणीची अंमलबजावणी करण्यात येईल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करमणूक कर/शुल्क वसूल करण्याबाबत राज्य शासनाकडून अधिकृत अधिसूचना प्रसारित करणे आवश्यक आहे. राज्य शासनाकडे याबाबत कसोशीने पाठपुरावा करण्यात येईल.

➢ **जाहिरात धोरण -** मुंबईचे कॉस्मोपॉलिटन स्वरूप व वारसा यामुळे पर्यटक मोठ्या संख्येने या शहराकडे आकर्षित होतात. त्यामुळे, नवीन फलक धोरणाद्वारे (New Hoarding Policy) क्षैतिजिक देखाव्यातील अडथळे दूर करण्याचे प्रस्ताविले आहे. त्याअनुषंगाने, कलम ३२८/३२८अ अन्वये जाहिरातींसाठी दिल्या जाणाऱ्या परवान्यांसाठीचा नवीन जाहिरात मार्गदर्शिकेचा मसुदा प्रसारित करण्यात आला आहे. त्यावर सूचना व हरकती प्राप्त झाल्या आहेत. लवकरच सदर जाहिरात मार्गदर्शिका जाहीर करण्यात येईल. राज्य शासनाच्या शिफारशीनुसार सुशोभीकरण प्रकल्पासाठी मुंबईत अस्तित्वात असलेल्या जाहिरात फलक, आकाशचिन्हांचे डिजिटायझेशन करण्यात आले आहेत.

जागेचे भाडे, मालमत्ता कर व जाहिरात शुल्काद्वारे महसूलात वाढ करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा व इतर निश्चित ठिकाणे जाहिरातदारांना ई-निविदा/लिलावाद्वारे जाहिरातीसाठी देण्याचे प्रस्तावित आहे.

➢ **व्यवसाय परवाना शुल्क -** कलम ३९४ अन्वये व्यवसाय/उदिमांसाठी दिल्या जाणाऱ्या अनुज्ञापत्राचे नुतनीकरण शुल्क वाढविण्यासाठीचा प्रगतीपथावर असलेला प्रस्ताव नजिकच्या काळात अंतिम करण्यात येईल.

➢ **राज्य शासनाकडून येणे असलेली थकबाकी -** बृहन्मुंबई महानगरपालिकेस राज्य शासनाच्या विविध खात्यांकडून मालमत्ता कर, जल व मलनि:सारण आकार, इत्यादीपोटी खूप मोठ्या प्रमाणावर रक्कम येणे आहे. सदर रकमेच्या वसुलीकरिता अथवा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून राज्य शासनाच्या विविध खात्यांना देय असलेल्या रकमेशी सदर वसुलीचे समायोजन करण्याकरिता कसोशीने प्रयत्न करण्यात येत आहेत.

## ❖ खर्चाचे सुसूत्रीकरण:

- संबंधित आर्थिक वर्षामधील महसूली खर्च उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत नियंत्रित करण्याचे योजिले आहे.
- उपलब्ध मनुष्यबळाच्या क्षमतेचा पूर्ण वापर करुन कमीतकमी आस्थापना खर्चामध्ये कामांचे नियोजन करण्यात येईल.
- ऊर्जा संवर्धन करण्याच्या आणि वीज खर्चामध्ये किमान १०% कपात करण्याच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
- प्रकल्प कामांवरील भांडवली खर्चातील वाढीमुळे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होणार असल्याने प्रचलन व परिरक्षणावर होणारा महसूली खर्च कमी करण्यावर भर दिला जाईल.
- अत्यावश्यक व टाळता न येणारी कामे हाती घेण्याकरिता त्या कामासाठी लागणाऱ्या निधीच्या उपलब्धतेची खात्री केल्यानंतरच सदर कामे विहित पद्धतीने हाती घेण्याकरिता प्राधान्य दिले जाईल.

# पायाभूत सेवासुविधांचे सक्षमीकरण

*“उत्तम पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे म्हणजे भविष्यासाठी गुंतवणूक करणे— आर्थिक विकास, सामाजिक समता आणि सर्वांसाठी उच्च जीवनमानाची पायाभरणी करणे”*

पायाभूत सुविधा हा शहराच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सक्षम पायाभूत सुविधांसह मुंबईला आधुनिक, कार्यक्षम आणि परिस्थितीनुकूल शहरात रुपांतरित करण्याच्या आपल्या ध्येयावर बृहन्मुंबई महानगरपालिका दृढ आहे. परस्परपूरक वाहतुकीसाठी रस्ते, पूल व उड्डाणपूल यांचे बांधकाम आणि देखभाल यासारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने गुंतवणूक केली जात आहे.

हरित जागा, सुधारित आरोग्य पायाभूत सुविधा, वाहतूकीच्या उपाययोजना, चालण्यायोग्य पदपथ, अत्याधुनिक वाहतूक व पार्किंग व्यवस्था या उपक्रमांद्वारे शहराच्या सर्वांगीण शाश्वत विकासाचे ध्येय साध्य करण्यावर भर दिला जात आहे.

❖ **<u>शहरी गतिशीलता</u>**:

- **रस्त्यांचे वाढते जाळे -** बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुमारे २,०५० कि.मी. रस्त्यांचे परिरक्षण केले जाते. तत्कालीन मान.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशांनुसार सर्व डांबरी/पेव्हर ब्लॉक रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण हाती घेण्यात आले आहे. आतापर्यंत, सुमारे १,३३३ कि.मी. रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण पूर्ण झाले आहे. यामध्ये, उपनगरांमधील आरे रोड, अंधेरी कुर्ला लिंक रोड आणि नारायण दाभोळकर मार्ग, सर पोचखानवाला मार्ग, शहीद भगतसिंग मार्गापासून नेव्ही नगरला जोडणारा नानाभाई मुस मार्ग आणि शहर परिसरातील इतर प्रमुख रस्त्यांचा समावेश आहे.

उर्वरित रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याचे काम दोन टप्प्यामध्ये हाती घेण्यात आले असून त्यापैकी पहिल्या टप्प्यामधील एकूण ६९८ रस्त्यांची कामे (३२४ कि.मी.) जानेवारी २०२३ पासून सुरु करण्यात आली आहेत. त्यापैकी, अद्यापपर्यंत १८७ रस्त्यांची कामे (सुमारे २६%) पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत. दुसऱ्या

टप्प्यामध्ये एकूण १४२० रस्त्यांचे (३७७ कि.मी.) काँक्रिटीकरण करण्याचे प्रस्तावित असून त्यापैकी ७२० रस्त्यांची कामे डिसेंबर २०२४ मध्ये सुरु करण्यात आली आहेत. टप्पा-१ मधील ७५% कामे व टप्पा-२ मधील ५०% कामे जून २०२५ पूर्वी पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे पावसाळ्यातील खड्डे पडण्याच्या समस्येचे प्रमाण कमी होईल.

याव्यतिरिक्त, पश्चिम उपनगरामधील मालाड पूर्व पोलिस हाऊसिंगजवळ रस्त्याचे बांधकाम, लगून रोडची सुधारणा, मालाड पश्चिमेकडील मालाड सांडपाणी प्रक्रिया केंद्राकडे जाणारा रस्ता, मागाठाणे बोरीवली पूर्व ते गोरेगाव पूर्व असा १२० फूट रुंदीचा डी.पी. रोड यासारखे विशेष प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. तसेच, पूर्व उपनगरामधील श्रीनगर सोसायटी ते पूर्व द्रुतगती महामार्गाच्या सेवा रस्त्यापर्यंतचा मार्ग, विक्रोळी (प) येथील पी. सोमन मार्ग व विक्रोळी (पू) येथील स्लिप रोडची सुधारणा करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचप्रमाणे, नाहूर (प) मधील फोर्टीस रुग्णालयाजवळील मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्याची सुधारणा करण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

रस्त्यांच्या कामांचा दर्जा राखण्याकरिता आय.आय.टी. मुंबई सारख्या प्रतिष्ठित संस्थेचे तज्ञ मार्गदर्शन घेण्यात येत आहे.

रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये झालेल्या या सुधारणांमुळे रस्त्यांच्या कनेक्टीव्हिटीमध्ये वाढ होणे अपेक्षित असून त्यामुळे प्रवास सुकर होईल.

- **वाहतूककोंडी सोडविण्याकरिता उपाययोजना -** दिनांक ११.१०.२०२४ रोजी तत्कालिन मान.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते Access Control Project चे भूमिपूजन व उद्घाटन करण्यात आले. सदर प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील एक संगमस्थान आणि पश्चिम द्रुतगती महामार्गावरील तीन संगमस्थानांची सुधारणा करण्याकरिता कार्यादेश देण्यात आलेला असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

वाहतूक विभागामार्फत पार्किंग ॲप विकसित करण्याचे योजिले असून सदर ॲपद्वारे नागरिक आपल्या सोयीनुसार वाहनतळांवरील जागांचे आगाऊ बुकिंग व ऑनलाईन प्रणालीद्वारे त्याचे अधिदान देखील करु शकतील.

वाहतूक व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी बृहन्मुंबईतील सिग्नल जंक्शन्सवर क्षेत्र वाहतूक नियंत्रण प्रणाली स्थापित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

या सर्व उपाययोजनांमुळे वाहतूक नियमनात सुधारणा होऊन रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होईल.

- **बहुस्तरीय यांत्रिकी वाहनतळ -** ए विभागातील फ्लोरा फाऊंटन (हुतात्मा चौक) जवळील अप्सरा पेन शॉप जवळील जागेत १९४ क्षमतेच्या वाहनतळाकरिता कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तसेच, जी/दक्षिण विभागातील वरळी अभियांत्रिकी केंद्र येथील जागेकरिता ६४० चार चाकी व ११२ दुचाकी वाहनांच्या जागेकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यान्वये भविष्यात जवळपास ८३४ वाहनांकरिता वाहनतळ उपलब्ध होईल. सदर कामांकरिता अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ मध्ये ₹२०० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.
- **Walkability -** मुंबई शहरातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होत असल्याने पदपथांवरील Walkability हा महत्वाचा विषय समोर येत आहे. शहराच्या Walkability मध्ये पदपथांची स्थिती, पदपथांची रुंदी, सुरक्षितता, वापराची सहजता, नियमित परिरक्षण, इत्यादीचा समावेश आहे. पादचाऱ्यांना अनुकूल असलेल्या पदपथांमुळे शहरातील Walkability ला प्रोत्साहन मिळते ज्यामुळे आरोग्य सुधारण्यास आणि वाहनांवरील अवलंबित्व व वाहतूककोंडी कमी करण्यास मदत होते. वापरास अधिक सुलभ, पादचारी व दिव्यांगांसाठी अनुकूल पदपथ तयार करण्यावर बृहन्मुंबई महानगरपालिका अधिक लक्ष केंद्रीत करीत आहे. त्यासाठी, 'युनिव्हर्सल पदपथ धोरण' तयार करण्यात आले असून ते बृहन्मुंबईत राबविण्याचे प्रस्तावित आहे.

**रस्ते व वाहतूक खात्याकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹४१११.५१ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹५१०० कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

- **धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्प -** सद्यस्थितीत, वांद्रे वरळी सागरी सेतू ते प्रिसेंस स्ट्रीट उड्डाणपूलापर्यंतची दक्षिण मार्गिका आणि नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग (मरीन ड्राईव्ह) ते वांद्रे वरळी सागरी सेतूपर्यंतची उत्तर मार्गिका दिनांक २७.०१.२०२५ पासून स. ७ ते रा. १२ पर्यंत सर्व दिवसांकरिता खुली करण्यात आली आहे. आजमितीपर्यंत, मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पाचे ९४.५०% काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजिले आहे.

हा प्रकल्प गेम चेंजर ठरला असून त्यामुळे सध्याच्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी दूर झाली आहे. तसेच, प्रवास कालावधी, इंधन खर्च व प्रदूषण यात कमालीची घट झाली आहे.

**मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पाकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२०९९.९३ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१५०७.२४ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

- **पूल -** पूल खात्यामार्फत जीर्ण पुलांचे निष्कासन करुन पुनर्बांधणी करण्याचे काम, पुलांच्या मोठया संरचनात्मक दुरुस्त्या व पूलांच्या किरकोळ दुरुस्त्या तसेच गोरेगाव मुलुंड लिंक रोड, मुंबई किनारी रस्ता (उत्तर) प्रकल्प, दहिसर (प) ते भाईंदर (प) पर्यंत उन्नत मार्ग (किनारी रस्त्याचा अंतिम भाग), मढ वर्सोवा पूल, महाराष्ट्र नगर पूल, ऑरेंज गेट पूल, सायन रेल्वे स्थानक येथील रुळांवरील पूल, इत्यादी प्रतिष्ठित व महत्त्वाचे पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

- विक्रोळी पूल, नाहूर पूल (टप्पा-१), गोखले पूल व कर्नाक पूल या रेल्वेरुळांवरील उड्डाणपुलांचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करुन हे पूल वाहतुकीस खुले करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील आहे. तसेच, बेलासीस पुलाचे काम करण्यासाठीचा कंत्राट कालावधी एप्रिल २०२६ पर्यंत आहे. तथापि, सदर पुलाचे बांधकाम नियोजित कालावधीपूर्वी पूर्ण करुन सन २०२५ अखेरपर्यंत वाहतुकीस खुला करण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मानस आहे.

## पूलांची इतर उल्लेखनीय कामे

| सन २०२४-२५ मध्ये पूर्ण करण्यात आलेले प्रकल्प | |
|---|---|
| अ.क्र. | पूलाचे नाव |
| १ | पी/उत्तर विभागांतर्गत लगून रोड,मालाड (प) येथील इलिया सरवत शाळेजवळील वाहतूक पुलाची पुनर्बांधणी |
| २ | पी/उत्तर विभागांतर्गत मालाड (प) मधील लिंक रोड वरील मिठ चौकी जंक्शन येथे नवीन उड्डाणपुलाच्या टप्पा-१ व २ चे बांधकाम |
| ३ | आर/मध्य विभागातील श्रीकृष्ण नगर येथील पुलाची पुनर्बांधणी (टप्पा-१ व २) |
| ४ | आर/मध्य विभागांतर्गत चारकोप, बोरीवली (प) मधील गोल्डन नेस्ट अपार्टमेंट जवळील पुलाची पुनर्बांधणी |
| ५ | आर/मध्य विभागातील एस.व्ही. रोड वरील कल्याण ज्वेलर्स जवळील पुलाची पुनर्बांधणी |
| ६ | आर/उत्तर विभागातील एन.एल. कॉम्प्लेक्समध्ये दहिसर नदीवरील २ नवीन पुलांचे बांधकाम |
| ७ | एम/पूर्व विभागातील आर.एन.ए. पार्क, चेंबूर येथील पुलाची पुनर्बांधणी |
| ८ | एम/पश्चिम विभागातील सर्वोदय बुद्धविहार, टिळक नगर येथील पुलाची पुनर्बांधणी |
| ९ | एल विभागातील पिनाकी हॉटेल, कुर्ला येथील मारवाह पुलाची पुनर्बांधणी |
| १० | एम/पश्चिम विभागातील टिळक नगर रेल्वे स्थानकाजवळील नाल्यावरील पादचारी पुलाची पुनर्बांधणी |
| ११ | एस विभागातील जॉली बोर्ड, कांजूरमार्ग (पू) येथील नाल्यावरील पुलाचे बांधकाम |
| १२ | एल विभागातील सत्य नगर, साकीनाका येथील नाल्यावरील पुलाची पूनर्बांधणी |
| १३ | जी/उत्तर विभागातील सेनापती बापट मार्गावरील माटूंगा रेल्वे स्टेशन जवळील रुपारेल महाविद्यालय येथील पादचारी पुलाचे बांधकाम |
| १४ | एफ/उत्तर विभागातील जे.के. केमिकल नाल्यावरील पादचारी पुलाचे बांधकाम |
| १५ | एफ/दक्षिण विभागातील आर.ए. किडवाई मार्गावरील फातिमा हायस्कूल जवळील पादचारी पुलाचे बांधकाम |

| मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणारे प्रकल्प | |
|---|---|
| अ.क्र. | पूलाचे नाव |
| १ | आर/मध्य विभागांतर्गत चारकोप, बोरीवली (प) येथील रवी अपार्टमेंट जवळील पुलाचे बांधकाम |
| २ | आर/दक्षिण विभागातील नंदराम चाळ, कांदिवली (प) येथील विद्यमान पादचारी पुलाचे निष्कासन आणि शंकर लेन व इराणी वाडी रस्ता क्र.४ ला जोडणाऱ्या नवीन पुलाचे काम |

| | |
|---|---|
| ३ | पी/दक्षिण विभागातील मृणालताई गोरे उड्डाणपूल अंतर्गत वालभट नाल्यावरील उड्डाणपुलाच्या टप्पा-१ व २ चे काम पूर्ण झाले असून टप्पा-३ चे काम प्रगतीपथावर आहे. |
| ४ | एच/पूर्व विभागातील वांद्रे (पू) ते धारावी सायन पर्यंत मिठी नदीवरील नवीन पूल |
| ५ | टी विभागातील जय हिंद कॉलनी, नानेपाडा नाल्यावरील पुलाचे बांधकाम |
| ६ | एस व टी विभागातील नाहूर रेल्वे स्थानक येथील रेल्वे रुळांवरील पूल (टप्पा-१) |
| ७ | ए व बी विभागातील कर्नाक पुलाचे पुनर्बांधकाम |

| प्रगतीपथावरील प्रकल्प | | |
|---|---|---|
| अ.क्र. | पूलाचे नाव | सद्यस्थिती |
| १ | अंधेरी येथील गोपाळ कृष्ण गोखले पुलाचे निष्कासन व पुनर्बांधणी | टप्पा-१ चे काम ११ महिन्यांमध्ये पूर्ण करण्यात आले आहे.<br>टप्पा-२ चे काम एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजिले आहे. |
| २ | जी/दक्षिण विभागातील नेहरू विज्ञान केंद्र व नेहरू तारांगणाला जोडणाऱ्या पादचारी भुयारी मार्गाचे बांधकाम आणि डॉ.ई.मोझेस मार्गापासून डॉ.ॲनी बेझंट मार्गापर्यंत नेहरू विज्ञान केंद्राला लागून असलेल्या नाल्यावरील पूल | १४% काम पूर्ण झाले आहे. |
| ३ | महालक्ष्मी रेल्वे स्थानकाजवळ डॉ.ई. मोझेस रोड आणि केशवराव खाडये मार्ग यावर रेल्वे रुळांवरील २ पुलांचे बांधकाम | ३५% काम पूर्ण झाले आहे. |
| ४ | केशवराव खाडये मार्ग येथील महालक्ष्मी स्थानकाजवळील बांधकाम सुरु असलेल्या पूर्वेकडील रेल्वे रुळांवरील केबल स्टेड पुलाचा एन.एम. जोशी मार्ग जंक्शन ते एस ब्रीज जंक्शन पर्यंत विस्तार आणि पश्चिमेकडील बाजूस हाजी अली जंक्शन जवळील महालक्ष्मी रेसकोर्स वाहतळामधून जाणाऱ्या बांधकामाधीन पुलाची एक मार्गिका वळविणे | १०% काम पूर्ण झाले आहे. |
| ५ | मुंबई सेंट्रल रेल्वेस्थानक येथील मुंबई सेंट्रल व ग्रँट रोड रेल्वे स्थानकांदरम्यान बेलासिस पुलाच्या पोहोच रस्त्यांचे निष्कासन व पुनर्बांधकाम | ५% काम पूर्ण झाले आहे. |
| ६ | जे.व्ही.पी.डी. जंक्शन, अंधेरी (प) येथील जुहू वर्सोवा रोड पासून सी.डी. बर्फीवाला रस्त्यापर्यंत उड्डाणपुलाचे बांधकाम | ३% काम पूर्ण झाले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७ | एस.व्ही. रोड येथील ओशिवरा नाल्यावरील जीर्ण वाहतूक पूल निष्कासित करुन नवीन पुलाचे बांधकाम (टप्पा-२) | २% काम पूर्ण झाले आहे. |
| ८ | पी/दक्षिण विभागात मृणालताई गोरे उड्डाणपुलाचा राम मंदिर रोड ते रिलिफ रोडपर्यंत विस्तार | ६५% काम पूर्ण झाले आहे. |

तसेच, घाटकोपर आणि विक्रोळी रेल्वे रुळांवरील पुलाचे काम, टिळक पूल दादर, रे रोड रेल्वे रुळांवरील पूल, भायखळा पूर्वेकडील पूल ही कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नेमलेल्या एम.आर.आय.डी.सी.एल. एजन्सीमार्फत (महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांची संयुक्त भागिदारी) हाती घेण्यात आली आहेत.

रस्त्यांच्या जाळ्यांमध्ये सुधारणा होऊन प्रवासाचा कालावधी कमी करण्याकरिता, रस्त्यांच्या एकंदर जोडणीत वाढ करण्याकरिता आणि प्रवाशांना प्रदूषण-मुक्त प्रवासाची संधी देण्याकरिता ही कामे उपयुक्त आहेत.

- **मुंबई किनारी रस्ता (उत्तर) प्रकल्प आणि गोरेगाव मुलुंड लिंक रस्त्याला जोडणारा मार्ग -** मुंबई किनारी रस्त्याचा वर्सोवा आंतरबदल ते दहिसर आंतरबदल असे या प्रकल्पाचे संरेखन आहे. सोबतच, किनारी रस्त्यावरील माईंडस्पेस मालाड जंक्शन आणि जी.एम.एल.आर. च्या गोरेगाव पूर्व येथील आरंभ बिंदूला जोडणारा उन्नत मार्ग प्रस्तावित आहे. यामुळे, मुंबईचे दक्षिण टोक व पश्चिम उपनगरे, मुलुंड व ठाण्याशी जोडली जातील.

या प्रकल्पाची क्षमता प्रतिदिन ७८,००० Passenger Car Units (PCU) (वर्सोवा ते मालाड) आणि ६२,००० PCUs (मालाड ते दहिसर) इतकी असेल. या प्रकल्पामध्ये विविध वैशिष्ट्ये असून त्यात १४.२ मी. व्यासाचे भारतातील सर्वात मोठे बोगदे अंतर्भूत आहेत. तसेच, ओपन गँट्री (Open Gantry), प्रेक्षणीय व्हिविंग गॅलरी, वाहतूक कोंडी टाळण्याकरिता बहुस्तरीय आंतरबदल, इत्यादी विविध आधुनिक सुविधा प्रस्तावित आहेत.

या रस्त्यामुळे वर्सोवा ते दहिसरमधील प्रवास कालावधी ३० ते ४० मिनिटांनी कमी होईल. तसेच, कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण ४८% ने म्हणजेच २२,५०० KMT वरुन ११,५०० KMT पर्यंत कमी होणे अपेक्षित आहे.

• **दहिसर (प) ते भाईंदर (प) पर्यंतचा उन्नत मार्ग (किनारी रस्त्याचा अंतिम भाग) -** पश्चिम उपनगरांमध्ये गतीमान प्रवासाकरिता आणि मुंबई व भाईंदर शहरांना जोडण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने हा प्रकल्प हाती घेतला असून या सिग्नल-विरहित मार्गामुळे वाहतूक सुकर होणार आहे. प्रतिदिन ७५,००० PCUs या प्रकल्पाचा लाभ घेऊ शकतील.

**मुंबई किनारी रस्ता (उत्तर) प्रकल्प आणि किनारी रस्त्याचा अंतिम भाग या प्रकल्पांकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२९०० कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹४३०० कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

• **गोरेगाव मुलुंड लिंक रोड -** हा प्रतिष्ठित प्रकल्प चार टप्प्यांमध्ये राबविण्यात येत आहे. तिसऱ्या टप्प्यामध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व आरे येथून अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे १३ मी. व्यासाच्या भूमिगत जोड बोगद्याचे काम अंतर्भूत असून त्याद्वारे भूमी अधिग्रहणावरील भांडवली खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होईल तसेच पर्यावरणास धक्का पोहोचणार नाही. मान.पंतप्रधान महोदयांच्या हस्ते दिनांक १३ जुलै, २०२४ रोजी या कामाचे उद्घाटन करण्यात आले आहे. गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाचे संपूर्ण काम सन २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे योजिले आहे.

गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर मुंबई उपनगरातील तीन मुख्य रस्ते आणि ठाण्यातील घोडबंदर रोड येथील वाहतूक कोंडी दूर होऊन प्रवासाच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात बचत होऊन सदर कालावधी ९० मिनिटांवरून २५ मिनिटे इतका कमी होईल. मुंबई उपनगरे तसेच ठाणे यामधील पूर्व-पश्चिम मार्ग जोडणी सुधारण्याकरिता हा प्रकल्प एक मुख्य दुवा आहे.

**गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पाकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१०७० कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१९५८.७३ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

**पूल खात्याकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹५५५५ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹८२३८.७३ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

❖ **प्रकल्पबाधितांकरिता सदनिका**:

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या नागरी व पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींसाठी पुरेशा सदनिका उपलब्ध करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रशासकीय परिमंडळाच्या गरजेचा आढावा घेण्यात आला. त्याअनुषंगाने, विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ मधील तरतूदींनुसार Land TDR व Construction TDR तसेच वर्धनक्षम तफावत निधी (Viability Gap Funding) म्हणून क्रेडीट नोट स्वरूपातील अधिमूल्याच्या मोबदल्यात खाजगी जमिन मालकांकडून प्रत्येक परिमंडळात ५,००० ते १०,००० पुनर्वसन सदनिका बांधून घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

प्रभादेवी, भांडुप (प), मुलुंड (पू), जुहू आणि मालाड (पू) येथील एकूण ३२,७८२ PAP सदनिकांच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी, मुलुंड व भाडुंप येथील सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर असून प्रभादेवी येथील प्रकल्प आराखड्यांच्या मंजूरीची कार्यवाही सुरू आहे. या पुनर्वसन सदनिका पुढील ३ ते ५ वर्षांमध्ये उपलब्ध होतील.

❖ **आरोग्य पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण**:

सद्यस्थितीत, मुंबईमध्ये सार्वजनिक रुग्णालयांच्या १५,३०२ रुग्णशय्या आणि खाजगी रुग्णालयांच्या ३१,०७६ रुग्णशय्या उपलब्ध आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांचा पुनर्विकास झाल्यानंतर यामध्ये ३,५१५ रुग्णशय्यांची भर पडणार आहे. यास्तव, नजिकच्या काळात मुंबईमध्ये एकूण ४९,८९३ रुग्णशय्या उपलब्ध होणार असून वर्ष २०२४ करीता २ कोटी इतकी लोकसंख्या गृहीत धरल्यानंतरदेखील सदर संख्या राष्ट्रीय आरोग्य धोरण, २०१७ च्या शिफारसी पेक्षा अधिक असणार आहे. उपलब्ध मनुष्यबळ, वित्तीय स्त्रोत, पायाभूत सुविधा आणि वैद्यकीय उपकरणांच्या सुयोग्य वापरावर लक्ष केंद्रीत करुन आरोग्य सेवांची कार्यक्षमता व दर्जा कायम राखणे महत्त्वाचे आहे.

उपनगरीय भागात खालील आरोग्य पायाभूत प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत ज्यामध्ये ऑँकोलॉजी, कार्डिओलॉजी, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, नेफ्रोलॉजी इत्यादी सुपर स्पेशालिटी सुविधांचा समावेश आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | रुग्णशय्यांची संख्या | पुर्णत्वाचा अपेक्षित कालावधी | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | मुलुंड (प) येथील म.तु. अगरवाल रुग्णालयाची पुनर्बांधणी | ४७० | मार्च २०२५ | ९०% काम पूर्ण झाले आहे. |
| २ | गोवंडी येथील शताब्दी रुग्णालय संकुलातील नवीन रुग्णालय इमारतीचे बांधकाम | ५८० | मार्च २०२५ | ९०% काम पूर्ण झाले आहे. |
| ३ | बोरीवली (प) येथील हरिलाल भगवती रुग्णालयाचा पुनर्विकास | ४९० | मे २०२५ | ९०% काम पूर्ण झाले आहे. |
| ४ | के.बी. भाभा रुग्णालय, वांद्रे (प) येथील नवीन बाह्यरुग्ण इमारतीचे बांधकाम तसेच जुन्या रुग्णालय इमारतीच्या मोठ्या दुरुस्तीचे काम | ४९७ | मार्च २०२६ | नवीन इमारतीचे काम पूर्ण झाले असून जुन्या इमारतीच्या दुरुस्तीचे काम लवकरच सुरू करण्यात येईल. |
| ५ | गोरेगांव (प) येथील सिध्दार्थ म्युनिसिपल सर्वसाधारण रुग्णालयाची पुनर्बांधणी | ३०६ | एप्रिल २०२६ | रुग्णालय व निवासी इमारतीचे ३०% काम पूर्ण झाले आहे. |
| ६ | संघर्ष नगर, कुर्ला (प) येथील नवीन सर्वसाधारण रुग्णालय आणि कर्मचारी वसाहत इमारतीचे बांधकाम | २९० | जुलै २०२६ | मुख्य रुग्णालय इमारतीच्या पायाभरणीचे काम पूर्ण झाले आहे. |
| ७ | कांदिवली (प) येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालय, निवासी वसतीगृह व इतर इमारतीचे बांधकाम | ३२५ | नोव्हेंबर २०२५ | सुपर स्पेशालिटी रुग्णालय इमारतीचे ३०% बांधकाम पूर्ण झाले आहे. |
| ८ | भांडूप मल्टी स्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम | ३६० | मे २०२६ | २०% काम पूर्ण झाले आहे. |
| ९ | घाटकोपर (पू) येथील राजावाडी रुग्णालयाचा पुनर्विकास | ११९० | नोव्हेंबर २०२९ | सदर काम EPC तत्वावर करण्यात येत आहे. |
| १० | विक्रोळी येथील क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचा पुनर्विकास | ५०० | ऑक्टोबर २०२७ | जुन्या इमारतीचे निष्कासन पूर्ण झाले आहे. |
| ११ | ई विभागातील कामाठीपुरा येथील सिध्दार्थ/मुरली देवरा नेत्र रुग्णालयाची (मल्टीस्पेशालिटी रुग्णालय) पुनर्बांधणी | १०० | नोव्हेंबर २०२५ | मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाचे १८% बांधकाम पूर्ण झाले आहे. |
| १२ | कांजूरमार्ग (पू) येथील माता व बालक आणि स्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम | ९० | मे २०२७ | आराखडे मंजूरीची कार्यवाही सुरु आहे. |

मुंबई उपनगरांमधील लोकसंख्या वाढीचा कल विचारात घेता, उपनगरीय रुग्णालयांमधील अतिदक्षता व नवजात शिशु अतिदक्षता विभागाच्या सेवा प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ असलेल्या संस्थांकडे बाह्यस्त्रोताद्वारे सोपवून विशेष व अतिविशेष सेवांचे विस्तारीकरण करण्यावर भर दिला जात आहे.

- **हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - आपला दवाखाना -** ३३ पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टीक सेंटरचा समोवश असलेल्या २५० ''हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'' मध्ये नागरिकांना मोफत वैद्यकीय तपासणी, औषधोपचार, रक्त चाचण्या या सेवा पुरविण्यात येत असून सदर सेवा सुरू केल्यापासून डिसेंबर २०२४ पर्यंत सुमारे ९० लाख रुग्णांनी या सेवांचा लाभ घेतला आहे. पॉलिक्लिनिक आणि डायग्नोस्टिक सेंटरमध्ये कान-नाक-घसा चिकित्सक, दंतचिकित्सक, स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, वैद्यकीय चिकित्सक, त्वचारोगतज्ञ, नेत्ररोगतज्ञ अशा विविध तज्ञांच्या सेवा पुरविण्यात येत आहेत. ''आपला दवाखाना'' आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर दवाखान्यांमध्ये खाजगी डायग्नोस्टिक सेंटरमार्फत एक्स-रे, मॅमोग्राफी, ई.सी.जी., सि.टी. स्कॅन, एम.आर.आय. या सेवा Voucher पध्दतीने अनुदानित दराने प्रदान करण्यात येत आहेत. याचबरोबर, आरे कॉलनी आणि एम/पूर्व विभागातील दुर्गम भागांमध्ये फिरत्या दवाखान्यांमार्फत (Mobile Clinic) आरोग्य सेवा देण्यात येत आहेत.

पुढील आर्थिक वर्षात आणखी २५ ''हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'' आणि ३ फिजिओथेरपी सेंटर्स सुरु करण्याचे नियोजिले आहे.

- **आरोग्य सेवांकरिता सार्वजनिक खाजगी भागीदारी** (PPP) **धोरण -** नागरिकांना परवडणाऱ्या आरोग्य सेवा सुलभतेने उपलब्ध व्हाव्यात या करीता बृहन्मुंबई महानगरपालिका PPP धोरण घेऊन येत आहे. विकास नियोजन आराखडा २०३४ अंतर्गत आरक्षित जमिनी, रुग्णालये, प्रसूतीगृहे, दवाखाने, इत्यादींचा या धोरणामध्ये समावेश केला जाईल. यामुळे, रुग्णांना करावा लागणारा खर्च आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेचा आवर्ती

खर्च कमी होईल. या सेवा दीर्घकाळ चालवण्यासाठी, पहिल्या टप्प्यात खालील आरोग्य सुविधांचे ३० वर्षांपर्यंत प्रचलन व परिरक्षण करण्याकरिता खाजगी संस्थांकडून स्वारस्य अभिरुची (EOI) मागविण्यात येतील.

- आर/उत्तर विभागातील ४९० रुग्णशय्यांचे भगवती रुग्णालय
- आर/मध्य विभागातील पंजाबी गल्ली डायग्नॉस्टिक सेंटर
- जी/उत्तर विभागातील जाखादेवी आरोग्य सुविधा केंद्र (दवाखाना व मल्टी-स्पेशालिटी क्लिनिक)
- एन विभागातील ३० रुग्णशय्यांचे विक्रोळी पार्कसाईट रुग्णालय
- एम/पूर्व विभागातील ३०० रुग्णशय्यांचे एम.एम.आर.डी.ए. मार्फत हस्तांतरित होणारे रुग्णालय.

## गुणवत्तापूर्ण आरोग्य आणि शिक्षण व्यवस्था

*"निरोगी व शिक्षित मनुष्य ही राष्ट्राची संपत्ती आहे."*

शहरातील रहिवाशांना दर्जेदार वैद्यकीय सेवा आणि शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. रूग्णालये, दवाखाने, शाळा आणि इतर आस्थापनांच्या सुसज्जतेतून बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे.

### ❖ आरोग्य सुविधा:

बृहन्मुंबई महानगरपालिका ही सर्व त्रिस्तरीय आरोग्य सेवा पुरविणारी देशातील एकमेव महानगरपालिका आहे. यामध्ये, २१२ आरोग्य केंद्रांमार्फत प्राथमिक प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, १९२ दवाखाने, २५० ''हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे - आपला दवाखाना'', ३० प्रसूतीगृहे, ५ विशेष रुग्णालयांमार्फत प्राथमिक उपचारात्मक आरोग्य सेवा

तसेच १६ उपनगरीय रुग्णालयांमार्फत द्वितीय स्तरावरील वैद्यकीय उपचार आणि ४ वैद्यकीय व १ दंत महाविद्यालयासह ५ प्रमुख रुग्णालयांमार्फत तृतीय स्तरावरील वैद्यकीय उपचार यासारख्या सर्वसमावेशक सेवा पुरविल्या जातात.

प्रमुख रुग्णालयांमध्ये प्रतिवर्षी सरासरी ६० लाखाहून अधिक बाह्यरुग्ण, २.५ लाखाहून अधिक आंतररुग्ण आणि शस्त्रक्रियांसाठी १.५ लाखाहून अधिक रुग्ण दाखल होतात. त्याचप्रमाणे, उपनगरीय रुग्णालयांमध्ये प्रतिवर्षी सरासरी ४२ लाखाहून अधिक बाह्यरुग्ण, २.५ लाखाहून अधिक आंतररुग्ण आणि शस्त्रक्रियांसाठी ४२,००० हून अधिक रुग्ण दाखल होतात. या व्यापक आरोग्य सुविधांमुळे मुंबईकरांकरिता सर्वसमावेशक आणि सुलभ आरोग्य सेवांची निश्चिती होते.

- **आरोग्य सेवांचा विस्तार आणि सुधारणा -**

➢ नायर रुग्णालयामध्ये समर्पित कर्करोग विभाग व आपत्कालीन विभाग इमारतीचे काम जोमाने सुरु आहे.

➢ रा.ए.स्मा., नायर आणि लो.टि.म.स. रुग्णालय येथे डायलेसिस सेवांचा विस्तार आणि कृत्रिम गर्भधारण सेवा (IVF) सुरु केल्याने सेवांची व्याप्ती वाढली आहे.

➢ डॉ.आर.एन. कूपर रुग्णालय व हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय येथे लिनियर एक्सिलरेटरसह सर्व आवश्यक कर्करोग उपचार सुविधा असलेले १५० रुग्णशय्यांचे समर्पित कर्करोग युनिट आणि वांद्रे (प) येथे धर्मशाळेचे काम सुरु आहे.

➢ लो.टि.म.स. रुग्णालय पुनर्विकासाच्या टप्पा-१ मध्ये, नर्सिंग कॉलेज आणि निवासी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाचे काम पूर्णत्वास आले आहे. टप्पा-२ मध्ये, मुख्य रुग्णालयाच्या इमारतीसह रेडिएशन (लिनियर एक्सिलरेटर) उपचार सुविधेचा समावेश असलेल्या स्वतंत्र समर्पित ऑन्कोलॉजी इमारतीचे काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

➢ सेठ गो.सु. वैद्यकीय महाविद्यालय व रा.ए.स्मा. रुग्णालयाच्या शताब्दी वर्षाचा शुभारंभ दि.१८.०१.२०२५ रोजी मान.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते पार पडला. शताब्दी वर्ष साजरे करण्याकरिता जानेवारी २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या निमित्ताने, मान.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते शताब्दी टॉवर व कर्मचारी भवनाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

तसेच, रा.ए.स्मा. रुग्णालयातील निवासी विद्यार्थ्यांसाठी वडाळा येथील अॅक्वर्थ रुग्णालय परिसरात वसतीगृहाचे काम प्रगतीपथावर आहे.

- **शून्य प्रिस्क्रिप्शन धोरण -** मागील वर्षापासून शून्य प्रिस्क्रिप्शन धोरणाची अंमलबजावणीची सुरू करण्यात आली असून पुढील दोन वर्षासाठी दरसूची अंतिम करण्याची निविदा अंतिम टप्प्यात आहे. सद्यस्थितीत, रुग्णालय स्तरावर सर्व आवश्यक औषधे उपलब्ध करून दिली जात आहेत.
- **घरोघरी आरोग्य तपासणी मोहिम -** 'आरोग्य सेवा आपल्या दारी' या योजने अंतर्गत संपूर्ण मुंबईमध्ये घरोघरी आरोग्य तपासणी मोहिम (House to House Health Check-up Drive) सुरु करण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मानस आहे.
- **DNB अभ्यासक्रम -** यावर्षी ११२ विद्यार्थ्यांनी १० विषयांमध्ये DNB अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतला आहे. या उपक्रमामुळे उपनगरीय रुग्णालयांमधील सेवांची दर्जोन्नती होऊन ही रुग्णालये अधिक कार्यक्षम झाली आहेत. तसेच, सन २०२५-२६ मध्ये DNB पदवी (कान, नाक, घसा) व DNB पदविका (बधिरीकरणशास्त्र) हे अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.
- **असंसर्गजन्य रोग प्रतिबंध कार्यक्रम -** ''आरोग्यम् कुटुंबम्'' कार्यक्रमांतर्गत, आतापर्यंत ३० वर्षांवरील २३ लाख नागरिकांची उच्च रक्तदाबाची तपासणी करण्यात आली असून पुढील वर्षभरात वयोवृध्द नागरिकांवर जास्त लक्ष केंद्रीत करुन आणखी ३० लाख नागरिकांची तपासणी करण्याचे योजिले आहे. सन २०२५ पर्यंत दैनंदिन आहारात मीठाचे प्रमाण ३०% ने कमी करण्याच्या दृष्टीने, शाळा, महाविद्यालये व

वस्तीपातळीवरील महिलांना सोबत घेऊन ''मीठ आणि साखर जागरुकता अभियान'' व इतर विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

सन २०२४-२५ मध्ये, विभाग पातळीवर दंत चिकित्सकांद्वारे तोंडाच्या कर्करोगाची तपासणी सुरु करण्यात आली आहे. सन २०२५-२६ मध्ये कर्करोग तपासणीची व्याप्ती वाढविण्यासाठी, खाजगी क्षेत्राचा समावेश करण्यात येईल. ''विभागनिहाय सर्वसमावेशक कर्करोग सेवा मॉडेल'' अंतर्गत तोंड, स्तन आणि गर्भाशयमुख यांच्या कर्करोग नियंत्रणासाठी तपासणी, निदान व संदर्भ सेवा तसेच रुग्णांना समुपदेशन व मार्गदर्शन याचा अंतर्भाव आहे. प्रत्येक विभागातील दवाखाना / आरोग्य केंद्रामध्ये Cancer Screening Clinic सेवा महिन्यातून एक/दोन दिवस सुरु करण्यात येईल.

सन २०२५-२६ मध्ये, ९ ते १४ वर्ष वयोगटातील शाळकरी मुलींना गर्भाशयमुखाच्या कर्करोगावरील HPV लसीकरण प्राथमिक तत्त्वावर करण्याचे योजिले आहे.

- **क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम -** सन २०२५-२६ मध्ये, संक्रमण रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून प्रत्येक क्षयरुग्णास मास्क, सॅनिटायझर आणि स्पिटून असलेला एक संच देण्यात येणार आहे. XDR Cartridges या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित चाचणीद्वारे काही तासांमध्ये MDR रुग्णांचे निदान होते. मुंबईत ही चाचणी लवकरच सुरु करण्यात येईल. MDR रोखण्याकरिता नवीन BPaL औषधपध्दतीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कस्तुरबा रुग्णालय येथील क्षयरोग प्रयोगशाळेमध्ये Targeted Next Generation Sequencing (TNGS) ही अत्याधुनिक चाचणी प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येईल. क्षयरुग्णांच्या रक्तांमधील औषधांचे प्रमाण तपासण्यासाठी Therapeutic Drug Monitoring (TDM) ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

- **कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन -** सर्व गर्भवती महिलांचे, विशेषत: अति जोखमीची परिस्थिती असलेल्या गर्भवती महिलांचे समुपदेशन आणि पाठपुरावा करण्याकरिता प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत ३८ 'माँ मित्र' हेल्पडेस्क सुरू करण्यात येणार आहेत. विनामूल्य

स्वयंचलित व्हॉईस कॉल्स व एस.एम.एस. च्या माध्यमातून गर्भवती महिलांचे समुपदेशन करण्यात येईल. त्याचप्रमाणे, एक वर्षापर्यंतच्या बाळांच्या संपूर्ण लसीकरणासाठीदेखील कॉल्स केले जाणार आहेत.

झोपडपट्टी भागातील किशोरवयीन मुलामुलींच्या मानसिक, प्रजनन व आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी ३३ आरोग्य केंद्रांमध्ये किशोर केंद्रे सुरु करण्यात येणार आहेत.

बालमृत्यू कमी करण्याकरिता, राज्य शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत, कुपोषित बालकांच्या उपचार व व्यवस्थापनाकरिता २ उपनगरीय रुग्णालयांमध्ये ‘Nutrition Rehabilitation Centers’ स्थापित करण्यात येणार आहेत.

सेठ ए.जे.बी. महानगरपालिका कान, नाक, घसा रुग्णालयामध्ये बहिऱ्या-मुक्या मुलांच्या कॉक्लियर ईप्लांट शस्त्रक्रियेची सुविधा लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

- **विस्तारीत लसीकरण कार्यक्रम -** बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात दरवर्षी सुमारे ५२,००० लसीकरण सत्रे आयोजित केली जातात. ९ आरोग्य केंद्रांमध्ये ‘टायफॉईड सेन्टीनल सर्व्हेलन्स’ सुरू करून टायफॉईड आजाराच्या प्रादुर्भावाची समस्या हाताळण्यात येणार आहे.

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये आरोग्य खात्याच्या महसुली अर्थसंकल्पांतर्गत ₹५२०७.७० कोटी व भांडवली अर्थसंकल्पांतर्गत ₹२१७२.७३ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

❖ <u>**शिक्षणातून उन्नती**</u> :

- **सन २०२४-२५ मधील संक्षिप्त सारांश**

➢ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या एकूण ४७९ शालेय इमारती आहेत. मार्च २०२५ पर्यंत शाळांच्या दुरूस्ती, दर्जोन्नती, पुनर्बांधणी व नवीन बांधकामांची एकूण ४५ कामे पूर्ण करण्यात येणार असून उर्वरित ३६ कामे आगामी आर्थिक वर्षामध्ये पूर्ण करण्यात येतील.

➢ सन २०२४-२५ मध्ये, CBSE मंडळाच्या ४ नवीन शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत, CBSE मंडळाच्या १८ आणि ICSE, IGCSE व IB मंडळाची प्रत्येकी १ अशा एकूण २१ शाळा सुरू आहेत.

➢ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील एकूण ७,९३४ वर्गखोल्यांपैकी ३,८१४ वर्गखोल्या डिजीटल करण्यात आल्या असून उर्वरीत ४,१२० वर्गखोल्या टप्प्याटप्याने डिजीटल करण्यात येणार आहेत.

➢ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व माध्यमिक शाळांमध्ये १२ प्रकारच्या अभ्यासक्रमांसह एकूण २२० कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात आली असून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत.

➢ शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टलमार्फत निवड झालेल्या ६२२ पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

➢ अवकाशात घडणाऱ्या विविध खगोलीय घटनांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होऊन त्यांच्या खगोलीय ज्ञानाच्या कक्षा वृध्दींगत करण्याकरिता तसेच वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या वाढीकरिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० अंतर्गत प्रायोगिक तत्वावर खगोलशास्त्रीय प्रयोगशाळा उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे.

➢ प्राथमिक विभागाच्या २५ शाळांमध्ये नाविन्यपूर्ण गणित व विज्ञान केंद्रांची उभारणी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

➢ माध्यमिक शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील गुणानुक्रमे प्रथम १०० विद्यार्थ्यांकरिता तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांच्या ज्या पाल्यांनी माध्यमिक शालांत परीक्षेत ६०% किंवा त्याहून अधिक गुण प्राप्त केले असतील अशा गुणानुक्रमे प्रथम १०० पाल्यांकरिता आर्थिक सहाय्य योजना सुरू करण्यात आल्या आहेत.

➢ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २०० शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरिता खुल्या व्यायामशाळा उभारण्यात आल्या आहेत.

➢ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शहर विभागातील १०० शाळांमध्ये ऑरगॅनिक फार्मिंग (किचन गार्डन) ही संकल्पना राबविण्यात आली आहे.

- **आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील नवीन प्रकल्प व कल्याणकारी योजना -**

➢ **Mission Vision 27 -** पुढील दोन वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना अधिकाधिक सक्षम बनविण्याची दूरदृष्टी ठेवून शिक्षकांना मार्गदर्शन करण्याकरिता दि.२३.१०.२०२४ रोजी अण्णाभाऊ साठे सभागृह, जिजामाता उद्यान, भायखळा (पू) येथे "Mission Vision 27" कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

➢ **Mission SAMPURN -** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सर्व क्षेत्रांचा विचार करून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून 'Mission SAMPURN' (**S**chool Infrastructure, **A**dmission, **M**erit, **P**roductivity, **U**niversalisation, **R**esponsibility, **N**utrition and Health) राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

➢ **विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (STEM) रोबोटिक्स -** विद्यार्थ्यांमध्ये इतर कौशल्यांसोबतच विज्ञान आणि तंत्रज्ञानाबाबत सखोल रुची निर्माण करण्याकरिता आणि त्यांची विश्लेषण क्षमता व कल्पकता वृद्धींगत करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी STEM रोबोटिक्स प्रयोगशाळा उभारण्याचे प्रस्तावित आहे.

➢ **पूरक पोषण आहार -** विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील बालवाडी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासह पूरक पोषण आहार देण्याचा शिक्षण विभागाचा मानस आहे.

➢ **विज्ञान पार्क -** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २ शालेय इमारतींमध्ये प्रायोगिक तत्त्वावर विज्ञान पार्क उभारण्याचे प्रस्तावित आहे.

➢ **इंग्रजी भाषा प्रयोगशाळा -** शालेय इमारतींमध्ये सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या संगणक प्रयोगशाळा, ई-वाचनालय व शैक्षणिक टॅब इ. सुविधांसोबतच एक नवीन स्वतंत्र इंग्रजी भाषा प्रयोगशाळा उभारण्याचेदेखील प्रस्तावित आहे.

➢ **सायबर साक्षरता -** शैक्षणिक विकासासाठी इंटरनेटचा वापर करताना कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी हे विद्यार्थ्यांना समजण्याकरिता आणि वैयक्तिक, शैक्षणिक व व्यवसायिक कामकाजात इंटरनेटचा वापर करताना होणारी ऑनलाईन फसवणूक टाळण्याकरिता सायबर साक्षरता हा प्रकल्प राबविण्याचे देखील प्रस्तावित आहे.

➢ **जादुई पेटारा (ज्ञानपेटी) -** विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला व कल्पकतेला वाव देऊन त्यांना आनंददायी शिक्षण मिळावे या करीता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० अंतर्गत जादुई पेटारा (ज्ञानपेटी) ही संकल्पना राबविण्यात येणार आहे.

➢ **बोलक्या भिंती -** शालेय इमारतींच्या संरक्षक भिंतींवर आतल्या बाजूस शैक्षणिक, नैतिक मूल्ये व सामाजिक जबाबदारीचे संदेश देणारी चित्रे चित्रित करण्यात येणार आहेत. त्याद्वारे, शालेय अभ्यासक्रमातील एखादी संकल्पना स्पष्ट करत असताना सदर आशयाचे चित्र दाखविले असता विद्यार्थ्यांना ती संकल्पना लवकर समजण्यास मदत होईल.

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये शिक्षण खात्याच्या महसुली अर्थसंकल्पांतर्गत ₹३५४४.३४ कोटी व भांडवली अर्थसंकल्पांतर्गत ₹४११.३० कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

## स्वच्छ आणि शाश्वत पर्यावरण

*"पर्यावरणकेंद्रित नागरी व्यवस्थापन हा पर्यावरणीय शाश्वततेचा पाया आहे ज्याद्वारे कचऱ्याचे संसाधनांमध्ये रुपांतर होते तसेच येणाऱ्या पिढ्यांसाठी स्वच्छ आणि हरित भविष्याची सुनिश्चिती होते."*

पर्यावरणीय शाश्वततेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि मुंबईला पर्यावरणपूरक शहर बनविण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत.

नियोजनपूर्वक देखरेख आणि वायू प्रदूषण कमी करण्यासाठीच्या उपाययोजनांची कडक अंमलबजावणी करून हवेच्या गुणवत्तेची समस्या सक्रियतेने हाताळण्यात येत आहे. हवेची गुणवत्ता सुधारण्यासोबतच स्वच्छ ऊर्जा, स्थितीनुकूलता निर्माण करणे, शाश्वत कचरा व्यवस्थापन, शहरी हरितक्षेत्र व जैवविविधता, शहरी पूर तसेच हरित जंगले आणि तलावांचे संरक्षण यावरदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका लक्ष केंद्रीत करीत आहे.

❖ **<u>हवामान कृती</u>**:

- **मुंबई हवामान कृती आराखडा -** पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून वातावरणीय बदलाच्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी अनुकूलन, नियंत्रण आणि स्थापकत्व निर्मितीच्या उपक्रमांद्वारे धोरणात्मक व समग्र उपायांवर भर दिला जात आहे. या विभागामार्फत उर्जा व इमारती, परस्परपूरक वाहतूक, शाश्वत कचरा व्यवस्थापन, शहरी हरितीकरण व जैवविविधता, वायू गुणवत्ता, शहरी पूर आणि जलसंपदा व्यवस्थापन या क्षेत्रांसंबंधी मुंबई हवामान कृती आराखडयातील उद्दिष्टे साध्य करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खात्यांसोबत समन्वय साधण्यावर प्रामुख्याने भर दिला जात आहे.

शहराची पर्यावरण व हवामान संबंधित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पर्यावरण संरक्षण, ज्ञान व माहिती, पर्यावरण व हवामान बदल या तीन मुख्य क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करुन प्रत्यक्ष उपाययोजना राबविण्याकरिता आम्ही कटिबध्द आहोत. कठोर धोरणे आणि देखरेखीतील वाढीतून स्वच्छ आणि निरोगी मुंबईसाठी आमची वचनबध्दता अधोरेखित होते.

- **वायू प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजना -** पुढील विविध धोरणात्मक उपाययोजना आणि वायू प्रदूषण नियंत्रणाच्या तरतूदींच्या कठोर अंमलबजावणीद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिका वायू गुणवत्ता संबंधित समस्यांचे निराकरण करीत आहे.

➢ बांधकाम प्रकल्पांसाठी २८ मुद्यांची मार्गदर्शक सूचना, बृहन्मुंबई महानगरपाालिकेच्या कामांकरिता ''पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडा''.

➢ २८ मार्गदर्शक सूचनांच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करण्याकरिता विभाग स्तरावर अभियंता, क्लिनअप मार्शल आणि पोलिस यांचा समावेश असलेली ९५ पथके तयार करण्यात आली आहेत.

➢ रस्ते धुण्याच्या कामाकरिता ५,००० लीटर क्षमतेचे ६७ टँकर्स आणि ९,००० लीटर क्षमतेचे ३९ टँकर्स विभाग स्तरावर दररोज वापरात आहेत. वायू प्रदूषण टाळण्यासाठी विभाग स्तरावर दोन पाळ्यांमध्ये मिस्टिंग मशीन्स तैनात करण्यात आल्या आहेत.

➢ रस्त्यावरील धूळ आटोक्यात आणण्यासाठी दररोज सरासरी २५० किमी रस्त्यांची यांत्रिकी पध्दतीने सफाई केली जात आहे.

➢ शहरातील वायू गुणवत्तेच्या स्थितीवर सतत देखरेख ठेवण्याकरिता ५ नवीन अविरत वातावरणीय वायू गुणवत्ता देखरेख केंद्रे आणि ४ मोबाईल व्हॅन्सची खरेदी करण्याचे प्रस्ताविले आहे.

➢ वातावरणात रस्त्यावरील धुळीमुळे होणारे वायू प्रदूषण शमनासाठी १०० बॅटरी आधारित सक्शन मशीन (प्रती विभाग ४) खरेदी करण्याचे प्रस्ताविले आहे.

➢ बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे मुंबई महानगर क्षेत्रातील वायू प्रदुषणाचे स्त्रोत ओळखून उत्सर्जन सूची तयार करणेचे काम करण्यात येणार आहे.

➢ बृहन्मुंबई महानगरपालिकेने भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था, पुणे यांच्या विद्यमाने वायू गुणवत्ता अंदाजाची प्रगत प्रणाली विकसित करण्याचे काम देखील प्रस्ताविले आहे. सदर प्रणाली धूलिकणांद्वारे होणाऱ्या प्रदूषणामधील स्थानिक, प्रादेशिक आणि दूरच्या स्त्रोतांच्या उत्सर्जनाचे परिणाम ठरवून ७२ तास आधी वायू गणुवत्तेचा अंदाज देईल आणि संभाव्य उत्सर्जन कमी करण्याकरिता उपाययोजना प्रदान करेल. जेणेकरुन, बृहन्मुंबई महानगरपालिका वायू प्रदूषण कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक व नियंत्रणाच्या उपाययोजना राबवू शकेल.

➢ नागरिकांना आसपासच्या परिसरातील वायू प्रदुषणासंबंधी तक्रारी नोंदविण्यासाठी विभाग कार्यालये, महानगरपालिकेचे संकेतस्थळ, संपर्क क्रमांक या सध्याच्या तक्रार नोंदणी यंत्रणेसोबतच ‘मुंबई एअर’ ॲप उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

➢ आयआयटी कानपूर यांच्याकडून वायू प्रदुषणाच्या स्थानिक स्त्रोतांवर देखरेख ठेवण्याकरिता Low Cost Sensor बसविण्याचा ‘‘Mumbai Air Network for Advanced Science (MANAS)’’ हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने छाननी करण्यात येत आहे.

➢ मुंबई हवामान व कृती आराखडा तसेच पर्यावरणीय बाबींवर परिणामकारकरित्या काम करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सक्षमीकरण सुरु आहे.

➢ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार, लाकूड किंवा जैव इंधनावर आधारित पावभट्ट्यांमध्ये (बेकरी) विद्युत व पी.एन.जी. यासारख्या स्वच्छ इंधनाच्या वापराकरिता पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाद्वारे समन्वय साधला जात आहे.

➢ महानगरपालिकेद्वारे दिल्या जाणाऱ्या परवानग्यांमध्ये (जसे की IOD/CC) बांधकाम प्रवर्तकांना वायू प्रदूषण नियंत्रणाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन बंधनकारक करण्यासंबंधीच्या अटींचा समावेश करण्यात आला आहे.

• **वातावरणीय अर्थसंकल्प –** बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दिनांक ५ जून, २०२४ (जागतिक पर्यावरण दिन) रोजी पहिले “Green Budget Book” (वातावरणीय अर्थसंकल्प अहवाल आर्थिक वर्ष २०२४-२५) प्रकाशित करण्यात आले असून जागतिक स्तरावर वातावरणीय अर्थसंकल्प अहवाल प्रकाशित करणारे मुंबई हे चौथे शहर ठरले आहे. मुंबई हवामान कृती आराखडयामध्ये अंतर्भूत केलेल्या आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या एकूण भांडवली खर्चाच्या सुमारे ३२% टक्के हिस्सा असलेल्या क्षेत्रांशी सुसंगत भांडवली उपक्रमांचा “Green Budget Book” मध्ये समावेश आहे.

**पर्यावरण खात्याकरिता सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹११३.१८ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

• **Net Zero संकल्पनेअंतर्गत इमारत -** केंद्र शासनाच्या धोरणानुसार एच/पूर्व विभाग कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम नगर अभियंता खात्यामार्फत नेट झिरो या संकल्पनेवर करण्याचे योजिले आहे. या संकल्पनेनुसार, सदर इमारतीस लागणाऱ्या विद्युत उर्जेच्या तुलनेत अधिक सौर उर्जा निर्माण करण्याचे नियोजन आहे. तसेच, Net Zero Waste आणि Net Zero Water या संकल्पना राबविण्यात येणार आहेत.

• **प्रधानमंत्री सूर्य घर: मुफ्त बिजली योजना -** मान.पंतप्रधान महोदयांनी दि.१५ फेब्रुवारी २०२४ रोजी जगातील सर्वात मोठ्या domestic rooftop solar उपक्रमाचा शुभारंभ केला. महानगरपालिकेच्या मालमत्तांकरिता सदर उपक्रम महावितरणाच्या मदतीने राबविण्याचे प्रस्तावित आहे. या उपक्रमामुळे अक्षयऊर्जा अधिक स्वस्तात व सुलभरित्या उपलब्ध होईल.

❖ <u>**स्वच्छ शहर आणि स्वच्छ हवा**</u>:

• **स्वच्छ भारत अभियान २.० -** या अभियानाच्या उद्दिष्टांमध्ये कचऱ्याचे घरगुती स्तरावर विलगीकरण, जुन्या साठलेल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया, आकांक्षी शौचालये, १००% सांडपाणी संकलन / व्यवस्थापन / प्रक्रिया / विल्हेवाट, इत्यादीचा प्रामुख्याने समावेश आहे. या अभियानांतर्गत, राज्य शासनाकडून मुंबई शहर स्वच्छता कृती आराखडा मंजूर करण्यात आला असून यामध्ये मुंबईत १५,००० सामुदायिक शौचकुपे, चल (floating) लोकसंख्येसाठी ४०० आकांक्षी शौचालये, ४,६७२ घरगुती शौचालये आणि ५०० प्रसाधनगृहांचा समावेश आहे.

• **स्वच्छता ही सेवा -** केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार, दिनांक १७ सप्टेंबर २०२४ ते दिनांक २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' या संकल्पनेसह "स्वच्छता ही सेवा" मोहीम हाती घेण्यात आली. दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबईत समुद्रकिनारा स्वच्छतेचा एक विशेष कार्यक्रम राबविण्यात आला. सदर निर्देशांनुसार, ४८ ठिकाणे सखोल स्वच्छतेसाठी निश्चित करण्यात आली. तसेच, 'एक पेड

माँ के नाम’ अंतर्गत वृक्षारोपण, RRR (Reduce, Reuse, Recycle) केंद्रे, पोस्टर / चित्रकला स्पर्धा, इत्यादीसारख्या इतर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

“स्वच्छता ही सेवा” अभियानांतर्गत, सफाई कामगारांसाठी प्रशिक्षण आणि आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात आली.

- **कचरा मुक्त तास -** ‘स्वच्छ मुंबईसाठी १००-दिवसांचा कृती आराखडा’ अंतर्गत, दिनांक १५.०१.२०२५ पासून संपूर्ण बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सोमवार ते शुक्रवार, सकाळी ११ ते दुपारी १ या दोन तासांच्या कालावधीत ‘कचरा मुक्त तास’ मोहीम राबविली जात आहे.

**घन कचरा व्यवस्थापन खात्याकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१८३.४७ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१२३.४२ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

- **पर्यावरणपूरक स्मशानभूमी -** वायू प्रदूषण कमी करण्याकरिता, सन २०२५-२६ मध्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ५ स्मशानभूमींचे PNG स्मशानभूमीत रुपांतर करण्यात येणार आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९ स्मशानभूमींमध्ये पारंपारिक चितेऐवजी पर्यावरणपूरक शवदाहिनी सुरु करण्यात येणार आहे. वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्याकरिता लाकडाऐवजी PNG अथवा शेणाच्या पर्यावरणपूरक शवदाहिनी वापरण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करण्यात येईल.

- **पर्यावरणपूरक उत्सव -** सन २०२४ मध्ये, पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविणाऱ्या मूर्तीकारांना प्रोत्साहन देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने ६११ टन शाडू मातीचे मोफत वाटप केले आहे. तसेच, सन २०२५ चे सार्वजनिक सण साजरे करताना पर्यावरणपूरक साहित्यातून गणेशमूर्ती, दुर्गामातेच्या मूर्ती बनविण्यासाठी मूर्तीकारांना प्रोत्साहन देण्याकरिता शाडू मातीचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. मूर्तीविसर्जनानंतर तलावांच्या तळाशी जमा होणाऱ्या गाळ/तत्सम पदार्थांची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी सन २०२५ मध्ये विशेष प्रकल्प सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

- **जबाबदार वर्तनास प्रोत्साहन -**

➢ एप्रिल २०२४ पासून नेमलेल्या क्लिन-अप मार्शल्सना नियमांचे उल्लघंन करण्याऱ्या नागरिक आणि आस्थापनांवर दंड आकारण्याचा अधिकार देण्यात आला आहे. दंड वसूल करण्याकरिता माहिती व तंत्रज्ञानाधारित देखरेख व अहवाल सुविधायुक्त हँडहेल्ड मशिन्सचा वापर करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे जनजागृतीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे, उपद्रवी प्रकारांमध्ये घट झाली असून जबाबदार वर्तनाच्या प्रोत्साहनाचे समाधानकारक परिणाम दिसून येत आहेत.

➢ दुकाने व आस्थापना खात्यामार्फत प्रतिबंधित एकल वापर प्लास्टिक व थर्माकोलच्या वापरावर सक्त कारवाई करण्यात येत असून एप्रिल २०२४ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत २५३२.०१ कि.ग्रॅ. प्रतिबंधित प्लास्टिक उत्पादने व थर्माकोल जप्त करण्यात आलेला आहे.

❖ **घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प**:

- **देवनार क्षेपणभूमी येथे कचऱ्यापासून वीज निर्मितीचा प्रकल्प -** बृहन्मुंबई महानगरपालिकेने देवनार क्षेपणभूमी येथे ६०० टन प्रतिदिन क्षमतेचा कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पामध्ये कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन सुमारे ७ मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. प्रकल्पाच्या बांधकाम व उभारणीचे काम सुरू असून सदर प्रकल्प ऑक्टोबर २०२५ पासून कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

- **बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे संकलन, वाहतूक, प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याचा प्रकल्प -** पश्चिम उपनगरांकरिता १८००-२१०-९९७६ आणि शहर व पूर्व उपनगरांकरिता १८००-२०२-६३६४ या टोल फ्री क्रमांकांवरून तसेच MyBMC मोबाईल ॲपद्वारे नागरिक बांधकाम व निष्कासन कचरा संकलन सुविधेचा लाभ घेऊ शकतात. यामुळे, नागरिकांना ही सेवा विनासायास उपलब्ध झाली आहे. GPS प्रणाली असलेल्या समर्पित वाहनांद्वारे डेब्रिजचे संकलन आणि वाहतूक सुरक्षितरित्या करण्यात येते.

बांधकाम व निष्कासन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दहिसर व डायघर येथे प्रत्येकी ६०० टन प्रतिदिन क्षमतेची २ केंद्रे उभारली आहेत. या दोन्ही केंद्रांची एकत्रित क्षमता सदर प्रकल्पास महाराष्ट्रातील सर्वात मोठा कार्यान्वित प्रकल्प बनविते. पुन:प्रक्रिया केलेले साहित्य बिगर-संरचनात्मक बांधकामांकरिता उपलब्ध करुन दिले जात असून त्यामुळे चक्राकार अर्थव्यवस्थेस चालना मिळते. आतापर्यंत, या सेवांद्वारे २६,००० मे.टनाहून अधिक डेब्रिजची हाताळणी करण्यात आली असून त्याद्वारे डेब्रिज इतस्त: टाकण्याच्या प्रमाणाला आळा बसून पर्यावरणाची हानी कमी झाली आहे.

- **मुलुंड क्षेपणभूमी येथे जमीन पुन:प्राप्त करणे -** मुलुंड क्षेपणभूमी येथे जून २०२५ पर्यंत ७० लाख मे. टन इतक्या जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया व विल्हेवाट लावून क्षेपणभूमीची २४ हेक्टर जमीन पुन:प्राप्त करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्प हाती घेतला आहे. सदर प्रकल्पाचे काम सुरु असून दि.३१.१२.२०२४ पर्यंत सुमारे ४०.९३ लाख मे.टन जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे. माहे जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ दरम्यान सुमारे १८.३७ लाख मे.टन जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया व विल्हेवाट लावण्याचे नियोजित असून सन २०२५-२६ मध्ये सुमारे १०.७० लाख मे.टन कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याचे नियोजिले आहे.

- **देवनार क्षेपणभूमी येथे बायो-सीएनजी प्रकल्प -** बृहन्मुंबई महानगरपालिकेने देवनार क्षेपणभूमी येथे सुमारे १००० टन प्रतिदिन इतक्या नागरी घन कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी महानगर गॅस लिमिटेड यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. सद्यस्थितीत, सवलत करारनामा (Concession Agreement) संबंधीची प्रक्रिया सुरु आहे.

**घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पांकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२७७ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹३०० कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

## ❖ पूर नियंत्रण:

- **पर्जन्य जलवाहिन्या -** सत्यशोधन समितीच्या शिफारशी आणि सुधारित ब्रिमस्टोवॅड बृहत आराखडा अहवाल-II च्या शिफारशींनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका पर्जन्य जलवाहिन्यांचे जाळे टप्प्याटप्प्याने सुधारित आहे. मुबंईतील पूरजन्य परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने पर्जन्य जलवाहिन्यांच्या जाळ्यामध्ये सुधारणा/नविन बांधकाम/रुपांतर, पर्जन्य जल साठवण टाक्यांचे बांधकाम, नाले/मिठी नदी रुंदीकरण/वळविणे/खोलीकरण/पुनर्बांधणीचे काम, नद्यांचे पुनरूज्जीवन इत्यादी कामे हाती घेतली आहेत.

- **पूर नियंत्रणाकरिता उपकरणे -** Submersible उदंचन संच बसविलेली ४ Emergency Flood Recovery Vehicles आणि ४ Recycler Machines चा पुरवठा करण्याकरिता कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तसेच, विविध ठिकाणी पर्जन्य जल उदंचन केंद्रे, पोर्टेबल उदंचन संच, ट्रॅश बुम्सची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

- **पूरप्रवण क्षेत्रे -**

➢ आढळून आलेली पूरप्रवण क्षेत्रे - ४५३

➢ हाताळण्यात आलेली पूरप्रवण क्षेत्रे - ३६९

➢ बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन २०२५ व २०२६ च्या पावसाळ्यापूर्वी टप्प्याटप्प्याने हाताळण्यात येणारी पूरप्रवण क्षेत्रे - ५५

➢ नियोजन स्तरावरील पूरप्रवण क्षेत्रे - ११

➢ शासकीय प्राधिकरण / खाजगी मालक यांच्या समन्वयाने हाताळावयाची पूरप्रवण क्षेत्रे - १८

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये पर्जन्य जलवाहिन्या खात्याच्या महसुली अर्थसंकल्पांतर्गत ₹८३९.२५ कोटी व भांडवली अर्थसंकल्पांतर्गत ₹२२०० कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

❖ **आपत्ती प्रतिरोधक शहर**:

- **अग्निशमन दलाची दर्जोन्नती -**

➢ **नवीन वाहने / उपकरणे -**

▪ सुरक्षित अंतरावरुन अग्निशमन करण्याकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेले २ फायर फायटींग रोबोट्स फ्रान्समधून आयात करण्यात आले आहेत.

▪ दाटीवाटीची लोकवस्ती आणि अरुंद रस्ते असलेल्या झोपडपट्टीभागात अग्निशमनाकरिता वॉटर मिस्ट प्रणालीसह ५ मिनी वॉटर टेंडर्स ताफ्यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.

▪ मुंबई अग्निशमन दलाच्या आवश्यकतेनुसार विशिष्टपणे तयार केलेली आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म व हाय राईझ फायर फायटींग प्रणाली असलेली ७ प्रथम प्रतिसादात्मक वाहनांच्या खरेदीचे कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी, ३ वाहने यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आली असून उर्वरित ४ वाहनांचा पुरवठा मार्च २०२५ पर्यंत होणे अपेक्षित आहे.

▪ अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली ११ प्रथम प्रतिसादात्मक अग्निशमन वाहने, प्रकाश व्यवस्था व उच्च दाबाचे पाण्याचे पंप असणारी ४ सहाय्यक वाहने, ६ रोबोटिक लाईफ सेव्हिंग बॉईज, ३५ स्मोक एक्स्हॉस्टर व ब्लोअर्स, इत्यादीची खरेदी प्रक्रिया सुरू आहे.

➢ उत्तुंग इमारतींमध्ये आगीचा सामना करण्याकरिता पारंपारिक अग्निशमन यंत्रणा प्रभावी ठरत नसल्याने Compressed Air Force System (CAFS) व ड्रोन यासारख्या नवीन अग्निशमन यंत्रणा समाविष्ट करण्याचे नियोजिले आहे.

➢ Programme of Enhancement of Emergency Response (PEER) अंतर्गत अग्निशमन दलाची क्षमतावृद्धी करण्यात येत आहे.

▪ आपत्कालीन परिस्थितीमध्ये प्रभावी व तात्काळ सेवा देण्याकरिता, नव्याने बांधलेल्या मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पानजिक २ नवीन अग्निशमन केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे.

▪ ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पू) येथील नवीन अग्निशमन केंद्रांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

▪ एल.बी.एस. मार्ग, कांजूरमार्ग (प) येथे नवीन अग्निशमन केंद्रांचे बांधकाम पूर्णत्वास येत आहे.

▪ जुहू तारा रोड सांताक्रुझ (प), माहूल रोड चेंबूर व टिळक नगर येथे नवीन अग्निशमन केंद्रांचे बांधकाम लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

➢ इमारतीमधील आगी व बंदिस्त जागेमधील विमोचनाचे प्रशिक्षण देणाऱ्या प्रणालीच्या आखणी, पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरणाकरिता स्वीकृतीपत्र देण्यात आले आहे. हा अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सिम्युलेटर सर्व महानगरपालिकांमधील एकमेवाद्वितीय आहे. सदर प्रकल्प एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**अग्निशमन दल खात्याकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१५९.९१ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२६१.७२ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

● **आपत्ती व्यवस्थापन -** मुंबईमध्ये उद्भवणाऱ्या आपत्ती/आणीबाणी परिस्थितीत संदेशवहन व समन्वयाकरिता आपत्ती व्यवस्थापन विभाग ही नोडल यंत्रणा आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयातील आपत्ती व्यवस्थापन केंद्र, विभागीय आपत्ती नियंत्रण कक्ष आणि इतर मदत यंत्रणा यांच्यामध्ये प्रभावी समन्वय व अखंडीत, कार्यक्षम संदेशवहनाकरिता VSAT/सॅटेलाईट आधारित संवाद यंत्रणा उभारण्याचे प्रस्ताविले आहे. यामुळे, प्रतिसादाकरिता लागणारा कालावधी कमी होण्यास आणि संभाव्य जिवित व वित्तहानी टाळण्यास मदत होईल.

**आपत्ती व्यवस्थापन विभागाकरिता सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹३०९ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

❖ **<u>मोकळया जागा आणि हरित क्षेत्रांमध्ये वाढ</u>:**

- **हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शहरी हरितीकरण प्रकल्प –** पूर्व द्रुतगती महामार्गालगतच्या सर्व्हिस रोड शेजारील मोकळया जागेमध्ये बांबू वृक्षारोपण करण्याकरिता कंत्राटदाराची नियुक्ती करुन स्विकृतीपत्र देण्यात आले आहे.

- बृहन्मुंबई महानगरपालिका एकूण १,१४४ भूखंडाची देखभाल करीत आहे. ज्यामध्ये ३०१ उद्याने, ३५८ खेळांची मैदाने व ४८४ मनोरंजन मैदाने व १ शिल्पग्रामाचा समावेश आहे. १७ विविध भूखंडांवर एकूण ४,४१६ वृक्षांची पारंपारिक पध्दतीने लागवड करण्याचे प्रस्ताविण्यात आले आहे.

**उद्यान खात्याकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१६८.३६ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२२०.१२ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

- दि रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. यांच्याकडून ताब्यात घेण्यात आलेला १२०.१२ एकर आणि मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पांतर्गत पुन:प्रापणातून प्राप्त झालेल्या जमिनीपैकी १७० एकर अशा एकत्रित भूखंडावर 'मुंबई पब्लिक पार्क' विकासित करण्याचे नियोजित आहे. यापैकी, महालाक्ष्मी रेसकोर्सच्या १२०.१२ एकर भूखंडासाठी आराखडा तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) प्रकल्पांतर्गत असलेल्या १७० एकर भूभागाच्या विकासाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेला कोणत्याही आर्थिक बांधिलकीशिवाय पात्र व प्रतिष्ठित कंपन्यांकडून स्वयंसेवी अभिकरण (Volunteer Agency) म्हणून स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविण्यात आली आहे.

- गोरेगाव मुलुंड लिंक रोडच्या टप्पा-३ मध्ये, आरे आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीखालून जाणाऱ्या बोगद्यांमार्फत शहराची हरित वनक्षेत्रे व तलाव संरक्षित ठेवणारा पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहे.

- **आनंदवन हरित पट्टा -** संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या परिसरामध्ये बोरीवली ते गोरेगाव दरम्यानच्या क्षेत्रामध्ये 'आनंदवन हरित पट्टा' विकसित करण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मानस आहे. सदर ठिकाणी नागरिकांना चालण्यासाठी नैसर्गिक दगडांच्या पायवाटा व त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड आणि बायो-टॉयलेट, इत्यादींचा समावेश असेल.

## सामाजिक उपक्रम

***"सामाजिक क्षेत्राला बळकट करणे हे त्या समाजाच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावते, जिथे प्रत्येक व्यक्तीला उज्ज्वल, समावेशक भविष्याकरिता संधी, सुविधा आणि सहकार्य उपलब्ध असेल"***

आर्थिक सहाय्य, कौशल्य विकासाची संधी आणि बेघरांसाठी आश्रय प्रदान करण्याकरिता विशेषत्त्वाने तयार केलेल्या योजनांद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिका लोकसंख्येतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गास सक्रियपणे सहाय्य करते. लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि काम करणाऱ्या महिलांना सहाय्य करण्यासाठी, बृहन्मुंबई महानगरपालिका एक समर्पित वसाहतीगृह आणि पाळणाघर उभारत आहे, जे महिलांना काम आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या यामध्ये संतुलन साधण्यासाठी अनुकूल वातावरण सुनिश्चित करेल.

❖ **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी योजना:**

- **नियोजन खात्याचे उपक्रम -**

➢ नोकरी करणाऱ्या महिलांकरिता पी/दक्षिण विभागामधील पहाडी, गोरेगाव येथे बांधण्यात आलेल्या १७ मजली बहुउद्देशीय गृहनिर्माण इमारतीमध्ये १७५ बेड्सची व्यवस्था असलेल्या महिला वसतीगृहाचे दि.८ मार्च २०२४ रोजी लोकार्पण करण्यात आले आहे. सदर वसतीगृह पूर्ण क्षमतेने वापरात आहे.

➢ आर/दक्षिण विभागातील आकुर्ली व्हिलेज, कांदिवली (पू) येथे राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र सुरू

करण्यात आले आहे. सदर कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राद्वारे १०,००० विद्यार्थ्यांकरिता हॉस्पिटॅलिटी, रिटेल व सेल्स मॅनेजमेंट, ब्युटी व वेलनेस, आर्थिक साक्षरता, हवाई वाहतूक क्षेत्र, फास्टफूड जॉईंट, इ. क्षेत्रांचे व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

➢ सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या जीवनमानाचा दर्जा उचांविण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका वचनबद्ध आहे.

| अ. क्र. | तपशिल | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|
| १ | पात्र महिलांसाठी स्वयंरोजगार | ₹४० कोटी |
| २ | दिव्यांग व्यक्तींसाठी अर्थसहाय्य योजना | ₹२ कोटी |
| ३ | महिलांसाठी अर्थसहाय्य योजना | ₹७० लाख |
| ४ | स्वसहाय्य गटासाठी (Self Help Group) रिवॉलव्हींग फंड | ₹३५ लाख |
| ५ | ज्येष्ठ नागरिकांसाठी अर्थसहाय्य योजना | ₹१० लाख |
| ६ | महिलांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण | ₹१० लाख |
| ७ | आधार केंद्र / बेघरांकरिता निवाऱ्याचे व्यवस्थापन व परिरक्षण | ₹१६ लाख |
| ८ | विभागीय व क्षेत्रीय प्रदर्शन आणि विविध कार्यक्रम | ₹३० लाख |
| ९ | बेघरांकरिता निवाऱ्यांचे बांधकाम | ₹१० लाख |
| १० | नोकरदार महिलांसाठी वसतीगृहाचे बांधकाम | ₹१० लाख |
| ११ | पाळणाघर / डे केअर सेंटरचे बांधकाम | ₹१० लाख |

**संचालक नियोजन खात्याकरिता सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹५१.९८ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

- **सॅनिटरी पॅड व्हेंडींग मशिन्स -** अधिक सुलभ व सर्वसमावेशक स्वच्छता सुविधा पुरविण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने सामुदायिक शौचालयांमध्ये २०० सॅनिटरी पॅड व्हेंडींग मशिन्स बसविल्या आहेत. आतापर्यंत ३,६०,५६५ पाकिटे (प्रत्येकी ४ पॅड असलेली) वितरित करण्यात आली आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने आगामी वर्षात

आणखी २००० सामुदायिक शौचालयांमध्ये सदर उपक्रमाचा विस्तार करण्याचे नियोजिले आहे. सदर मशिन्सवर केंद्रीकृत निर्देश व नियंत्रण प्रणालीद्वारे देखरेख ठेवण्यात येत असून त्याद्वारे तात्काळ स्टॉक रिप्लेसमेंट सुनिश्चित केले जाते.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३५८ शाळांमध्येदेखील सॅनिटरी पॅड व्हेंडींग मशिन्स बसविण्यात आल्या आहेत.

- **बाजार खाते -** बाजारांच्या ठिकाणी सुविधा, स्वच्छता आणि सुरक्षितता वाढविण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध मंडयांच्या पुनर्विकास व दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

➢ कुलाबा मंडई, मुलुंड पूर्व मंडई, जिजामाता मंडई, डोंगरी मंडई, सांताक्रुझ मंडईच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

➢ बाबू गेनू मंडई, टोपीवाला मंडई, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, शिरोडकर मंडई, चेंबुरकर मंडईचा पुनर्विकास आणि लक्ष्मणराव यादव मंडई, फोर्ट मंडई, लाल बहादुर शास्त्री मंडई, हॉकर्स प्लाझा मंडई, बांद्रा टाऊन मंडई, अण्णासाहेब वर्तक मंडई, डी.एन. नगर मंडई, मालवणी मंडई, क्रांतिसिंह नाना पाटील मंडईच्या दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

➢ खेरवाडी मंडई, संत सावता मंडई, नवलकर मंडई, बोरीवली मंडई, मीनाताई ठाकरे मंडईच्या पुनर्विकास कामाचे आराखडे तयार करण्याचे काम सुरु आहे.

**बाजार खात्याकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१४२.४६ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१८१.५६ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

- **पशुवैद्यकीय आरोग्य खाते व देवनार पशुवधगृह -**

➢ देवनार पशुवधगृहाच्या आधुनिकीकरणाचा टप्पा - १अ पूर्ण झाला असून टप्पा - १ब प्रगतीपथावर आहे. याव्यतिरिक्त पुढील कामे हाती घेण्यात आली आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | पूर्णत्वाचा अपेक्षित कालावधी |
|---|---|---|
| १ | देवनार येथे जनावरांची शवदाहिनी | मार्च २०२५ |
| २ | खार येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची दर्जोन्नती | जुलै २०२५ |
| ३ | मालाड येथील गुरे कोंडवाडा विभागाचे नुतनीकरण | मार्च २०२५ |
| ४ | देवनार पशुवधगृहातील प्रशासकीय इमारत व शेळया/मेंढयांच्या कत्तलखान्याच्या इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती | मार्च २०२५ |
| ५ | देवनार पशुवधगृहातील गुरेढोरे गोठा व पंपरुम आणि एस-१ वाडयाची संरचनात्मक दुरुस्ती | मार्च २०२५ |

**देवनार पशुवधगृह खात्याकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२०.९३ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१३.०२ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

- राज्य शासनाच्या निदेशांनुसार, "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" राबविण्यात येत आहे.
- नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या सहकार्याने, जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त महानगरपालिका मुख्यालयात तंबाखू-विरोधी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

### ❖ कला, संस्कृती, क्रीडा व मनोरंजन:

- हेरिटेज वारसा लाभलेल्या क्रॉस मैदान व आझाद मैदानाच्या मधोमध स्थित असलेल्या फॅशन स्ट्रीटचा सुनियोजित पुनर्विकास करण्यात येत आहे. ज्यामध्ये, बस थांब्यांची सुधारणा, स्टॉल्सची एकसमान रचना आणि हेरिटेज दृष्टिकोणातून सुशोभिकरणाचा समावेश आहे. फॅशन स्ट्रीटचे रुप व वारसामूल्य वाढविणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.
- विकासकांकडून सुविधा जागा म्हणून मोफत उपलब्ध झालेल्या वडाळा व घाटकोपर येथील लघु नाट्यगृहाची दुरुस्ती / नुतनीकरण करुन लवकरच त्यांचे लोकार्पण करण्यात येईल.

- सद्यस्थितीत, दादर, चेंबूर, कांदिवली येथील ३ ऑलिंपिक दर्जाच्या जलतरण तलावांसह दहिसर (पू), दहिसर (प), मालाड (प), वरळी, विक्रोळी, अंधेरी (पू) आणि अंधेरी (प) येथील जलतरण तलाव बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चालविण्यात येत आहेत.

- **विदेशी प्राणी प्रदर्शनी (Exotic Zoo)** - वीरमाता जीजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयालगतचा १० एकर सुविधा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आला आहे. प्राणिसंग्रहालयाच्या विस्तारीकरणांतर्गत, सदर ठिकाणी जिराफ, झेब्रा, सफेद सिंह, जॅग्वार इ. विदेशी प्रजातीच्या प्राण्यांकरिता प्रदर्शनी तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

- वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या मुलुंड येथील प्रस्तावित Satellite Facility करीता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर जागवेर पक्षी प्रदर्शनी विकसित करण्याकरिता मांडणी आराखडा तयार करुन केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांजकडे मंजूरीकरिता पाठविण्यात आला आहे.

- नागरिकांच्या सोयीकरिता, तरण तलाव, नाट्यगृहे, प्राणिसंग्रहालय या उपक्रमांच्या आरक्षणांबाबत माहितीकरिता व तक्रारी नोंदविण्याकरिता एक स्वतंत्र टोल फ्री हेल्पलाईन क्र.१८००-१२३-३०६० कार्यान्वित करण्यात आला आहे.

- **मुंबई शहरातील कोळीवाड्यांचा विकास** - मुंबई शहरतील कोळीवाड्यांचा विकास करण्याकरिता व पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीकोणातून विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ मध्ये ₹२५ कोटी इतकी विभागनिहाय ठोक तरतूद प्रस्ताविली आहे.

- **वाघाचे शिल्प (Tiger Monument) उभारणे** - गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पांतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीखालून जाणा-या बोगद्याच्या ठिकाणी सुयोग्य जागा पाहून राज्य शासनाच्या वन आणि पर्यटन विभागाच्या सहकार्याने वाघाचे शिल्प (Tiger Monument) उभारण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मानस आहे.

- **काळा घोडा आणि रिगल जंक्शन परिसराचा विकास -** काळा घोडा परिसर येथे भेट देणाऱ्या पर्यटकांच्या एकूणच समृध्द अनुभूतीकरिता सदर ठिकाणाचे कला व ऐतिहासिक दृष्टिकोणातून विकास करण्यात येत आहे. रिगल सिनेमा जंक्शन परिसराच्या विकासाद्वारे पादचारी व वाहनांच्या सुरक्षित, जलद आणि सुलभ प्रवासाची सोय करण्यासोबतच वापरात नसलेल्या ४०५० चौ.मी. जागेचे पॉझ पॉईंट म्हणून प्लाझामध्ये रुपांतर करण्याचा उद्देश आहे. यामुळे, सदर जंक्शनचे जागतिक वारसा म्हणून असलेले महत्व वृध्दींगत होईल. दोन्ही प्रस्तावित कामांकरिता अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ मध्ये ₹२० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.
- **Mumbai Eye -** मुंबईमध्ये सुयोग्य जागी ‘London Eye’ च्या धर्तीवर सार्वजनिक खाजगी भागीदारी मॉडेल अंतर्गत ‘Mumbai Eye’ उभारण्याचा मानस आहे.
- जून २०२४ मध्ये जागतिक लघुग्रह दिन साजरा करण्यासाठी, डॉ.भाऊ दाजी लाड संग्रहालयामार्फत स्पेस इंडियाच्या सहयोगाने दिवसभरासाठी ॲस्ट्रो-कार्निव्हलचं आयोजन करण्यात आले ज्यात सुमारे १,००० विद्यार्थी सहभागी झाले.
- कोरोना महामारीच्या काळात बंद करण्यात आलेल्या डॉ.भाऊ दाजी लाड संग्रहालयाचे २०२२ ते २०२४ या कालावधीत मोठ्या प्रमाणावर नुतनीकरण करण्यात आले आहे. नुतनीकरण केलेल्या सदर संग्रहालयाचे मान.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी लोकार्पण करण्यात आले आहे. या संग्रहालयात नागरिक दुर्मिळ पुस्तके, नकाशे, छायाचित्रे, मातीची लघुशिल्पे आणि १९ व्या शतकातील कला इत्यादींचा समावेश असलेल्या सांस्कृतिक ठेव्याचा आस्वाद घेऊ शकतात.

## प्रशासकीय व कार्यालयीन कार्यक्षमता

प्रक्रियांचे सुसूत्रीकरण, नियामक संरचनांमधील सुलभता आणि संगणकीकरण व ई-गव्हर्नन्सचा पुरस्कार याद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासकीय व कार्यालयीन

कार्यक्षमतेत सक्रियपणे सुधारणा करीत आली आहे. हे प्रयत्न व्यवसाय-अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी आणि पारदर्शक निर्णयप्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी केले जात आहेत, ज्यामुळे प्रतिसादात्मक आणि उत्तरदायी प्रशासनास चालना मिळेल.

## ❖ व्यवसाय सुलभता (EODB):

- **TDR Exchange -** विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आणि हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) खरेदीसंदर्भात जमीन मालकांना सुस्पष्ट माहिती प्रदान करण्याच्यादृष्टीने TDR व्यवहारांकरिता “e-TDR प्रणाली” म्हणून संबोधला जाणारा एक सुसूत्र, पारदर्शक आणि कार्यक्षम इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म विकसित करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला महाराष्ट्र शासनाकडून निर्देश प्राप्त झाले आहेत.

  प्रस्तावित TDR Exchange मुळे TDR ची खरेदी-विक्री सुलभ होईल आणि आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन नोडल बँकेमार्फत करण्यात येईल. या उपक्रमाचा उद्देश व्यवहारांचे प्रमाण वाढविणे, त्याद्वारे TDR ची मागणी वाढविणे आणि विकास आराखड्याची अंमलबजावणी सुधारणे हा आहे. ही प्रणाली, Software as a Service (SaaS) मॉडेल अंतर्गत इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाद्वारे (MEITY) मंजूर केलेल्या उद्योग मानकांचे अनुपालन करून व्यावसायिक क्लाऊड प्रणालीचा वापर करून कार्य करेल. SaaS प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे पारदर्शकता तसेच महापालिकेच्या महसुलात वाढ होणे अपेक्षित आहे.

- यावर्षी, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुधारित इव्हेंट धोरण आणि इव्हेंट परवानग्यांसाठी एक खिडकी योजना सादर करण्यात येईल.

- मुंबईची स्टार्टअप इकोसिस्टिम बळकट करून चांगल्या सेवा पुरवण्यासाठी व नागरी पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची नागरी-तंत्रज्ञान इनक्युबेटर

म्हणजेच स्माईल कौन्सिल नाविन्यपूर्ण उपाय प्रदान करण्यासाठी अनेक समस्यांवर काम करत आहे.

❖ **प्रशासकीय कामात कार्यक्षमतेवर भर :**

- **कार्यक्षमतेत वाढ करण्याकरिता ऑनलाईन प्रणाली -**

➢ ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत, रुग्णालय व्यवस्थापन माहिती प्रणाली (HMIS) द्वारे रुग्णसेवा प्रदानामध्ये सुधारणा होईल आणि आरोग्य सेवा प्रणालीमध्ये पारदर्शकता येईल.

➢ भविष्यातील विकासाचा कल ओळखून संभाव्य शहरी मागणीच्या अनुषंगाने पायाभूत सुविधांबाबतची निर्णयप्रक्रिया सुधारण्याकरिता विकास नियोजन खात्यामार्फत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर करण्याचे प्रस्तावित आहे.

➢ बांधकाम सुरू असलेल्या आणि पूर्ण झालेल्या इमारती तसेच महानगरपालिकेच्या भाडेपट्टीवरील व भाडेतत्वावरील इमारतींची इमारत परवानग्या, अग्निसुरक्षा आणि नियमोल्लंघनाच्या अनुषंगाने तपासणी करण्याकरिता स्वतंत्र मोबाईल ॲप्लिकेशन्स विकसित केले जात आहेत. सदर ॲप्लिकेशन्समुळे महसूलात वाढ आणि पारदर्शकतेत सुधारणा होईल.

➢ घन कचरा व्यवस्थापन खात्याकरिता Field Marshal App विकसित करण्यात आले आहे.

➢ उद्यान खात्याकरिता Tree Removal Permission App विकसित करण्यात येत आहे.

- **प्रशिक्षण कार्यक्रम -**

➢ सन २०२५-२६ मध्ये, नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्रामार्फत १,२१८ प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे सुमारे ४८,७२० महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अंतर्गत व बाहय प्रशिक्षकांद्वारे प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे.

➢ सेप्टिक टँक आणि मलवाहिन्यांची साफसफाई करणाऱ्या कामगारांसाठी प्रशिक्षण आणि सुरक्षिततेशी संबंधित जागरुकतेकरिता कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

➢ पोलिस खात्यामार्फत महानगरपालिका मुख्यालयातील महिला कर्मचाऱ्यांना महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने 'खाकीतील सखी' उपक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यात आले.

- दाखल केलेल्या एकूण ३३,६९३ न्यायालयीन प्रकरणांपैकी १५,०७१ इतकी प्रकरणे विधी खात्यामार्फत सन २०२३-२४ मध्ये निकाली काढण्यात आलेली आहेत.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कार्यरत कर्मचाऱ्यांकरिता वैद्यकीय गटविमा योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत, कर्मचाऱ्याच्या कुटुंबांतील ६ सदस्यांकरिता एकूण रु.५ लाख इतके विमा संरक्षण (family floater basis) देण्यात येत आहे.

## इतर खात्यांतर्गत महत्त्वाची कामे

❖ **आश्रय योजना**:

शहर स्वच्छ व निरोगी ठेवण्याच्या कामी सफाई कामगार नेहमीच आघाडीवर असतात. या कामाच्या विशिष्ट स्वरुप व वातावरणामुळे त्यांच्यामध्ये आरोग्य समस्या व मृत्यूदराचे प्रमाण अधिक असते. ही समस्या हाताळण्याकरिता त्यांच्या कार्यक्षेत्राच्या नजिक कर्मचारी निवासस्थानाच्या रुपाने उत्तम निवासव्यवस्था पुरविणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत, २७,९९२ सफाई कामगारांपैकी सुमारे ५,५९२ कामगारांना सेवानिवासस्थाने देण्यात आली आहेत. कामगार कल्याण योजनेचा एक भाग म्हणून ''आश्रय योजनेंतर्गत'' ३० वसाहतींच्या प्रस्तावित पुनर्विकासाद्वारे सफाई कामगारांना वाढीव क्षेत्रफळाची (३०० चौ.फुट) सुमारे १२,००० सेवानिवासस्थाने उपलब्ध करून देण्याचे योजिले आहे. ३० ठिकाणांच्या पुनर्विकासाकरिता कार्यादेश देण्यात आले असून त्यापैकी २३ ठिकाणी

कामे सुरू करण्यात आली आहेत आणि उर्वरित ७ ठिकाणची कामे लवकरच सुरू करण्यात येतील. आतापर्यंत, या योजनेचे २५% काम पूर्ण करण्यात आले आहे.

**आश्रय योजनेकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹८५२ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१३०० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

❖ **<u>यांत्रिकी व विद्युत खाते</u>**:

- महानगरपालिका पॉवर लॉँड्रीच्या डाउनस्ट्रीम कामांसह औद्योगिक दर्जाच्या महानगर PNG प्रणालीचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वितीकरण.
- नायर रुग्णालयामध्ये केंद्रीय निर्जंतुकीकरण पुरवठा विभागाची उभारणी.
- प्रमुख आणि उपनगरीय रूग्णालयांमध्ये यांत्रिकी पायाभूत सुविधा / अग्निशामक उपकरणांची दर्जोन्नती.
- ललितकला अकादमी, अंधेरी येथे विविध सुविधांमध्ये सुधारणा आणि आधुनिकीकरणाचे काम.

**यांत्रिकी व विद्युत खात्याकरिता सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२२२.७३ कोटी व सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹२६७.१२ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

❖ **<u>सुरक्षा खाते</u>**:

विविध विभाग कार्यालये, प्रमुख व उपनगरीय रुग्णालये येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुरक्षा दलाकरिता अत्याधुनिक व AI तंत्रज्ञानाधारित सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सुरक्षा खात्याकरिता सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१८.२१ कोटी इतकी एकूण तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

## बेस्ट उपक्रमास अर्थसहाय्य

सन २०१२-१३ पासून जानेवारी २०२५ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने बेस्ट उपक्रमास एकूण ₹११३०४.५९ कोटी इतक्या रकमेचे अर्थसहाय्य केले आहे. सध्याचे हाती घेतलेले प्रकल्प आणि इतर महत्वाच्या उद्दिष्टांकरिता स्वत: बृहन्मुंबई महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता असतानादेखील, बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये ₹१००० कोटी इतकी तरतूद अनुदान म्हणून प्रस्ताविण्यात आली आहे.

सदर रक्कम बेस्ट उपक्रमास पायाभूत सुविधांचा विकास आणि भांडवली उपकरणांची खरेदी, कर्जाची परतफेड, भाडेतत्वावरील (Wet Lease) नवीन बसेस, वेतन करारान्वये येणारे आर्थिक दायित्व, दैनंदिन खर्च, ITMS प्रकल्प, कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान, निवृत्त कर्मचाऱ्यांचे उपदान व इतर विविध देणी, विद्युत देणी, इत्यादी तसेच राज्य शासनाच्या निर्देशांनुसार मुंबई शहरासाठी बेस्ट उपक्रमाच्या २,००० इलेक्ट्रीक बसगाड्यांचे प्रवर्तन करण्यासाठीच्या प्रकल्पाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेचा ५% हिस्सा म्हणजेच ₹१२८.६५ कोटी या खर्चापोटी प्रदान करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे, विद्युत बसगाड्या खरेदी करण्याकरिता १५ व्या वित्त आयोगाकडून ₹९९२ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी, प्राप्त झालेली ₹४९३.३८ कोटी इतकी रक्कम बेस्ट उपक्रमास अधिदानीत करण्यात आली आहे व उर्वरीत ₹४९८.६२ कोटी इतकी रक्कम १५ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झाल्यानंतर बेस्ट उपक्रमास उपलब्ध करुन देण्यात येईल.

**मी आता अर्थसंकल्प ‘ग’ सादर करतो.**

## पाणी व सांडपाणी व्यवस्थेने जीवनमान सुधारणे

*“कार्यक्षम पाणी आणि मलनि:सारण व्यवस्था या शहराच्या भरभराटीची जीवनरेखा आहेत. आरोग्याचा सांभाळ, प्रगतीकडे वाटचाल आणि शाश्वत भविष्याची सुरक्षितता ”*

सांडपाणी व्यवस्थापन व स्वच्छ पाण्याच्या उपलब्धतेकरिता कार्यक्षम पाणी आणि सांडपाणी व्यवस्था या शहराच्या विकासाचा आधारस्तंभ आहेत. या नागरीसेवा नागरीकांच्या आरोग्याचे रक्षणच नाही तर आर्थिक प्रगती व पर्यावरणीय स्थिरतेकरिता सुद्धा महत्त्वाच्या आहेत. नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान व पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करुन शहराच्या पाण्याची मागणी व पुरवठयातील तफावत दूर होऊन भविष्यातील वाढती मागणी पूर्ण करणे शक्य होइल. भविष्यात पाणी पुरवठा वाढविणे, जुन्या व्यवस्था सुधारणे/बदलणे व सांडपाणी व्यवस्था विस्तारण्याच्या मुंबई शहराच्या वचनबद्धतेमुळे संसाधनाच्या व्यवस्थापनासह समृद्ध व आरोग्यदायी भविष्य सुनिश्चित होईल.

मुंबई शहाराच्या वाढत्या गरजांकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने पाणी पुरवठा (रु.५४०० कोटी), सांडपाण्यावर प्रक्रिया (रु.५५४५ कोटी) व मलनि:सारण प्रचालन (रु.२४७७.५३ कोटी) यांचा समावेश असलेली रु.१३४५७.२८ कोटी इतकी सर्वसमावेशक अर्थसंकल्पीय तरतुद सन २०२५-२६ करीता प्रस्ताविली आहे. या गुंतवणूकीतुन पाणी पुरवठा वाढवण्यासह मागणी- पुरवठ्यातील दरी कमी होऊन शाश्वत मलनि:सारण व्यवस्थापन यामुळे समृद्ध व आरोग्यदायी भविष्य सुनिश्चित होईल.

❖ **पाणी पुरवठा प्रकल्प विभाग**

- **पाणी पुरवठ्यात वाढ, तफावत दूर करणे आणि पाणी पुरवठ्यामध्ये दर्जोन्नती करणे.**

➢ **नवीन कामे -**

▪ **पांजरापूर येथे ९१० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचा नवीन जलशुध्दीकरण प्रकल्प -** पांजरापूर येथील जलशुध्दीकरण केंद्र हे ४ टप्प्यात पूर्ण झाले आहे. त्यापैकी टप्पा

क्र.१ व २ यांचे निर्धारित आयुर्मान संपुष्टात आले आहे व मोठ्या दुरुस्त्या व्यवहार्य नाहीत. त्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून ९१० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण केंद्र बांधणे आवश्यक आहे. तद्नंतर टप्पा क्र.१ चे निष्कासन करणे आणि टप्पा क्र २ व ३ यांची दुरुस्ती व देखभाल करुन, मुंबई शहराला सुरळीत पाणीपुरवठा करणे शक्य होईल. या कामासाठी सप्टेंबर -२०२४ मध्ये निविदा मागविण्यात आली असून, सदर निविदा प्रक्रिया सुरु आहे. या कामासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.२५० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

- **पिसे ता.भिवंडी येथे ४५५ द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेच्या उदंचन केंद्राचे बांधकाम, संरचना, उभारणी व प्रचालन व नवीन बंधाऱ्याचे बांधकाम करणे -** भातसा धरणातून बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी अंदाजे २१२० दशलक्ष लिटर पाणी घेण्यात येते. सदर पाणी पुरवठा हा भातसा नदीतून पिसे गावापर्यंत होतो. भातसा नदीवर पिसे येथे आर.सी.सी. बंधारा बांधण्यात आला असून, उदंचन केंद्राद्वारे तेथून मुंबईसाठी दररोज पाणी पुरवठा करण्यात येतो. या बंधाऱ्यात ३१ मीटर टी.एच. डी. या पातळीपर्यंत पाणी साठविण्यात येते. पाण्याची वाढती मागणी विचारात घेऊन पाण्याची पातळी वाढविण्यासाठी बंधाऱ्याच्या माथ्यावर रबरी बलून बसवून पाण्याची साठवण पातळी २ मीटरने वाढविण्यात आली आहे. यामुळे येणाऱ्या तांत्रिक अडचणी तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नवीन उपाय करण्याचे प्रस्ताविले आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या ४ टप्प्यातील पिसे उदंचन केंद्राच्या पंपाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पिसे येथे ४५५ द.ल.लि. क्षमतेचे अतिरिक्त उदंचन केंद्र बांधण्याचे प्रस्तावित असून पिसे-पांजरापूर येथून मुंबई शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्यात सुधारणा होणार आहे. ४५५ द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या उदंचन केंद्राचे व नवीन बंधाऱ्याचे बांधकाम, संरचना, उभारणी व परिचालन करणे या कामाचा कार्यादेश कंत्राटदाराला देण्यात आला आहे. या कामासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.२५० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

▪ **गारगाई प्रकल्प -** मुंबई शहराची पाण्याची वाढती मागणी व पुरवठ्यातील तफावत दूर करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून गारगाई प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत या प्रकल्पाच्या प्राथमिक अभियांत्रिकीची कामे अंतिम टप्प्यात असून तांत्रिकदृष्टया आवश्यक असलेल्या बहुतांश परवानगी प्राप्त झालेल्या आहेत, तथापि वन विभाग व वन्यजीव मंडळाची परवानगी अद्याप प्राप्त होणे बाकी आहे. सदरची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प बांधकामाच्या प्रक्रियेस सुरुवात करण्यात येईल. या कामासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.३६.५१ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

▪ **जल व मलनि:सारण विभागाकरिता शाश्वत प्रकल्प कक्षाची स्थापना -** हवामान संवेदनक्षम पाणीपुरवठा व मलनि:सारण सेवेचे नियोजन, अंमलबजावणी व देखरेख करण्याकरिता शाश्वत प्रकल्प कक्ष स्थापन करण्याच्या दृष्टीने सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. सल्लागाराकडून प्रकल्पांची व्यवहार्यता, खर्चाचे नियोजन, प्रकल्पाची गरज, प्रकल्पांचे मूल्यमापन करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रणाली विकसित करणे तसेच वर्तमान जल आराखडा २०४७ पर्यंत अद्ययावत करण्यात येत आहे. या कामासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.७ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

➢ **प्रगतीपथावर असलेली कामे -**

▪ **अमर महल (चेंबूर) ते ट्रॉम्बे जलाशयापर्यंत जलबोगद्यांचे बांधकाम (५.५० कि.मी.) -** बोगदा खोदाई यंत्राद्वारे अमर महल (चेंबूर) ते ट्रॉम्बे उच्चस्तर जलाशय पर्यंत एकूण ५.५० कि.मी. लांबीचा जलबोगदा खोदाई तसेच आरसीसी अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत भूस्तरावरील जलवाहिन्या टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून माहे सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. जल बोगदा कार्यान्वित झाल्यानंतर "एम/पूर्व" व "एम/पश्चिम" विभागाच्या पाणी पुरवठ्यात सुधारणा होईल. या कामासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.८० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

- **हेडगेवार उद्यान (अमरमहल) ते प्रतिक्षानगर (वडाळा) आणि पुढे सदाकांत ढवण उद्यान (परेल) पर्यंत जलबोगद्याचे बांधकाम करणे (९.७ कि.मी.) -** हेडगेवार उद्यान (अमरमहल) ते परेल पर्यंत ९.७ कि.मी. लांबीचा जलबोगदा खोदाईचे काम पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यात अमर महल ते वडाळा दरम्यानचे आरसीसी अस्तरीकरणाचे काम पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यात वडाळा ते परेल पर्यंतचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम माहे एप्रिल-२०२६ पर्यंत पूर्णत्वास येणे अपेक्षित आहे. सदर जलबोगदा कार्यान्वित झाल्यानंतर एफ/उत्तर, एफ/दक्षिण विभाग आणि ई व एल विभागातील काही भागाच्या पाणी पुरवठ्यात सुधारणा होईल. या कामासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.२०० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

- **विहार तलावाचे ओसंडून जाणारे पाणी भांडूप जलशुध्दीकरण केंद्रात वळविण्यासाठी विहार उदंचन केंद्राचे बांधकाम -** मिठी नदीचा उगम हा विहार तलावामधून होतो. अतिवृष्टी व समुद्रात आलेली भरती यांच्या एकत्रित परिणामामुळे मिठी नदी ओसंडून वाहत असते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी होते. विहार तलावातील ओसंडून वाहणारे पाणी भांडूप संकुल येथील जलशुध्दीकरण केंद्रात आणून त्याचा वापर पिण्यासाठी करण्याचे प्रस्ताविले आहे. सदर कामाचा कार्यादेश जुलै-२०२४ मध्ये देण्यात आलेला असून, वैधानिक मान्यता प्राप्त करण्याचे काम सुरु आहे. या कामाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.४० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

- **भांडूप संकुल येथे २००० द.ल.लि. क्षमतेच्या नवीन जलशुध्दीकरण प्रकल्पाचे आरेखन, बांधकाम व प्रचालन या तत्वावर विकसीत करण्यासाठी स्थापत्य, यांत्रिकी, विद्युत व उपकरणांची कामे -** भांडूप संकुल येथील १९१० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या जलशुध्दीकरण प्रकल्पाचे बांधकाम सुमारे ४४ वर्षांपूर्वी करण्यात आलेले असून प्रकल्प संरचनात्मकदृष्टया कमकुवत झाला असल्याने पूर्ण क्षमतेने चालविणे शक्य होत नाही.

त्यामुळे तांत्रिक सल्लागार समितीच्या सल्ल्यानुसार २००० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचा नवीन जलशुध्दीकरण प्रकल्प उभारण्यात येणार आहे. तोपर्यंत जुना १९१० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचा जलशुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वित ठेवण्यात येणार आहे. सदर कामाकरिता कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून वैधानिक मान्यता प्राप्त करण्याचे काम सुरु आहे. सदर प्रकल्प जुलै-२०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. या कामाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.४५० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

- **घाटकोपर मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र ते भांडूप मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र आणि पूढे भांडूप संकुलापर्यंत तृतीय संस्करण प्रक्रिया केलेले पाणी वहन करण्यासाठी जलबोगद्याचा आराखडा व बांधकाम करणे ( पॅकेज – १ ) आणि**

**धारावी मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र ते घाटकोपर मलजल प्रक्रिया सुविधा केंद्र तृतीय संस्करण प्रक्रिया केलेले पाणी वहन करण्यासाठी जलबोगद्याचा आराखडा व बांधकाम करणे (पॅकेज २) –** अलिकडच्या काळात अनियमित पावसामुळे मुंबईतील नागरिकांना १० ते १५ टक्के पाणी कपातीला सामोरे जावे लागते. मुंबईच्या पाणी पुरवठ्यात वाढ करण्याकरिता व मागणी आणि पुरवठ्यातील तूट कमी करण्याकरिता विश्वासार्ह आणि हवामान बदल संवेदनक्षम स्त्रोत विकसित करण्याची गरज आहे. यावर मात करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रात निर्माण होणा-या मलजलावर आधुनिक प्रक्रिया करण्यासाठी विविध ठिकाणी मलजल प्रक्रिया केंद्राची उभारणी करण्याचे प्रकल्प हाती घेतले आहेत. सदर प्रकल्पातून ५०% मलजलावर तृतीय संस्करण प्रक्रिया करण्याचे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने ५०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या तृतीय संस्करण प्रक्रिया केलेले पाणी वहन करण्यासाठी धारावी ते घाटकोपर आणि पुढे भांडूप संकुल पर्यंत ९७० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचा जमिनीखालील बोगद्यांची उभारणी प्रस्तावित केलेली आहे. वरील दोन्ही कामांचे कार्यदेश कंत्राटदारास देण्यात आले असून, जलबोगद्याच्या बांधकामासंबंधी प्राथमिक

कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.८४० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

- **गुंदवली – कशेळी – बाळकुम विभागातील २७५० मि.मी. व्यासाची तानसा विस्तारित जलवाहिनी आणि गुंदवली – कापूरबावडी – एमसीपी – सॅडल टनेल विभागातील २४०० मि.मी. व्यासाची वैतरणा जलवाहिनी बदली करून ३००० मि.मि. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व टाकणे -** वैतरणा व तानसा विस्तारित जलवाहिन्या जुन्या व जीर्ण झाल्याने त्यांच्यामार्फत पूर्ण वहन क्षमतेने पाणी पुरवठा होत नसून ठाणे शहरातील दाट लोकवस्तीच्या झोपडपट्टी भागात धोका निर्माण होऊ शकतो. यास्तव सदर जलवाहिन्या बदलणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने गुंदवली - कशेळी - बाळकुम विभागातील २७५० मि.मी. व्यासाची तानसा विस्तारित जलवाहिनी व गुंदवली - कापूरबावडी - एमसीपी - सॅडल टनेल विभागातील २४०० मि.मी.व्यासाची वैतरणा जलवाहिनी बदली करून ३००० मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी टाकण्याचे काम प्रस्ताविले आहे. कामाचा कार्यादेश दि.२०.०९.२०२४ रोजी देण्यात आला असून, सदरचे काम प्रगतीपथावर आहे. या कामाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.३६० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

- **येवई महासंतुलन जलाशय ते कशेळी दरम्यान जलबोगद्याचा आराखडा, बांधकाम -** येवई महासंतुलन जलाशय ते सेवा जलाशयापर्यंत २३४५ मि.मी. आणि ३००० मि.मी. व्यासाच्या २ जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. या जलवाहिन्या मुंबई नाशिक महामार्गाला समांतर आहेत. मुंबई नाशिक महामार्गाच्या रुंदीकरणामुळे आणि जल सुरक्षेच्या दृष्टिकोनातून येवई महासंतुलन जलाशय ते कशेळी दरम्यान अतिरिक्त क्षमतेसह जलबोगदा बांधण्याचे प्रस्ताविले आहे. सदर कामाचा कार्यादेश देण्यात आला असून, प्राथमिक कामे प्रगतीपथावर आहेत. या कामाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.६०० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

- **कशेळी (भिवंडी) ते मुलुंड (जकात नाका) दरम्यान जलबोगद्याचे बांधकाम -** भातसा या जलस्त्रोताचे पाणी हे मुंबई -I आणि मुंबई -II या दोन मुख्य जलवाहिन्यांद्वारे मुंबई शहरापर्यंत आणले जाते. वाढत्या शहरीकरणामुळे ठाणे शहरामधील विविध कामांना त्यांचा अडथळा होत आहे. यामुळे ठाणे महानगरपालिकेद्वारे उपरोक्त दोन जलवाहिन्यांची पातळी खाली सरकविण्याबाबत केलेली विनंती व मुंबई शहराची पिण्याच्या पाण्याची सतत वाढणारी मागणी लक्षात घेता, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कशेळी ते मुलुंड जकात नाक्यापर्यंत जलबोगदा बांधण्याचे प्रस्ताविले आहे. सदरचे काम माहे सप्टेंबर-२०२४ पासून प्रगतीपथावर असून ऑक्टोबर २०३० पर्यंत पूर्णत्वास येणे अपेक्षित आहे. या कामाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.३५० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

➢ **जलाशयांची संरचनात्मक दुरुस्ती -** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध महासंतुलन व सेवा जलाशयांची तज्ञ सल्लागारांच्या शिफारशींनुसार संरचनात्मक दुरुस्तीची कामे हाती घेतली आहेत. त्यानुसार भांडूप महासंतुलन जलाशयाच्या दोन्ही कप्प्यांची व येवई महासंतुलन जलाशयाच्या एका कप्प्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून, दुसऱ्या कप्प्याच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, पवई आणि घाटकोपर निम्नस्तर जलाशयाचा कप्पा क्र.२ च्या दुरुस्तीची कामे अंतिम टप्प्यात आहे. मलबार हिल जलाशयाची पुनर्बांधणी न करता सदर जलाशयाची संरचनात्मक दुरुस्ती करणे शक्य आहे का याबाबतची तपासणी आय.आय.टी. रुरकी या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. तसेच इतर विविध सेवाजलाशयांची निविदापूर्व कामे प्रगतीपथावर आहेत. या कामाकरिता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.५८.७६ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्ताविली आहे.

**पाणी पुरवठा प्रकल्प विभागासाठी सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजात रु.३७०० कोटी आणि सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.४००० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

## ❖ जल अभियंता

- **पाण्याची गुणवत्ता आणि वितरण व्यवस्था सुधारणा**

➢ **अभय योजना -** अभय योजनेची अंमलबजावणी सुरु झाल्यापासून जल जोडणीधारकांना थकीत रक्कमेचे अधिदान केल्यास, अतिरिक्त आकारात सूट मिळत आहे. १ एप्रिल २०२३ ते ३० जानेवारी २०२५ पर्यंत १२५०५ जल जोडणी धारकांनी योजनेचा लाभ घेतलेला आहे व त्यांना रु.५६.९७ कोटी सूट देण्यात आली आहे.

➢ **सर्वांसाठी पाणी धोरण -** बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे जून २०२२ पासून झोपडपट्ट्या, अनधिकृत बिगर झोपडपट्टी बांधकामे आणि गावठाण, कोळीवाडयातील रहिवाशांना पाणी पुरवठा मंजूर करण्यासाठी एक सर्व समावेशक धोरण “ सर्वांसाठी पाणी ” अंमलात आणले आहे. या धोरणा अंतर्गत माहे डिसेंबर २०२४ पर्यंत सुमारे १५३७५ परवानगी प्रपत्र देण्यात आली असून त्यापैकी ७८६८ नवीन जलजोडण्या देण्यात आल्या आहेत.

▪ **जल वितरण सुधारणाची झालेली कामे आणि प्रस्तावित कामे -**

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | एप्रिल २०२४ ते सप्टेंबर २०२४ पर्यंतची झालेली कामे | ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत होणारी कामे | सन २०२५-२६ मध्ये प्रस्ताविलेली कामे |
|---|---|---|---|---|
| १ | जुन्या जलवाहिन्या बदलणे | १०.९८ कि.मी. | ९७.७२ कि.मी. | १२९.६३ कि.मी. |
| २ | नविन जलवाहिन्या टाकणे | २६.२२ कि.मी. | ७७.८५ कि.मी. | १२३.८७ कि.मी. |
| ३ | झडपांच्या कक्षांची दुरुस्ती व पुनर्बांधकाम | ११०३ नग | १०४३ नग | १७१६ नग |
| ४ | सेवा जलजोडण्यांचे नुतनीकरण | ६५७६ नग | ३३०७४ नग | ५०५४० नग |
| ५ | सेवा जलजोडण्यांचे जुडगे काढणे | १२ नग | २८९१ नग | ७८६० नग |

■ **जल अभियंता खात्यातील सन २०२५-२६ मधील प्रस्तावित महत्वाची कामे खालीलप्रमाणे आहेत.**

१. लाल बहादुर शास्त्री मार्गालगत 'एन' व 'एस' विभागासाठी एकत्रित होणारा पाणीपुरवठा विभाजित करुन एन विभागासाठी स्वतंत्र ९०० > ७५० मि.मि. व्यासाची जलवाहिनी पुरविणे व टाकणे.

**तरतूद : रु. १५ कोटी**

२. पूर्व उपनगरातील विविध ठिकाणी पाणी पुरवठा सुधारण्याकरिता विक्रोळी पार्क साईट, येथे २२ द.ल.लि. पाणी साठवण क्षमता असलेल्या टाकीचे उदंचन व्यवस्थेसह काम.

**तरतूद : रु.२० कोटी**

३. के/पूर्व व के/पश्चिम विभागातील पाण्याची गळती व पाण्याचा दाब वाढविण्यासाठी महाकाली गुंफा रस्त्यालगत १२०० मिमी व्यासाची जलवाहिनी बदलून १५०० मिमी. व्यासाची जलवाहिनी टाकणे.

**तरतूद : रु.६.९४ कोटी**

४. मेट्रो ७ मार्गिकेमुळे बाधित झालेल्या बाण डोंगरी कांदिवली (पूर्व) ते सुधीर फडके उड्डाणपूल बोरीवली(पूर्व) पर्यंत विविध व्यासाच्या जलवाहिन्या बदलणे व टाकणे.

**तरतूद : रु.१ कोटी**

५. एच/पूर्व विभागातील शिरसेकर मार्ग व परिसरातील पाणी पुरवठयात सुधारणा व गळती थांबविण्याकरिता १२०० मिमी. व्यासाची जलवाहिनी बदलणे.

**तरतूद : रु.६ कोटी**

■ **जलमापकविरहित निवासी मालमत्तेस जल आकार व मलनि:सारण आकार लागू करणेबाबत -** महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (भाग चार सन २०२२ चा) महाराष्ट्र अध्यादेश क्र.१ दि.०२.०२.२०२२ नुसार ५०० चौ.फूट किंवा त्याहून कमी

चटईक्षेत्र असलेल्या निवासी मालमत्ता जलकर व मलनि:सारण कर माफ करण्यात आला आहे. यापुर्वी सदर करांचा मालमत्ता कर देयकांत समावेश करुन कर संकलन व निर्धारण खात्यामार्फत देयके निर्गमित केली जात होती. सदर ५०० चौ.फूट किंवा त्याहून कमी चटईक्षेत्र असलेल्या जलमापक विरहित निवासी सदनिकांचा सरासरी दैनंदिन पाण्याचा वापराबाबत सर्वेक्षण करुन जल आकार व मलनि:सारण आकार लागू करण्याचे सर्वंकष धोरण लवकरच तयार करण्यात येणार आहे.

**जल अभियंता खात्यांतर्गत सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजात रु.११०० कोटी आणि सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१४०० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

## ❖ मलनि:सारण प्रचालन विभाग

जीर्ण व मोडकळीस आलेल्या सुमारे ९७ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्यांच्या पुनर्वसनाची कामे चरविरहित तंत्रज्ञानाने करण्याचे प्रस्तावित असून सदर कामे मे २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मुंबई मलनि:सारण प्रकल्प विभागाने सुरु केलेल्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या पुर्नरचनेची कामे कार्यान्वित होईपर्यंत माननीय हरित लवादाच्या निर्देशानुसार सदर मलजल प्रक्रिया केंद्रातील मलजलावर बायोरेमेडीएशन तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करण्याचे काम करण्यात येत आहे.

सर्व उदंचन केंद्रांमध्ये इंडस्ट्रियल इंटरनेट ओव्हरथिंग्स (IIOT) व कृत्रिम बुध्दीमत्तेच्या (AI) सहाय्याने उदंचन केंद्राची कार्यक्षमता वाढविणेबाबत कामे प्रस्ताविली आहेत. जेणेकरुन ऊर्जाबचत व विविध मलजल यंत्रे व संयंत्रे यांच्या आयुर्मानात वाढ होईल.

**मलनि:सारण प्रचालन विभागासाठी सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजात रु.४३२.७४ कोटी आणि सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.६५० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

## ❖ मलनि:सारण प्रकल्प विभाग

• **मुंबई मलनि:सारण सुधारणा कार्यक्रम (एमएसआयपी) -** मुंबईच्या नागरिकांना १०० टक्के मलनि:सारणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यास बृहन्मुंबई महानगरपालिका बांधील आहे. सध्या २०७० कि.मी. लांबीचे मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे कार्यान्वित असून, त्याद्वारे मुंबईच्या एकूण ७९.४० टक्के लोकसंख्येला व ८५.४३ टक्के क्षेत्रफळाला मलनि:सारण सुविधा पुरविली जात आहे. त्या अनुषंगाने, मुंबई मलनि:सारण सुधारणा कार्यक्रम (MSIP) सन २०१६-१७ पासून सुरु केला आहे. टप्पा - १ मध्ये ९३.६८ कि.मी. पैकी ७७.५२ कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. तसेच १२.५१ कि.मी. लांबीची कामे प्रगतीपथावर असून, ३.६५ कि.मी. लांबीच्या कामांना लवकरच सुरुवात करण्यात येणार आहे.

टप्पा-२ मध्ये नियोजित केल्याप्रमाणे, अविकसित विकास रस्त्यांसह १४३.१९ कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्यांपैकी २३.८० कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. तसेच ३४.२७ कि.मी. लांबीची कामे प्रगतीपथावर आहेत. २.८५ कि.मी. लांबीच्या कामांची निविदा प्रक्रिया सुरु आहे. या व्यतिरिक्त ५.८७ कि.मी. लांबीची मलनि:सारण वाहिनी अपवर्धित करण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये अंदाजे १६.१५ कि.मी. लांबीची नवीन कामे प्रस्तावित आहेत.

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रमुख नाल्यांमध्ये येणारा बिनपावसाळी प्रवाह समुद्र/खाडीच्या प्रदूषणास कारणीभूत ठरत असल्याने सदर प्रवाह वळविण्यासाठी तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मलनि:सारण प्रकल्प खात्यातर्फे सल्लागाराची नियुक्ती करण्यात येत आहे. त्यासाठी कृती आराखडा बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, पूर्व उपनगरातील शितल तलाव, शहर विभागातील सायन तलाव आणि पश्चिम उपनगरातील डिंगेश्वर तलाव या तीन तलावांचे पुनरुज्जीवन करण्याची आणि तलावांमध्ये येणाऱ्या बिनपावसाळी प्रवाह वळविण्याची कामे प्रायोगिक तत्वावर हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी शितल तलाव व डिंगेश्वर तलावाची कामे प्रगतीपथावर आहेत.

त्याचप्रमाणे, विशेष उल्लेख करावा अशी, शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरांतील विविध नाले व त्यांचे उपनाले, विविध तलाव आणि जलाशये यांमध्ये प्रवाहित होणाऱ्या बिनपावसाळी प्रवाहास अटकाव करुन, सदर प्रवाह महानगरपालिका मलनि:सारण प्रणालीमध्ये वळविण्याची कामे, तसेच, म्हाडा जमिनीवरील वसाहतीमधील मलनि:सारण वाहिन्यांच्या जाळयांमध्ये सुधारणा किंवा नव्याने मलनि:सारण वाहिनी सुविधा पुरविणे, याबाबतची कामे २०२५-२६ मध्ये प्रस्तावित आहेत. भांडूप पंपिंग स्टेशनपासून हरीओम नगरपर्यंत ४.२६ कि.मी., चिंबई पंपिंग स्टेशन ते माता आणि पूत्रपुतळा, वांद्रे (प) पर्यंत ४.४७ कि.मी. आणि कन्नमवार नगर ते भांडूप पंपिंग स्टेशनपर्यंत ५.३९ कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्या सुक्ष्म बोगदा पद्धतीने टाकण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये पहिल्यांदाच एफ/उत्तर विभागात ऑगर बोअरिंग पद्धतीने मलनि:सारण वाहिनी टाकण्याची कामे प्रस्तावित आहेत.

**मलनि:सारण प्रकल्प खात्यांतर्गत सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजात रु.५३२.६१ कोटी आणि सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.८७३.२८ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

## ❖ मुंबई मलनि:सारण प्रकल्प विभाग (एमएसडीपी)

मुंबई मलनि:सारण प्रकल्प खात्याने सन २०२२ पासून वरळी, वांद्रे, धारावी, वर्सोवा, मालाड, भांडूप व घाटकोपर या सात मलजल प्रक्रिया केंद्र प्रकल्पांचे संकल्पना, बांधणी आणि प्रचालन व परिरक्षणाचे काम सुरू केले आहे.

सदर सात प्रकल्पांची एकत्रित द्वितीय स्तरीय प्रक्रिया क्षमता २४६४ द.ल.लि.प्र.दि. इतकी असून, १२३२ द.ल.लि.प्र.दि. इतक्या पाण्यावर तृतीय स्तरीय प्रक्रिया करण्यात येणार आहे व त्याचा पुनर्वापर पिण्याव्यतिरिक्त कामासाठी करण्यात येईल. सदर प्रकल्पांचा आराखडा व बांधकाम कालावधी ४ ते ६ वर्ष इतका असून, प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर प्रचालन व परिरक्षण कालावधी पुढील १५ वर्षाकरीता असेल.

उपरोक्त नमूद ०७ मलजल प्रक्रिया केंद्राच्या कामाव्यतिरिक्त ०४ मलजल बोगद्यांची व ०४ मलजल उदंचन केंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांची भौतिक प्रगती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | क्षमता (द.ल.लि. प्र.दि.) | कामाची प्रगती (%) |
|---|---|---|---|
| १ | वरळी मलजल प्रक्रिया केंद्र | ५०० | १७ |
| २ | वांद्रे मलजल प्रक्रिया केंद्र | ३६० | २० |
| ३ | धारावी मलजल प्रक्रिया केंद्र | ४१८ | २० |
| ४ | वर्सोवा मलजल प्रक्रिया केंद्र | १८० | १८ |
| ५ | मालाड मलजल प्रक्रिया केंद्र | ४५४ | ७ |
| ६ | घाटकोपर मलजल प्रक्रिया केंद्र | ३३७ | २८ |
| ७ | भांडुप मलजल प्रक्रिया केंद्र | २१५ | २६ |
| ८ | मिठी नदी मलजल बोगदा (बापट नाला व सफेद पूल नाला ते धारावी मलजल प्रक्रिया केंद्र दरम्यान) | --- | ८५ |
| ९ | प्राधान्य मलजल बोगदा टप्पा-१ (डॉन बॉस्को शाळा, बोरिवली (प) ते नवीन मालाड आंतरप्रवाही उदंचन केंद्र) | --- | ५४ |
| १० | प्राधान्य मलजल बोगदा टप्पा-२ (गोरेगांव उदंचन केंद्र ते नवीन मालाड आंतरप्रवाही उदंचन केंद्र) | --- | २९ |
| ११ | वर्सोवा मलजल बोगदा (जुन्या व नवीन वर्सोवा मलजल उदंचन केंद्राच्या दरम्यान) | --- | ९८ |
| १२ | नवीन वर्सोवा आंतरप्रवाही उदंचन केंद्राची उभारणी | ५४० | ७७ |
| १३ | नवीन मालाड आंतरप्रवाही उदंचन केंद्राची उभारणी | १५८० | ६६ |
| १४ | घाटकोपर आंतरप्रवाही उदंचन केंद्राचे अद्ययावतीकरण करणे | ६९९ | २८ |
| १५ | भांडूप आंतरप्रवाही उदंचन केंद्राचे अद्ययावतीकरण करणे | ४६१ | ७७ |

**एकूण मुंबई मलनि:सारण प्रकल्पांतर्गत सन २०२४-२५ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजात रु.४२५० कोटी आणि सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.६५०० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.**

अर्थसंकल्पावरील माझ्या निवेदनाचा समारोप करताना, मुंबई शहराला एक स्वच्छ, हरित आणि पर्यावरणानुकूल शहर बनविण्याकरिता चांगल्या पायाभूत सुविधा, सेवा व शाश्वततेद्वारे मुंबईच्या सर्वांगीण विकासाप्रती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वचनबद्धतेची मी पुन्हा एकदा हमी देतो.

दीर्घकालीन विकास आणि शाश्वततेचा पाया रचत असतानाच प्रस्तूत आव्हानांना सामोरे जाण्याकरिता वित्तीय योजना काळजीपूर्वक आखण्यात येत आहेत.

येथे मी मान.मुख्यमंत्री महोदय व मान.उप मुख्यमंत्री महोदयांच्या अमूल्य मार्गदर्शन आणि सहकार्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. बृहन्मुंबई महानगरपालिकेची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने तिला अधिक सक्षम करण्याकरिता राज्य शासनाचे सहकार्य यापुढेही मिळत राहील असा मला विश्वास आहे. त्याचप्रमाणे, मुंबईला एक आदर्श शहर बनविण्याकरिता नागरिकांनी त्यांचे प्रयत्न असेच सुरु ठेवावेत, अशी मी विनंती करतो.

मुंबई शहराच्या गरजा आणि मागण्या विचारात घेऊन मी आगामी वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न आणि खर्चाचे शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज ‘अ’ (निधी संकेतांक - ११, १२, ६०, ७०), समतोल अर्थसंकल्पीय अंदाज ‘ब’ (निधी संकेतांक - २१, २२, २३) आणि शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज ‘ग’ (निधी संकेतांक - ४०) तयार केले आहेत.

सस्नेह धन्यवाद !

**मुंबई,** **(भूषण गगराणी)**
**दिनांक: ०४ फेब्रुवारी, २०२५** **महानगरपालिका आयुक्त**

**परिशिष्ट - एक**

**महसुली उत्पन्न**

**अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई', 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण**

**(₹ कोटीत)**

| अ.क्र. | महसुली उत्पन्नाचे स्त्रोत | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|
| १ | जकातीपोटी नुकसान भरपाई म्हणून अनुदान सहाय्य | १४३९८.१६ |
| २ | मालमत्ता कर | ५२००.०० |
| ३ | विकास नियोजन खात्यापासून प्राप्ती | ९७००.०० |
| ४ | गुंतवणुकीपासून प्राप्ती | २२८३.८९ |
| ५ | जल आणि मलनि:सारण आकार | २३६३.१५ |
| ६ | शासनाकडून अनुदाने | १३२५.०७ |
| ७ | पर्यवेक्षण आकार | २१३०.१७ |
| ८ | अग्निशमन दल यापासून प्राप्ती | ७५९.१८ |
| ९ | रस्ते व पूल यापासून प्राप्ती | ५३२.४३ |
| १० | अनुज्ञापन खात्यापासून प्राप्ती | ३६२.०० |
| ११ | रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती | ३९६.०४ |
| १२ | घन कचरा व्यवस्थापन | २६१.२५ |
| १३ | बाजार आणि देवनार पशुवधगृह खात्यांपासून प्राप्ती | ६३.१२ |
| १४ | इतर प्राप्ती | ३३८४.९४ |
| | **एकूण** | **४३१५९.४०** |

## परिशिष्ट - दोन

## महसुली खर्च

## अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई', 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण

(₹ कोटीत)

| अ. क्र. | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|
| १ | आस्थापना खर्च | १७५४०.४७ |
| २ | प्रशासकीय खर्च | १८७३.३८ |
| ३ | प्रचालन आणि परिरक्षण | ६२८७.२७ |
| ४ | व्याज आणि वित्त आकार | ११०३.२० |
| ५ | कार्यक्रम खर्च | ३२४.२३ |
| ६ | महसुली अनुदाने, अंशदाने आणि वित्तीय सूट | २१४५.८९ |
| ७ | तरतूदी आणि निर्लेखन | १७५२.५७ |
| ८ | राखीव निधीला स्थानांतरण - इतर | २८.६१ |
| ९ | करांचा परतावा | १४८.९१ |
| | **एकूण महसुली खर्च** | **३१२०४.५३** |
| | भांडवली खाते / निधीकडे स्थानांतरण | १२६९४.२२ |
| | खर्चापेक्षा ज्यादा प्राप्ती | ६०.६५ |
| | **एकूण** | **४३९५९.४०** |

## परिशिष्ट - तीन

### अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण' खातेनिहाय सारांश

(₹ कोटीत)

| खाते संकेतांक | खाते | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | महसुली खर्च | भांडवली खर्च | |
| १८ | माहिती तंत्रज्ञान खाते | २३७.५८ | ९०.८२ | ३२८.४० |
| २१ | आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष | ४२.२४ | ३०९.०० | ३५१.२४ |
| २२ | मुंबई किनारी रस्ता प्रकल्प | २८.९१ | १५१६.३१ | १५४५.२२ |
| २४ | करनिर्धारक व संकलक खाते | ३००.६१ | १५६.८० | ४५७.४१ |
| ३० | शिक्षण खाते | २८१३.०८ | ४२८.१७ | ३२४१.२५ |
| ३१ | घन कचरा व्यवस्थापन खाते | ३६५२.८३ | १८९५.३१ | ५५४८.१४ |
| ३२ | परिवहन खाते | ६१७.३३ | ७६.५३ | ६९३.८६ |
| ३३ | पर्जन्य जलवाहिन्या खाते | ८३९.२५ | २२००.०० | ३०३९.२५ |
| ३४ | यांत्रिकी व विद्युत खाते | १६७.६९ | २६५.४१ | ४३३.१० |
| ३५ आणि २६ | नगर अभियंता खाते आणि इमारत परिरक्षण | ६४८.०८ | २७४७.३७ | ३३९५.४५ |
| ३७ | विकास नियोजन खाते | १४६.२२ | १६८५.२४ | १८३१.४६ |
| ३८ | अग्निशमन दल | ४७४.९१ | २६१.७२ | ७३६.६३ |
| ४१ आणि २३ | उद्यान आणि प्राणिसंग्रहालय खाते | ४४५.४७ | २८५.५७ | ७३१.०४ |
| ४२ | बाजार खाते | ९८.८७ | १८१.५६ | २८०.४३ |
| ४३ | देवनार पशुवधगृह | ६८.२४ | १३.०२ | ८१.२६ |
| ४४ | रस्ते आणि वाहतूक प्रचालन खाते | १४१९.११ | ५१००.०० | ६५१९.११ |
| ४५ | पूल खाते | १३०.९८ | ८२३८.७३ | ८३६९.७१ |
| ४६ | महानगरपालिका मुद्रणालय | ४२.४९ | ५.२५ | ४७.७४ |
| ४७ | आरोग्य खाते | १४२६.४० | ५३२.५४ | १९५८.९४ |
| | प्रमुख रुग्णालये | १७३१.७९ | ७२४.१० | २४५५.८९ |
| | वैद्यकीय महाविद्यालये | ५३५.४१ | ४३.९२ | ५७९.३३ |
| | विशेष रुग्णालये | २४७.७८ | ५८.५१ | ३०६.२९ |
| | उपनगरीय रुग्णालये | ९८३.६४ | ६०९.६० | १५९३.२४ |
| ९३ | मुख्य वैद्यकीय पर्यवेक्षक उपनगरीय रुग्णालये | १४.१६ | ०.१९ | १४.३५ |
| ७२ | डॉ.आर.एन.कूपर म्युनिसिपल सर्वसाधारण रुग्णालय, जुहू, विलेपार्ले (प) | १९३.२८ | ४६.६४ | २३९.९२ |
| ९० | हिंदूहृदयसम्राट बाळसाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालय, जोगेश्वरी | ७२.१० | १.८५ | ७३.९५ |
| ४९ | जल प्रचालन खाते | २९७२.१३ | १४००.०० | ४३७२.१३ |
| ५० | पाणी पुरवठा प्रकल्प खाते | ५६.५८ | ४०००.०० | ४०५६.५८ |
| ५१ | मलनि:सारण प्रचालन खाते | १३२२.०८ | ६५०.०० | १९७२.०८ |
| ५२ | मलनि:सारण प्रकल्प खाते | ३९.५४ | ४००.०० | ४३९.५४ |
| ५३ | मुंबई मलनि:सारण प्रकल्प | ३३.३२ | ६४९९.२५ | ६५३२.५७ |
| | बेस्ट उपक्रमास आर्थिक अनुदान | ... | १०००.०० | १०००.०० |
| | इतर खाती | ९४०२.४३ | १७३८.८२ | ११९४१.२५ |
| | **एकूण** | **३१२०४.५३** | **४३१६२.२३** | **७४३६६.७६** |

## परिशिष्ट - चार

## भांडवली लेखा - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई' , 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण

(₹ कोटीत)

| अ. क्र. | तपशिल | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|
| | **भांडवली प्राप्ती** | |
| १ | **तात्पुरते अंतर्गत हस्तांतरण** | **१६६९९.७८** |
| २ | **अनुदाने** | |
| | ब्रिमस्टोवॅड प्रकल्पासाठी अनुदान | २००.०० |
| | ज.ने.रा.ना.पु.अ. प्रकल्पाकरिता अनुदान | २२.३५ |
| | स्वच्छ महाराष्ट्र मिशनकरिता शासनाकडून अनुदान | ५७.३६ |
| | अमृत २.० साठी अनुदान | १६.३२ |
| | इतर | ६.०० |
| | **एकूण: २** | **३०२.०३** |
| ३ | **इतर प्राप्ती** | |
| | एम.एम.आर.डी.ए. / म्हाडा / एन.एच.एस.आर.सी.एल. / वायू सेना (Air Force) कडून भांडवली कामांसाठी अंशदान | १.३१ |
| | इतर | १०.०० |
| | **एकूण: ३** | **११.३१** |
| ४ | **जमीन आणि इमारतींची विक्री / अधिमूल्य** | **५९६.५१** |
| | **नक्त रक्कम: २ + ३ + ४** | **९०९.८५** |
| ५ | **विशेष निधी / राखीव निधीमधून रकमेचा वापर** | |
| | प्राथमिक शालेय इमारत परिरक्षण निधी | ३०१.३० |
| | मलनि:सारण विकास प्रकल्पाअंतर्गत मलनि:सारण केंद्राच्या कामासाठी रकमेचा वापर | ५५४५.०० |
| | विशेष प्रकल्पांसाठी निधी | ९५६.५३ |
| | संचित वर्ताळा | ३८३०.०० |
| | फंजीबल कॉम्पेन्सेटरी एफ.एस. आय. (FCFSI) पोटी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड | ६७००.०० |
| | घसारा निधी | १२००.०० |
| | **एकूण: ५** | **१८५३२.८३** |
| ६ | **संचित वर्ताळ्यातून रकमेचा वापर (वृक्ष प्राधिकरण)** | **४.९५** |
| ७ | **एकूण: ५ + ६** | **१८५३७.७८** |
| ८ | **राखीव निधीकडे वर्ग केलेली रक्कम** | |
| | फंजिबल कॉम्पेन्सेटरी एफ.एस.आय. (FCFSI) पोटी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट फंड मध्ये वर्ग केलेला निधी | २०६२.०० |
| | डीसीआर ६(बी) अंतर्गत प्राप्त नुकसान भरपाई / विकास निधी फी | १२५८.९४ |
| | विकास निधी - कलम १२४जे एम.आर.टी.पी. अधिनियम, १९५३ (व्ही.यु.टी.पी.) निधीला अंशदान | ११००.०० |
| | पी.एस.एम. निधीला अंशदान | ३००.०० |
| | अग्निसुरक्षा निधीला अंशदान | ५२.१५ |
| | सर्वसाधारण राखीवमध्ये वर्ग - अर्थसंकल्प ग | ६.६९ |
| | सर्वसाधारण राखीव निधी २१ मध्ये वर्ग | ९९.६२ |
| | मालमत्ता पुनर्स्थापना / विशेष निधीला अंशदान | ८००.०० |
| | **एकूण: ८** | **५६७९.४०** |
| ९ | **विशेष निधी / राखीव निधीमधून नक्त रकमेचा वापर (७ - ८)** | **१२८५८.३८** |
| १० | **नक्त भांडवली राखीव (एकूण: १ + २ + ३ + ४ + ९)** | **३०४६८.०१** |
| ११ | **निवृत्ती वेतन निधी / निवृत्तीवेतन निधीवरिल व्याज यामधून रकमेचा वापर** | ८००.०० |
| १२ | **विशेष निधीमधून नक्त रकमेचा वापर (९ + ११)** | **१३६५८.३८** |

## परिशिष्ट - पाच

## महसुली लेखा

## अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'

(₹ कोटीत)

| निधी संकेतांक | तपशिल | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|
| **महसुली उत्पन्न** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ३२८८३.३७ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | ५२९.९६ |
| २१ | सुधार योजना | १३३.०६ |
| २२ | गलिच्छ वस्ती निर्मूलन | २.३१ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | ४५.७८ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | ११४७.३५ |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | ८३१७.९६ |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | ९९.६१ |
| ६० | भविष्य निर्वाह निधी | ... |
| ७० | निवृत्ती वेतन निधी | ... |
| | **नक्त उत्पन्न (अ)** | **४३१५९.४०** |
| **महसुली खर्च** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ★ १२०७५.६६ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | ५२०७.७० |
| २१ | सुधार योजना | २३१.१६ |
| २२ | गलिच्छ वस्ती निर्मूलन | ७.४३ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १५६.८८ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | २४७५.२० |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | ५२६१.६६ |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | ९९.६६ |
| ६० | भविष्य निर्वाह निधी | ९.१८ |
| ७० | निवृत्ती वेतन निधी | ५६८०.०० |
| | **नक्त खर्च (ब)** | **३१२०४.५३** |
| | **वर्षभरातील महसुली वर्ताळा (अ - ब)** | **११९५४.८७** |

★ इतर अर्थसंकल्पांना वर्ग केलेली रक्कम वगळून

## परिशिष्ट - पाच (क्रमश: .....)

## भांडवली लेखा

## अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'

(₹ कोटीत)

| निधी संकेतांक | तपशिल | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६ |
|---|---|---|
| **भांडवली प्राप्ती** | | |
| | अनुदाने | ३०२.०३ |
| | तात्पुरते अंतर्गत हस्तांतरण | १६६९९.७८ |
| | जमीन आणि इमारतींची विक्री / अधिमूल्य (अर्थसंकल्प ब) | ५९६.५१ |
| | विशेष निधी / राखीव निधीमधून नक्त रकमेचा वापर | १३६५८.३८ |
| | इतर | ११.३१ |
| | **एकूण** | **३१२६८.०१** |
| **भांडवली खर्च** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | २६३८४.४४ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | २१७२.७३ |
| २१ | सुधार योजना | ४९६.८९ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | २३४.६४ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | ४११.३० |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | १३४५७.२८ |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | ४.९५ |
| | **एकूण** | **४३१६२.२३** |
| | **नक्त महसुली उत्पन्न + नक्त भांडवली उत्पन्न** | **७४४२७.४१** |
| | **नक्त महसुली खर्च + नक्त भांडवली खर्च** | **७४३६६.७६** |
| | **वर्षभरातील वर्ताळा** | **६०.६५** |

## परिशिष्ट - सहा

## इतर विशेष निधींचे तपशिल

(₹ कोटीत)

| अनु.क्र. | तपशिल | रक्कम |
| --- | --- | --- |
| १ | महानगरपालिका आग व अपघात विमा निधी | १९८.९५ |
| २ | अग्निशमन दल कर्मचारी (प्रत्यक्ष कार्यवाही) अपघात नुकसान भरपाई निधी | २२.३९ |
| ३ | संशोधन निधी (गो.सु.वै.म. व रा.ए.स्मा.रुग्णालय) | २.२२ |
| ४ | भूमी पुन:प्रापण आणि संपादन निधी | ५६.६१ |
| ५ | प्रामाणिकता हमी विमा निधी | २.२४ |
| ६ | गुंतवणूक राखीव निधी | ७२.८६ |
| ७ | आकस्मिकता निधी | १०४७.८४ |
| ८ | महानगरपालिका कर्ज निधीवरील नक्त हफ्ते इ. (नेट प्रिमीया फंड) | ०.१८ |
| ९ | रुग्णालय निधी | ०.२३ |
| १० | मोटार वाहन (त्रयस्थ पक्ष) विमा निधी | ०.१७ |
| ११ | देणगी निधी | ०.३७ |
| १२ | यंत्र सहाय्य चलित जलयान (त्रयस्थ पक्ष) विमा निधी | ०.०६ |
| १३ | करदाता कल्याण निधी | ९५.०८ |
| १४ | सार्वजनिक स्मारकांचे परिरक्षण निधी | ०.०१ |
| १५ | विश्वस्त निधी | ४८.०६ |
| १६ | विशेष - वृक्ष प्राधिकरण निधी | ५५२.९० |
| **एकूण** | | **२१००.१७** |

## परिशिष्ट - सात
## क्रेडीट नोट

(₹ कोटीत)


| तपशिल | परिमंडळ-सहा मधील टि विभाग, मौजे भांडूप (प) येथील न.भू.क्र.२८६, २८६/१ ते ३ | परिमंडळ-सहा मधील टि विभाग, मौजे मुलुंड (पू) येथील न.भू.क्र.१२८९, १२९०, १२९२, १२९३ व १२९५ | परिमंडळ-दोन मधील जी/दक्षिण विभाग, नगररचना योजना-४ माहिम, प्रभादेवी, दादर येथील अंतिम भूखंड क्र.१०७४ (अंशत:) | परिमंडळ-तीन मधील के/पश्चिम विभाग, व्हिलेज अंधेरी, अंतिम भूखंड क्र.१९८ (अंशत:) | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **अ : निर्गमित केलेल्या क्रेडीट नोट** | **१६२.२४** | **६०६.९३** | **३७.७४** | **६७१.९७** | **१४७८.८८** |
| **ब : वापरलेल्या क्रेडीट नोट** | | | | | |
| १. मालमत्ता कर | १०.४१ | ४५.६८ | ३.५३ | ३३.३० | ९२.९२ |
| २. इमारत प्रस्ताव खाते:- सर्व अधिमुल्य, आकार, शुल्क, ठेव इ. | १२६.९४ | ५१८.६८ | ३४.२० | ३३०.२७ | १०१०.०९ |
| ३. मालमत्ता खाते:- एकवेळ अधिमुल्य, कॉर्पस फंड, एस.आर.डी. स्किम्स इ. | २४.८६ | ४२.५६ | - | ०.२२ | ६७.६४ |
| **एकूण ब** | **१६२.२१** | **६०६.९२** | **३७.७३** | **३६३.७९** | **११७०.६५** |
| **क: शिल्लक (अ - ब) (दि.३०.०१.२०२५ रोजी पर्यंत)** | **०.०३** | **०.०१** | **०.०१** | **३०८.१८** | **३०८.२३** |

# आलेखीय माहिती

## अर्थसंकल्पीय अंदाज अ,ब,ई,ग आणि वृक्षप्राधिकरण यांची एकत्रित आर्थिक स्थिती


(फंड कोड-११,१२,२१,२२,२३,३०,४०,५०,६०आणि ७०)

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उत्पन्नाची साधने
## अर्थसंकल्पीय अंदाजाचे आकारमान 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | उत्पन्न / प्राप्तीचे स्त्रोत | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | महसुली उत्पन्न | ४३१५९.४० | ५८ |
| २ | तात्पुरते अंतर्गत हस्तांतरण | १६६९९.७८ | २३ |
| ३ | विशेष निधीतून / राखीव निधीतून रकमेचा वापर | १३६५८.३८ | १८ |
| ४ | जमिनी व इमारती इ.च्या अधिमुल्यापासूनची प्राप्ती (अर्थसंकल्प ब) | ५९६.५१ | १ |
| ५ | अनुदाने | ३०२.०३ | ... |
| ६ | इतर प्राप्ती | ११.३१ | ... |
| | **एकूण** | **७४४२७.४१** | **१००** |

## अर्थसंकल्पीय अंदाजाचे आकारमान 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ३८४६०.१० | ५२ |
| २ | | पाणी पुरवठा व मलनि:सारण | १८७१८.९४ | २५ |
| ३ | | आरोग्य अर्थसंकल्प | ७३८०.४४ | १० |
| ४ | | निवृत्तीवेतन निधी | ५६८०.०० | ८ |
| ५ | | प्राथमिक शिक्षण | २८८६.४९ | ४ |
| ६ | | सुधार योजना | ७२८.०५ | १ |
| ७ | | गलिच्छ वस्ती सुधारणा | ३९१.५२ | ... |
| ८ | | वृक्ष प्राधिकरण | १०४.६१ | ... |
| ९ | | भविष्य निर्वाह निधी | ९.१८ | ... |
| १० | | गलिच्छ वस्ती निर्मूलन | ७.४३ | ... |
| ११ | | खर्चापेक्षा जादा प्राप्ती | ६०.६५ | ... |
| | | **एकूण** | ७४४२७.४१ | **१००** |

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्पीय अंदाज ‘अ’, ‘ब’, ‘ई’, ‘ग ’ आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | जकाती पोटी करावयाच्या भरपाईसाठी अनुदान सहाय्य | १४३९८.१६ | ३३ |
| २ | विकास नियोजन खात्याकडून प्राप्ती | ९७००.०० | २२ |
| ३ | मालमत्ता कर | ५२००.०० | १२ |
| ४ | जल व मलनि:सारण आकार | २३६३.१५ | ५ |
| ५ | गुंतवणुकीवरील व्याज | २२८३.८९ | ५ |
| ६ | पर्यवेक्षण आकार | २१३०.१७ | ५ |
| ७ | शासनाकडून अनुदाने | १३२५.०७ | ३ |
| ८ | अग्निशमन दल खाते | ७५९.१८ | २ |
| ९ | रस्ते आणि पूल यापासून प्राप्ती | ५३२.४३ | १ |
| १० | रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती | ३९६.०४ | १ |
| ११ | अनुज्ञापन खात्याकडून प्राप्ती | ३६२.०० | १ |
| १२ | इतर प्राप्ती | ४५०९.३१ | १० |
| | **एकूण** | **४३९५९.४०** | **१००** |

## महसुली खर्च- अर्थसंकल्पीय अंदाज ‘अ’,‘ब’, ‘ई’, ‘ग ’ आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | आस्थापना खर्च | १७५४०.४७ | ४० |
| २ | प्रचालन आणि परिरक्षण | ६२८७.२७ | १४ |
| ३ | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | २१४५.८९ | ५ |
| ४ | प्रशासकीय खर्च | १८७३.३८ | ४ |
| ५ | तरतुदी आणि निर्लेखन | १७५२.५७ | ४ |
| ६ | व्याज आणि वित्त आकार | ११०३.२० | ३ |
| ७ | कार्यक्रम खर्च | ३२४.२३ | १ |
| ८ | करांचा परतावा | १४८.९१ | ... |
| ९ | इतर खर्च | २८.६१ | ... |
| १० | भांडवली लेख्याला / निधीला अंशदान | १२६९४.२२ | २९ |
| ११ | खर्चापेक्षा जास्त उत्पन्न | ६०.६५ | ... |
| | **एकूण** | **४३९५९.४०** | **१००** |

## भांडवली प्राप्ती अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण




| अनुक्रमांक | भांडवली प्राप्तीची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | तात्पुरते अंतर्गत हस्तांतरण | १६६९९.७८ | ३९ |
| २ | विशेष निधीतून / राखीव निधीतून रकमेचा वापर | १२८५८.३८ | ३० |
| ३ | महसुली लेख्यातून / निधीतून अंशदान | १२६९४.२२ | २९ |
| ४ | जमिनी व इमारती इ.च्या अधिमुल्यापासूनची प्राप्ती (अर्थसंकल्प ब) | ५९६.५१ | १ |
| ५ | अनुदाने | ३०२.०३ | १ |
| ६ | इतर प्राप्ती | ११.३१ | ... |
| | **एकूण** | **४३१६२.२३** | **१००** |

### भांडवली खर्च अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | भांडवली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | सागरी किनारा रस्ता प्रकल्प (दक्षिण) / ६ पॅकेजेस (उत्तर वर्सोवा ते दहिसर) / शेवटचा टप्पा (दहिसर ते भाईंदर लिंक रोड) | ५८०७.२४ | १३ |
| २ | | मुंबई मलनि:सारण प्रकल्प (सांडपाणी प्रक्रिया केंद्र) | ५५४५.०० | १३ |
| ३ | | पाणी पुरवठा | ५४००.०० | १२ |
| ४ | | रस्ते व वाहतूक खाते | ५१००.०० | १२ |
| ५ | | पर्जन्य जलवाहिन्या | २२००.०० | ५ |
| ६ | | आरोग्य अर्थसंकल्प | २१७२.७३ | ५ |
| ७ | | मलनि:सारण | २००४.२५ | ५ |
| ८ | | खाजगी जागेवर प्रकल्पबाधित व्यक्तींकरिता बांधकाम | २०००.०० | ५ |
| ९ | | पूल खाते | १९८०.०० | ५ |
| १० | | गोरेगाव मुलुंड लिंक रोड | १९५८.७३ | ४ |
| ११ | | विकास नियोजन खाते | १६८५.२३ | ४ |
| १२ | | आश्रय योजने अंतर्गत साफसफाई खात्यातील कर्मचारी वर्गाच्या वसाहतीचा पुनर्विकास | १३००.०० | ३ |
| १३ | | महानगरपालिका मालमत्तांच्या दुरुस्त्या आणि गलिच्छ वस्ती सुधारणा(अर्थसंकल्प ब) | ७३२.२८ | २ |
| १४ | | घन कचरा व्यवस्थापन, परिवहन व घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | ४९९.९५ | १ |
| १५ | | प्राथमिक शाळांच्या दुरुस्त्या (अर्थसंकल्प ई) | ४११.३० | १ |
| १६ | | इतर | ४३६५.५२ | १० |
| | | **एकूण** | **४३१६२.२३** | **१००** |

# अर्थसंकल्पीय अंदाज अ,ब आणि ई यांची एकत्रित आर्थिक स्थिती


(फंड कोड-११,१२,२१,२२,२३,३०,६०आणि ७०)

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | जकाती पोटी करावयाच्या भरपाईसाठी अनुदान सहाय्य | १४३९८.१६ | ४१ |
| २ | विकास नियोजन खात्याकडून प्राप्ती | ९७००.०० | २७ |
| ३ | मालमत्ता कर | २८८५.११ | ८ |
| ४ | पर्यवेक्षण आकार | १७९६.५३ | ५ |
| ५ | गुंतवणुकीवरील व्याज | १४५०.०० | ४ |
| ६ | शासनाकडून अनुदाने | १३२५.०७ | ४ |
| ७ | अग्निशमन दल खाते | ७५९.१८ | २ |
| ८ | रस्ते आणि पूल यापासून प्राप्ती | ५३२.४३ | २ |
| ९ | रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती | ३९६.०४ | १ |
| १० | अनुज्ञापन खात्याकडून प्राप्ती | ३६२.०० | १ |
| ११ | इतर प्राप्ती | १८२५.३१ | ५ |
| | **एकूण** | **३५४२९.८३** | **१००** |

## महसुली खर्च- अर्थसंकल्पीय अंदाज'अ','ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | आस्थापना खर्च | १५०७१.०० | ४३ |
| २ | प्रचालन आणि परिरक्षण | ५०२२.५० | १४ |
| ३ | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | २०३१.४१ | ६ |
| ४ | प्रशासकीय खर्च | १५४४.१९ | ४ |
| ५ | व्याज आणि वित्त आकार | १०९५.८१ | ३ |
| ६ | कार्यक्रम खर्च | ३०१.७६ | १ |
| ७ | मालमत्ता करांचा परतावा | १०६.४२ | ... |
| ८ | इतर खर्च | १.१३ | ... |
| ९ | भांडवली लेख्याला / निधीला अंशदान | १०२५४.४१ | २९ |
| १० | खर्चापेक्षा जास्त उत्पन्न | १.२० | ... |
| | **एकूण** | **३५४२९.८३** | **१००** |

**भांडवली प्राप्ती - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब' आणि 'ई'**





| अनुक्रमांक | भांडवली प्राप्तीची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | तात्पुरते अंतर्गत हस्तांतरण | १६६९९.७८ | ५५ |
| २ | महसुली लेख्यातून / निधीतून अंशदान | १०२५४.४१ | ३४ |
| ३ | विशेष निधीतून / राखीव निधीतून रकमेचा वापर | २३२७.६२ | ८ |
| ४ | जमिनी व इमारती इ.च्या अधिमुल्यापासूनची प्राप्ती (अर्थसंकल्प ब) | ५९६.५१ | २ |
| ५ | अनुदाने | २८५.७१ | १ |
| ६ | इतर प्राप्ती | १०.०० | ... |
| | **एकूण** | **३०१७४.०३** | **१००** |

## भांडवली खर्च - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | भांडवली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | सागरी किनारा रस्ता प्रकल्प (दक्षिण) / ६ पॅकेजेस (उत्तर वर्सोवा ते दहिसर) / शेवटचा टप्पा (दहिसर ते भाईंदर लिंक रोड) | ५८०७.२४ | १९ |
| २ | रस्ते व वाहतूक खाते | ५१००.०० | १७ |
| ३ | पर्जन्य जलवाहिन्या | २२००.०० | ७ |
| ४ | आरोग्य अर्थसंकल्प | २१७२.७३ | ७ |
| ५ | खाजगी जागेवर प्रकल्पबाधित व्यक्तींकरिता बांधकाम | २०००.०० | ७ |
| ६ | पूल खाते | १९८०.०० | ७ |
| ७ | गोरेगाव मुलुंड लिंक रोड | १९५८.७३ | ७ |
| ८ | विकास नियोजन खाते | १६८५.२३ | ६ |
| ९ | आश्रय योजने अंतर्गत साफसफाई खात्यातील कर्मचारी वर्गाच्या वसाहतीचा पुनर्विकास | १३००.०० | ४ |
| १० | महानगरपालिका मालमत्तांच्या दुरुस्त्या आणि गलिच्छ वस्ती सुधारणा (अर्थसंकल्प ब ) | ७३२.२८ | २ |
| ११ | घन कचरा व्यवस्थापन, परिवहन व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प | ४६६.६१ | २ |
| १२ | प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या दुरुस्त्या (अर्थसंकल्प ई ) | ४११.३० | १ |
| १३ | इतर | ४३५९.९१ | १४ |
| | **एकूण** | **३०१७४.०३** | **१००** |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| महसुली खर्च | १२०५.९४ | १६५७.६२ | २०६९.९६ | १०९३.६७ | १५७९.०० |
| भांडवली खर्च | ५७४६.२२ | ५७९१.४८ | ७७८२.९८ | ११७६६.५१ | १४८५५.०४ |
| एकूण | ६९५२.१६ | ७४४९.१० | ९८५२.९४ | १२८६०.१८ | १६४३४.०४ |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| महसुली खर्च | २६०४.०५ | ३०८०.६७ | ३२६७.३१ | ३५२८.२१ | ४१२६.४८ |
| भांडवली खर्च | ६४३.२३ | ५५१.४२ | ८७५.२६ | १४६१.५८ | १९३८.५० |
| **एकूण** | **३२४७.२८** | **३६३२.०९** | **४१४२.५७** | **४९८९.७९** | **६०६४.९८** |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| महसुली खर्च | ४४६६.८५ | ४०४२.५४ | ४४६२.७२ | ४६३१.२७ | ५२०७.७० |
| भांडवली खर्च | ८८५.०७ | ८९६.७८ | १०५५.८९ | १७१९.२६ | २१७२.७४ |
| **एकूण** | **५३५१.९२** | **४९३९.३२** | **५५१८.६१** | **६३५०.५३** | **७३८०.४४** |




(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| महसुली खर्च | ७६४.३६ | ८७४.८१ | ९८८.२० | ७०४.१४ | ८३९.२५ |
| भांडवली खर्च | १२८६.१३ | १७५२.४४ | १११५.६८ | १६००.०० | २२००.०० |
| **एकूण** | **२०५०.४९** | **२६२७.२५** | **२१०३.८८** | **२३०४.१४** | **३०३९.२५** |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| महसुली खर्च | २६९५.८६ | २४८०.८३ | २५५९.२४ | २९८९.६४ | ३५४४.३४ |
| भांडवली खर्च | २७०.२७ | ३९५.७३ | २११.३३ | ३३१.९१ | ४११.३० |
| **एकूण** | **२९६६.१३** | **२८७६.५६** | **२७७०.५७** | **३३२१.५५** | **३९५५.६४** |

# आर्थिक स्थिती
# अर्थसंकल्पीय अंदाज -ग


(फंड कोड-४०)

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्प 'ग'





| अनुक्रमांक | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | जल आकार | १४६६.४३ | १७ |
| २ | जल लाभ कर | १०५८.४१ | १३ |
| ३ | मलनि:सारण आकार | ८९६.७२ | ११ |
| ४ | मुदत ठेवींवरील व्याज | ७८५.९३ | ९ |
| ५ | मलनि:सारण लाभ कर | ६८४.६३ | ८ |
| ६ | मलनि:सारण कर | ३६१.२१ | ४ |
| ७ | पर्यवेक्षण आकार | ३३३.६४ | ४ |
| ८ | जल कर | १६६.६३ | २ |
| ९ | इतर महसूल | २६७६.३६ | ३२ |
| | **एकूण** | **८४२९.९६** | **१००** |

## महसुली खर्च - अर्थसंकल्प 'ग'





| अनुक्रमांक | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | आस्थापना खर्च | २४६४.१८ | २९ |
| २ | तरतुदी आणि निर्लेखन | १७५२.२२ | २१ |
| ३ | प्रचालन आणि परिरक्षण | ११७७.४४ | १४ |
| ४ | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | ९७३.९८ | १२ |
| ५ | प्रशासकीय खर्च | ३२२.५८ | ४ |
| ६ | कालावधीपूर्व बाबी | ४२.४९ | १ |
| ७ | राखीव निधीकडे वर्ग | २७.४८ | ... |
| ८ | कार्यक्रम खर्च | २२.४६ | ... |
| ९ | व्याज आणि वित्त आकार | ७.३२ | ... |
| १० | भांडवली लेख्यांकडे स्थानांतरण | १६३९.८१ | १९ |
| | **एकूण** | **८४२९.९६** | **१००** |

## भांडवली प्राप्ती - अर्थसंकल्प 'ग'





| अनुक्रमांक | भांडवली प्राप्तीची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | सांडपाणी प्रकिया केंद्रांच्या कामांसाठी निधीचा वापर | ५५४५.०० | ४१ |
| २ | संचित वर्ताळ्यामधून वर्ग | ३८३०.०० | २९ |
| ३ | महसुली वर्ताळा | १६३९.८१ | १२ |
| ४ | पाणी पुरवठा प्रकल्प कामांकरिता घसारा निधीतून निधीचा वापर | १२००.०० | ९ |
| ५ | विशेष प्रकल्प कामांकरिता निधीचा वापर | ९५६.५३ | ७ |
| ६ | अंशदान / अनुदान | २९२.६३ | २ |
| | **एकूण** | **१३४६३.९७** | **१००** |

## भांडवली खर्च- अर्थसंकल्प ‘ग’




| अनुक्रमांक | खातेनिहाय भांडवली खर्च | अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२०२६ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | मुंबई मलनि:सारण प्रकल्प (सांडपाणी प्रक्रिया केंद्र) | ५५४५.०० | ४१ |
| २ | पाणी पुरवठा प्रकल्प | ४०००.०० | ३० |
| ३ | जल प्रचालन | १४००.०० | १० |
| ४ | मुंबई मलनि:सारण प्रकल्प (इतर) | ९५५.०० | ७ |
| ५ | मलनि:सारण प्रकल्प | ८७३.२८ | ७ |
| ६ | मलनि:सारण प्रचालन | ६५०.०० | ५ |
| ७ | सामायिक सेवा | ३४.०० | ... |
| ८ | वर्षभरातील अंदाजित वर्तावळा | ६.६९ | ... |
| | **एकूण** | **१३४६३.९७** | **१००** |




(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
| महसुली खर्च | ३७६८.६० | ४५१२.९३ | ५००१.९४ | ६४०२.२५ | ६७९०.१५ |
| भांडवली खर्च | १८३६.४५ | २२८६.९८ | ३५१०.७६ | १००४५.०० | १३४५७.२८ |
| **एकूण** | **५६०५.०५** | **६७९९.९१** | **८५१२.७०** | **१६४४७.२५** | **२०२४७.४३** |

मुद्रक : व्यवस्थापक, महानगरपालिका मुद्रणालय, भायखळा - ४०० ०११